





अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला
वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

मार्च २०१४ | किंमत १५ रुपये

नवीन वर्ष,
नवीन आशा!
जीवनाला मिळो,
नवीन दिशा!
सुखमय, निरामय होवो
आपले जीवन,
यासाठी शुभेच्छा!

सर्व वाचकांना
गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा!



मेहता
पब्लिशिंग
हाऊस

# मेहता मराठी ग्रंथजगत

मार्च २०१४ वर्ष चौदावे अंक तिसरा

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

अंकाची किंमत
१५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संपादकीय | ५ |
| साहित्यवार्ता | ८ |
| पुरस्कार | ३८ |
| पुस्तक परिचय | ५२ |
| मुक्तचिंतन | ८० |
| चिंतन | ८६ |
| अभिप्राय | ९६ |
| श्रद्धांजली | १०० |
| बालनगरी | ११० |

मांडणी-अक्षरजुळणी

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड,
टेलिफोनभवनसमोर,
पुणे-४११ ०३०
फोन :०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५
E-mail : info@mehtapublishinghouse.com

डिजिटल अंकाची वर्गणी

तीन वर्षांची ३००रु. पाच वर्षांची ४००रु.

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संवाद

वाचकहो,

वसंतागमनाच्या आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

वसंत ऋतु हा सृजनाचा, सर्जनाचा ऋतु म्हणून ओळखला जातो. सर्जनता हा मानवी स्वभावाचा एक पैलू आहे. कुणी तो व्यक्त करतो तर कुणी कायम अव्यक्त राहतो.

वसंतात ज्याप्रमाणे सारी सृष्टी नवीन रूप धारण करते, त्याचप्रमाणे आम्हीही आता या संवादाचं रूप बदलत आहोत. आजपर्यंतचा आपला हा बराचसा संवाद एकेरी होता, तो आता आम्ही दुहेरी करणार आहोत.

या सृजनाच्या ऋतूत आपणही साऱ्यांनी लिहितं व्हावं ही आमची इच्छा आहे. आपला हा संवाद अधिक प्रभावी करण्यासाठी आपण केलेले लेखन, एखादे पुस्तक वाचल्यानंतरची आपली प्रतिक्रिया, आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींवरची तुमची मतं किंवा केवळ स्वान्तसुखाय म्हणून केलेले लेखन तुम्ही आम्हाला ईमेलद्वारे पाठवू शकता.

आपले लेखन ईमेलने खालील ईमेल पत्त्यावर पाठवा.

ईमेल:- mmgj@mehtapublishinghouse.com

निवडक लेखनाचा अंकात समावेश करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच उत्तम लेखासाठी पारितोषिक म्हणून कोणत्याही एका खरेदीवर ४०% सवलत देण्यात येईल.

तुमच्या पत्रोत्तराच्या अपेक्षेत,

**मेहता मराठी ग्रंथजगत**




## विश्वभान वाढविणारी जागतिक ग्रंथजत्रा

फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात नवी दिल्लीच्या प्रगती मैदानावर नेहमीप्रमाणे जागतिक ग्रंथजत्रा झाली. यावेळी पोलंडला गेस्ट ऑफ ऑनरचा सन्मान दिला गेला. या वर्षी भारत-पोलंड यांच्या राजनैतिक संबंधाच्या प्रस्थापनेलाही साठ वर्षे पूर्ण होत आहेत, याकडेही आयोजकांनी लक्ष वेधले. पोलंडमधील पंचवीस-तीस प्रकाशक आणि लेखक-कवींची उपस्थिती आणि पोलिश पुस्तकांच्या भारतीय भाषांतील तसेच भारतीय भाषांतील पुस्तकांच्या पोलिश अनुवादाबद्दल झालेले करार यामुळे या ग्रंथजत्रेच्या फलश्रुतीबद्दल आपल्याला समाधान वाटायला हरकत नाही. मिशाल रुसिनेक या लेखकाच्या लिटल चोपिन या पोलिश बालकथेच्या हिंदीतील अनुवादाचे नॅशनल बुक ट्रस्टच्या वतीने पहिल्याच दिवशी प्रकाशन झाले. त्याप्रमाणे शाह ऑफ शाहज (रिझझार्ड कापुशिन्स्की), वॉर्डरोब (ओल्गा टोकारझक), टेल्स ऑफ गॅलिशिया (आंट्रेझ स्टॅसिडक) या पुस्तकांचे हिंदी अनुवाद राजकमल प्रकाशनने प्रसिद्ध केले. रिझझार्ड (१९३२-२००७) या विख्यात पोलिश पत्रकाराच्या साहित्याचे स्वतंत्र दालनही लक्षवेधक होते. पोलिश प्रजासत्ताकाचा परराष्ट्र विभाग आणि पोलिश बुक इन्स्टिट्युट यांनी या दालनावर भरपूर मेहनत घेतलेली होती. 'इट्स ए स्ट्रेंज वर्ल्ड' या चित्रप्रदर्शनात पुरस्कारप्राप्त वीस पोलिश चित्रकारांच्या कलाकृती मांडण्यात आल्या होत्या. युनेस्को क्रॅकोव - वाङ्मयप्रेमी शहर' हेही उद्बोधक होते. 'क्रॅकोव आणि दिल्ली या दोन शहरांच्या वाङ्मयीन परंपरेचा परामर्श घेणारा कार्यक्रम पोलंड-भारताचे भावबंध दृढकरणारा होता. पोलंडच्या ग्रंथ प्रदर्शन दालनाचे उद्घाटन पोलिश इन्स्टिट्युटचे संचालक ग्रेझगॉडेन यांनी केले. त्यांनी पोलंडमधील प्रकाशन क्षेत्राची अर्थपूर्ण ओळख करून दिली. ज्युलिअन टुविम यांच्या लोकोमोटिव्ह या गाजलेल्या क्लासिकवर मुलांसाठी एक कार्यशाळा घेण्यात आली.

ग्रंथजत्रेचे उद्‌घाटन भारताचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी केले.

''असहिष्णुता, पूर्वग्रह आणि हेवेदावे यांना आपण मुठमाती द्यायला हवी. त्यांच्या संदर्भात कसलीही तडजोड करता कामा नये. भारतीय माणसे वेगवेगळे युक्तिवाद लढवण्यात पटाईत आहेत; परंतु ते कधीही असहिष्णू असणार नाहीत. या ग्रंथजत्रेत बालसाहित्य हे केंद्रस्थानी आहे. मुलांमध्ये बालपणापासूनच वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून पालकांनी आणि शिक्षकांनी विशेष लक्ष द्यायला हवे. वाचनकौशल्य आत्मसात केले तर आयुष्यभर त्याचा उत्तम फायदा होतो.'' असे राष्ट्रपती म्हणाले.

''वाचन आणि बालसाहित्य यावर प्रकाशन व्यवसायाने आपले लक्ष केंद्रित करायला हवे. चिल्ड्रेन्स बुक ट्रस्टचे संस्थापक आणि चित्रकार शंकर पिल्ले यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष आहे.'' असे नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष सेतुमाधवन यांनी प्रतिपादन केले.

बालसाहित्यकार रस्किन बाँड यांना गेस्ट ऑफ ऑनर म्हणून पाचारण करण्यात आले होते. लेखक कट्ट्यावर तीनशेवर लेखक कवींनी आपल्या वाचकांशी संवाद साधला. पोलिश आणि भारतीय प्रकाशान व्यवसायात जवळचे संबंध निर्माण होण्यासाठी या ग्रंथजत्रेमुळे चालना मिळेल असे दिल्लीच्या पोलिश इन्स्टिटयुटच्या संचालक ॲना ट्रिक-बामले यांनी म्हटले. करिश्मा कपूर, दीप्ती नवाल, कुणाल कपूर वगैरे अभिनेत्यांनीही ग्रंथजत्रेला भेट दिली.

कथासागर या उपक्रमांतर्गत पुराणकथा, दंतकथा आणि लोककथा, कथाकथनाच्या भारतीय परंपरा, महाकाव्ये आणि प्राचीन ग्रंथ यांचे मुलांच्या दृष्टीने पुनर्निवेदन, स्वातंत्र्याचे मोल, समकालीन बालकथा अशा पाच विषयांवरचे परिसंवाद झाले. पुलक विश्वास आणि हरिकृष्ण देवसरे या बालसाहित्यिकांवरही कार्यक्रम झाले.

या ग्रंथजत्रेत ११०० प्रकाशनसंस्थांचे स्टॉल होते. चीन, अमेरिका, इंग्लंड, दक्षिण कोरिया, तुर्कस्थान, फ्रान्स, नेपाळ, मलेशिया, थायलँड, घाना वगैरे देशांचाही सहभाग होता. गतवर्षी फ्रान्स या देशाला गेस्ट ऑफ ऑनर म्हणून पाचारण करण्यात आले होते. यंदाही फ्रान्समधील प्रकाशकांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देऊन या दोन देशातील परस्पर देवाणघेवाणीच्या दिशेने चर्चा चालू ठेवली. भारतात २८ भाषांमध्ये पुस्तके प्रकाशित होतात आणि ६५ हजारावर प्रकाशक आहेत याचे त्यांना अप्रूप वाटते. फ्रान्समध्ये दरवर्षी बालसाहित्याची ९० हजार पुस्तके निघतात; त्यामुळे या दोन्ही देशात ग्रंथव्यवहाराला खूप वाव आहे याबद्दल एकमत होते. रामकृष्ण मठ, ओशो, अरविंद आश्रम, रामदेव बाबा, गीताप्रेस, गायत्री परिवार वगैरे धार्मिक-आध्यात्मिक संस्थांच्या स्टॉल्सवरही खूप गर्दी होती.

मराठी व इतर प्रादेशिक भाषांचे स्टॉल्स या ग्रंथजत्रेत फारसे गजबजलेले नसतात. प्रकाशक संघांना ते स्टॉल मोफत मिळतात त्यामुळे त्यांची सोय होते.

ई-बुक्सचे स्टॉल्स मोजकेच होते. इंग्लिश ई-बुक्सना जास्त मागणी होती. प्रादेशिक भाषांपर्यंत नवे तंत्रज्ञान पोचायला अजून काही अवधी जावा लागले. ॲमेझॉनच्या किंडलबद्दल खूप कुतूहल होते.


जपान आणि चीन हे खरे तर आपले शेजारी देश. परंतु त्यांच्या भाषा येणारे लोक आपल्याकडे फारच अल्प आहेत. या भाषा शिकवण्यासाठी योग्य त्या यंत्रणाही नाहीत. त्यामुळे त्या भाषांतील पुस्तकांच्या आकलनसाठी इंग्रजी अनुवादांचे माध्यम आवश्यक ठरते. आपल्या विद्यापीठांमध्ये या भाषांच्या अध्यापनाची व्यवस्था असायला हवी.

नॅशनल बुक ट्रस्टच्या कुशल आयोजनामुळे या ग्रंथजत्रांमधील सातत्य आणि भव्यता टिकून आहे. आणि भारतीय प्रकाशनव्यवसायाला या ग्रंथजत्रेने एक प्रतिष्ठा मिळवून दिली आहे हे मान्य करायलाच हवे.



**नम्र सूचना**

'मेहता मराठी ग्रंथजगत'च्या सर्व वाचकांनी कृपया नोंद घ्यावी की
यापुढे 'मेहता मराठी ग्रंथजगत'साठी एक वर्षाचे सभासदत्व ही योजना
'एप्रिल २०१४' पासून आम्ही बंद करत आहोत.
यापुढे कुठल्याही जुन्या सदस्यास अथवा नव्याने सदस्यत्व घेणाऱ्या व्यक्तीस
एक वर्षाचे सभासदत्व मिळू शकणार नाही.
तीन व पाच वर्षांचे सभासदत्व ही योजना मात्र
पूर्वीप्रमाणेच चालू राहील.



# साहित्य वार्ता

## हरवलेले पाकिट स्मार्टफोनने शोधा

अनेकदा ट्रेनमधून जाताना किंवा प्रवासात गर्दीचा फायदा घेऊन चोरटे, खिसेकापू अनेकांची पाकिटे पळवितात. आता तुमच्याकडे लेटेस्ट स्मार्टफोन असेल तर हरवलेले पाकिट ट्रेस करता येईल. ब्लू टूथच्या मदतीने तुमच्या पाकिटावर लक्ष ठेवणे शक्य होईल.

शांघायमधील जॅक हू यांनी तयार केलेल्या स्मार्टवॉलइट प्रो या अनोख्या डिव्हाइसच्या मदतीने स्मार्टफोन आणि पाकिटावर नजर ठेवण्याबरोबर पाकीटही फोनवर नजर ठेवणार असल्याने घरात फोन शोधण्यासाठी याची मदत होईल. म्हणजे जर ऑफिसला निघताना पाकीट विसरलात तर फोन पाकीट घ्यायची आठवण देईल आणि फोन घरी विसरलात तर पाकीट फोनची आठवण देईल.

अनेकदा लोक टॅक्सी, हॉटेल, दुकाने, एखाद्या कार्यक्रमाच्या जागी आपले पाकीट विसरतात किंवा ते हरवते. त्यामुळे त्याच्यावर नजर ठेवण्यासाठी 'ॲण्ड लॉस्ट डिव्हाइस' बनवण्याची कल्पना सुचली. एखाद्या कार्ड होल्डरप्रमाणे दिसणारे स्मार्टवॉलइट प्रो हे डिव्हाइस पाकिटात एखाद्या कार्ड प्रमाणे ठेवावे. हे डिव्हाइस छोट्या हार्ड डिस्कसारखे दिसते. हे डिव्हाइस चार्जेबल असून ते लाइट सेन्सॉर आणि ब्लू टूथच्या मदतीने मोबाइलशी कनेक्ट होते. जर पाकीट आणि मोबाइलमधील अंतर तीस मीटरपेक्षा जास्त झाले तर मोबाइलवर ॲलर्ट मेसेज येईल. जर मोबाइल लांब राहिला तर स्मार्टवॉलइट व्हायब्रेशन आणि आवाजाने मोबाइल राहिल्याची सूचना करील. पाकिटावर दोनदा फटके मारल्यावर तुमच्या पाकीट वापराची सर्व माहिती स्मार्टफोनमध्ये रेकॉर्ड करून ठेवली जाते. तुमच्या बचतीचा आणि खर्चाचाही हिशोब हे ॲप्लिकेशन ठेवते.

## 'चॅनल ४ लाइव्ह' कादंबरीचे प्रकाशन

कलावंतांकडे मुळातच वेगळा 'अँगल' असतो. त्यामुळेच, उत्तम कलाकृती तयार होते. मात्र कलावंताला कल्पना सुचते कशी, हे शब्दांत सांगता येत नाही. असे मत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी समीरण वाळवेकर

लिखित ‘चॅनल ४ लाइव्ह’ कादंबरीचे प्रकाशन करताना व्यक्त केले. दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, साहित्यिक अरुण साधू, ‘सकाळ’ (मुंबई)चे कार्यकारी संपादक पद्मभूषण देशपांडे, पत्रकार राजीव खांडेकर यावेळी उपस्थित होते.

ठाकरे म्हणाले, ‘‘दर्जेदार कलाकृती पुन:पुन्हा पाहायला मिळत नाहीत. म्हणूनच, ‘सिंहासन’सारखा चित्रपट पुन्हा रसिकांसमोर आला नाही. ‘चॅनल ४ लाइव्ह’ ही कादंबरीसुद्धा वेगळा दृष्टिकोन ठेवून लिहिली गेलेली आहे.’’

डॉ. पटेल म्हणाले, ‘‘समाजातील गंभीर प्रश्न सोडून देऊन माध्यमांमध्ये वेगळेच प्रश्न हाताळले जात आहेत. अशा स्थितीत एकमेकांमध्ये स्पर्धाही वाढली आहे. त्यामुळे समाजात मानसिक चिंतेचे वातावरण निर्माण होत आहे. लोकशाहीला धक्का लागेल असे वर्तन माध्यमांच्या हातून होऊ नये, याची काळजी घ्यायला हवी.’’

साधू म्हणाले, ‘‘पूर्वी माध्यमांची प्रतिमा साजूक होती. ती आता धक्कादायक, भीतिदायक झाली आहे. राजकारणाचे क्षेत्र जेवढे कुरूप आहे तेवढे ते माध्यमांचेही झाले आहे. त्यामुळेच, लोकशाही धोक्यात आली आहे. हे चित्र बदलायचे असेल, तर दोनही क्षेत्रात संयमाची आणि नियंत्रणाची आवश्यकता आहे.’’ कॅमेऱ्यामागचे जग लोकांसमोर यावे, हा उद्देश ठेवून ही कादंबरी लिहिली असे वाळवेकर यांनी सांगितले.

## योग्यतेशिवाय संतकृपा नाही

‘‘आपली योग्यता असल्याशिवाय संत कोणत्याही व्यक्तीला जवळ करीत नाहीत. संतांकडे एखाद्या मोठ्या व्यक्तीचा सोडाच; परंतु परमेश्वराचादेखील वशिला चालत नाही,’’ असे प्रतिपादन श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव शास्त्री यांनी केले.

आळंदी येथील ज्ञानदर्शन धर्मशाळेत डॉ. शास्त्री यांची पाच दिवसांची संपूर्ण ज्ञानेश्वरी निरुपण कथा झाली. दररोज हजारो भाविक आणि कीर्तनकार प्रवचनास हजेरी लावत. ‘‘काळ  व्यापक असतो. तो त्यागाचा, भोगाचा, कार्याचा साक्षीदार असतो. त्यामुळे वयाच्या साठीनंतर पुढचे आयुष्य सुखी करण्यासाठी संत संगती धरा; जीवनाचा उद्धार झाल्याशिवाय राहणार नाही. तुमच्यामुळे जग बदलणार नाही अथवा प्रलय येणार नाही. जेथे ज्ञानेश्वर माऊली स्वत:ला अल्पमती म्हणतात तेथे आपण कोण?’’ असेही डॉ. शास्त्री यांनी विचारले.

कार्यक्रमास वारकरी शिक्षण संस्थेचे ह.भ.प. मारुतीबुवा कुऱ्हेकर उपस्थित होते.

## आता फेसबुकचे सर्वोत्तम वैयक्तिक दैनिक

गेल्या दहा वर्षात फेसबुकने सोशल मीडियामध्ये क्रांती घडवून आणली. आता फेसबुकतर्फे ‘पेपर’ हे सोशल ॲप तयार करण्यात येत असून हे ॲप

जगातील सर्वोत्तम वैयक्तिक वृत्तपत्र ठरेल, असे फेसबुकचा संस्थापक मार्क झुकेरबर्गने सांगितले आहे. या ॲपसाठी उपसंपादकांची टीम प्रत्येक युजर्सच्या आवडीनिवडीचा वेध घेऊन बातम्या देणार आहे. ॲपच्या सुरुवातीच्या टप्प्यात टेक्नॉलॉजी क्षेत्रातील महत्त्वाच्या घडामोडी फेसबुकवर पाहता, वाचता येतील. त्याचप्रमाणे, अधिक वाचनासाठी मिनिमॅगझिन्सही फेसबुकतर्फे उपलब्ध करून देण्यात येतील. 'पेपर'मध्ये बातम्या अधिकाधिक आकर्षक पद्धतीने सादर करता याव्यात, यासाठी संपादकांची टीम काम करत आहे, असे 'पेपर'चे व्यवस्थापक मायकेल रेकहाऊ यांनी सांगितले.

फेसबुकने मागील वर्षी डिसेंबरपासूनच न्यूज फीडमध्ये दिसणाऱ्या स्टेटस अपडेट्स, फोटो, व्हिडिओ आणि ॲड्स यांचे क्रम ठरवले होते. त्यामध्ये फेसबुकच्या मते महत्त्वाच्या असणाऱ्या न्यूज साइट्सना अग्रक्रम देण्यात आला, तर विनाकारण पसरवले जाणारे बिनमहत्त्वाचे व्हिडिओ खाली ठेवण्यात आले. 'इन्स्टाग्राम' प्रमाणेच 'पेपर'ही लोकप्रिय ठरेल असा काही तज्ज्ञांचा विश्वास आहे, तर फेसबुकच्या स्मार्टफोन्स ॲपप्रमाणेच 'पेपर'ला थंडा प्रतिसाद मिळेल, असे काहींना वाटते.

मात्र, संपूर्णपणे स्वतंत्र, बातम्यांना वाहिलेली न्यूज साइट सुरू करण्याची कल्पना फेसबुकने फेटाळली आहे. सध्या याहू या वेबसाइटच्या स्पर्धेत उतरण्याची फेसबुकची इच्छा नाही. २०१३ मध्ये झालेल्या एका सर्वेक्षणानुसार अमेरिकेतील एक तृतीयांश प्रौढएखादी बातमी फेसबुकवरच सर्वप्रथम वाचतात. त्याचप्रमाणे ऑनलाइन असताना अमेरिकन्स सरासरी सहापैकी एक मिनिट फेसबुकवर घालवत असल्याचे आढळून आले. म्हणून फेसबुकने 'पेपर' युजर्ससमोर आणले आहे.

## 'पुणे व्हाया बिहार'ची घौडदौड

पुण्याचा मुलगा अभिजित आणि बिहारची मुलगी तारा यादव यांची लव्हस्टोरी तरुणाईच्या पुरेपूर पसंतीस उतरली आहे. अतुल मारू आणि केतन मारू यांची निर्मिती असलेल्या 'पुणे व्हाया बिहार'चं दिग्दर्शन सचिन गोस्वामी यांनी केले असून या सिनेमात बिहारी कलाकारांचा सहभागदेखील लक्ष वेधणारा आहे. कथा - संगीत - दिग्दर्शन - अभिनय अशा सर्वच आघाड्यांवर हा सिनेमा सर्वत्र गर्दी खेचण्यात यशस्वी झाला आहे.

'पुणे व्हाया बिहार'च्या निमित्ताने अमराठी प्रेक्षक मराठी सिनेमाकडे वळला आहे. हिंदी, बिहारी, भोजपुरी भाषिक प्रेक्षकदेखील मराठी इतकाच हा सिनेमा मनापासून एन्जॉय करतोय. 'प्रेम म्हणजे प्रेम असतं...' हे गीत तरुणाईच्या विशेष पसंतीस उतरले आहे. त्या शिवाय 'कच्ची कैरी हूं मैं' या गीताला जबरदस्त दाद आणि शिट्या मिळताहेत. भालचंद्र कदम यांनी गायलेले 'पिंग पाँग' हे गीत

देखील ठेका धरायला लावणारे आहे. मुंबई - पुण्यासोबत इतर ठिकाणी ह्या सिनेमाने तिकीटबारीवर उत्तम खेळी केली आहे.

'पुणे व्हाया बिहार' सिनेमात भरत जाधवने इन्स्पेक्टर प्रताप निंबाळकरच्या रोलमध्ये दमदार अभिनय केला आहे.

मैत्री, विश्वास, त्याग यांतून फुलणारी सिनेमाची अनोखी प्रेमकथा सचिन मोटे आणि सचिन गोस्वामी यांनी लिहिली आहे. अमीर हडकर यांनी संगीतबद्ध केलेली अवधूत गुप्ते, नेहा राजपाल, सोनू कक्कड, राजा हसन, भालचंद्र कदम, रणबीर, चंग यांच्या आवाजातील गीते ओठांवर रुंजी घालणारी आहेत. उमेश कामत, मृण्मयी देशपांडे, अरुण नलावडे, किशोरी अंबिये, भालचंद्र कदम, सुनील कुमार, उमा सरदेसाई, अभय भार्गव, मेहमूद हश्मी, ब्रिजेश करणवाल आणि भरत जाधव यांच्या भूमिका असलेला सिनेमा युथफुल लव्हस्टोरी, बहारदार संगीत, जबरदस्त ॲक्शन असे 'फुल ऑन एंटरटेनिंग पॅकेज' पेश करतो.

## नोकरीसाठी सोशल स्किल्स, डिजिटल लिटरसी आवश्यक

एक काळ असा होता, जेव्हा नोकरी मिळावी म्हणून तरुण टायपिंग, शॉर्टहँड आदी गोष्टी शिकून घेत. आणि त्यांना नोकरीत प्राधान्यही मिळत असे. त्यानंतर इंग्रजी भाषेचे आणि कम्प्युटरचे ज्ञान आवश्यक झाले. उमेदवारांकडे कोणती अतिरिक्त कौशल्ये आहेत, हे नोकरी देताना नक्कीच पाहिले जाते. हल्ली नोकरीसाठी सोशल स्किल्स (९१ टक्के), डिजिटल स्किल्स (९१ टक्के), शिक्षण (९० टक्के) आणि अनुभव (९४ टक्के) यांना महत्त्व आल्याचे या सर्व्हेमधून स्पष्ट झाले आहे.

नोकरी देताना बाळगल्या जाणाऱ्या सध्याच्या अपेक्षा आव्हानात्मक असून, पुढील काही वर्षांत तरुणांपुढील आव्हाने अधिक वाढतील, असे ९० टक्के तरुणांना वाटते.

जागतिकीकरणामुळे कंपन्यांना उमेदवार निवडीमध्ये अनेक पर्याय उपलब्ध आहेत. विविध प्रांतांतील टॅलेंटची निवड कंपन्या करत आहेत. संस्थेच्या कल्चरमध्ये फिट बसणाऱ्या आणि उत्तम सोशल स्किल्स असलेल्या उमेदवारांना प्राधान्य मिळते.

भारतात वर्षाला ११ दशलक्ष उमेदवार नोकरीसाठी सज्ज होत असून, जगभरातील देश भारताकडे ह्युमन रिसोर्स हब म्हणून पाहत आहेत. नोकरीच्या उत्तम संधी उपलब्ध असून, उमेदवारांनी मार्केटमध्ये आवश्यक असलेली कौशल्ये अंगीकारली पाहिजेत, असे हा अहवाल सांगतो.

## पंढरपूरचे नाट्य संमेलन

‘नाटकाचे मनोरंजन हे अंतिम ध्येय असता नये. नव्याने नाट्यचळवळ उभी करण्यासाठी नवी उमेद असलेल्या रंगकर्मींचा शोध घेतला पाहिजे, नवे कलावंतच नवी रंगभूमी उभी करतील.’ अशी आशा केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी ९४व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे उद्घाटन करताना व्यक्त केली. संमेलनाचे नवनिर्वाचित अध्यक्ष अरुण काकडे, मावळते अध्यक्ष डॉ. मोहन आगाशे, स्वागताध्यक्ष आमदार भरत भालके, नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी आदी या वेळी उपस्थित होते.

शाळा, महाविद्यालयांत गाठीशी आलेल्या नाट्यानुभवाने उर्मी आणि जिद्दीने बाळकडू दिले. सध्या राजकीय रंगमंचावर विविध भूमिका निभावताना तोच अनुभव कामी येत असल्याचे सांगून, केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी नाटकांतून मनोरंजनाच्या फुलबाज्या उडवितानाच संस्कृती आणि संस्कार जपले पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त केली. शिंदे यांनी मराठी रंगभूमी सोलापूर जिल्ह्यातील रंगभूमी, दलित रंगभूमी यांचाही आढावा घेतला.

ज्येष्ठ रंगकर्मी राम जाधव, बाळ कर्वे, फैय्याज, जयंत सावरकर, लालन सारंग, श्रीकांत मोघे, सुरेश खरे यांचा शिंदे यांच्या हस्ते या वेळी सत्कार करण्यात आला.

काव्याचे फटकारे उडवून आठवले यांनी नाट्यसंमेलनाचा २५ लाख रुपयांचा निधी वाढवून एक कोटी रुपये करण्याची सूचना केली. याच कार्यक्रमात देवतळे यांनी नाट्य परिषदेला तीन कोटी ५० लाखांचा घोषित केलेला निधी आणि संमेलनाचा २५ लाखांचा निधी सुपूर्द केला. सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील, खासदार रामदास आठवले, सांस्कृतिक कार्यमंत्री संजय देवतळे, जिल्हा परिषद अध्यक्ष निशिगंधा माळी, नगराध्यक्ष उज्ज्वला भालेराव यांच्यासह नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह दीपक करंजीकर, कोषाध्यक्ष लता नार्वेकर, आयोजक विनोद महाडिक, सागर यादव, सुनील मोहिते आदी मंडळी व्यासपीठावर उपस्थित होती.

## अभिरूप न्यायालय - परिसंवादाच्या वळणावर गेले

टीव्हीने नाटकाला मारले का? मराठी नाट्यसृष्टीत वाद का होतात? नाटक व्यवसाय की हौस? नाटकात प्रायोगिक व्यावसायिक भेद का? अशा प्रश्नांची अभिरूप न्यायालयात चर्चा करण्याचा आणि त्यावर निकाल घोषित करण्याचा प्रयत्न नाट्यसंमेलनात यशस्वी ठरला नाही. वेगळी संकल्पना नावाखाली रंगमंचावर आणलेले अभिरूप न्यायालय परिसंवादाच्या वळणावरच गेले.

डॉ. मोहन आगाशे न्यायाधीशाच्या भूमिकेत होते. ज्येष्ठ दिग्दर्शक विनय केंकरे, चंद्रकांत कुलकर्णी, मंगेश कदम, निर्माते अनंत पणशीकर, मुरली खैरनार, दीपक राजाध्यक्ष, आनंद म्हसवेकर यांच्यासह अमित भंडारी, संजय

डहाळे, राजा माने, शीतल करंदेकर, अजय परचुरे आदी पत्रकार सहभागी झाले होते. दीपक करंजीकर यांनी सूत्रसंचालन केले.

नाटक हा हौसेने केलेला व्यवसाय आहे असे चंद्रकांत कुलकर्णी यांनी सांगितले, तर नाट्यव्यवसायाची गणिते कळत नसल्याने मराठी नाटकात व्यावसायिकता आलेली नाही, तशी आपल्याकडे शिस्त नाही असे स्पष्ट मत केंकरे यांनी मांडले, या विषयावर डॉ. आगाशे यांनी 'पुलं'चा दाखला दिला. माणूस जगण्यासाठी करतो ती उपजीविका, जगण्याची साधनं असलेले काम ही जीविका, मात्र ज्यांची जीविका आणि उपजीविका एकच आहे त्यांच्यासाठी तो व्यवसाय असल्याचे त्यांनी सांगितले.

नाटक समृद्ध होण्यासाठी हौशी आणि व्यावसायिक असा भेद आवश्यक असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले.

'हर्बेरियम' उपक्रमाने टीव्हीवरील कलाकारांना नाटकात पाहण्यासाठी झालेली गर्दी हे उत्तम उदाहरण आहे. त्यामुळे टीव्हीवर कलाकारांना मिळणारी लोकप्रियता नाटकासाठी पूरक असल्याचे मत सर्व वक्त्यांनी मांडले. 'टीव्हीमुळे लेखक तुकड्यांमध्ये लिहू लागले आहेत. त्यामुळे समग्र नाटकाचा अनुभव देणारे लेखक तयार होत नसल्याची खंत केंकरे यांनी व्यक्त केली.

एकूणच न्यायालयरूपी चर्चेत परिसंवादाचा अनुभव प्रेक्षकांनी घेतला. संमेलनात सतीश तारे रंगमंचावर विविध नाट्य शाखांच्या एकांकिका, विनय आपटे रंगमंचावर 'पंढरीचा राणा' हा अभिवाचन - संगीताचा कार्यक्रम, आनंद भाटे यांची नाट्यसंगीत मैफल आणि चित्रपट-नाट्यसृष्टीतील कलाकारांची संगीत-रजनी झाली. सर्वच कार्यक्रमांना पंढरपूरवासीयांनी उत्स्फूर्त हजेरी लावली.

## नाट्यसंमेलनात विविध ठराव

नगरविकास राज्यमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत नाट्यसंमेलनाचा समारोप झाला. तत्पूर्वी खुल्या अधिवेशनात विविध विषयांवर नाट्य परिषदेतर्फे ठराव मांडण्यात आले. टोलचा प्रश्न राज्यात सध्या गाजतो आहे. त्याचे पडसाद नाट्य संमेलनातही उमटले. नाटकांच्या दौऱ्यासाठी असलेल्या बसवर टोल आकारला जाऊ नये, असा ठराव करून नाटकांसाठी तरी 'टोलमुक्ती' हवी, अशी मागणी रंगकर्मींनी या वेळी केली.

सीमा भागातील नागरिकांना नाट्य परिषद त्यांच्यासोबत असल्याचा दिलासा देण्यासाठी, त्यांच्या नाट्यप्रेमाचा विचार करून पुढील नाट्य संमेलन बेळगावला घेण्यात यावे, अशी सूचना नगरविकास राज्यमंत्री उदय सामंत यांनी केली. 'मराठी भाषा भवनातून नाट्य चळवळीसाठी प्रयत्न केले जातील. रंगभूमीविषयी अधिकाराने बोलणारे वक्तेच रंगभूमीवर असावेत,' असे सामंत म्हणाले. पंढरपूरच्या विकासासाठी सव्वा कोटी रुपयांचा निधी त्यांनी जाहीर केला.

‘कलावंतांना घरांचे भूखंड त्वरित मिळावेत, राज्य नाट्य स्पर्धांचे संयोजन नाट्य परिषदेला द्यावे, अनुदान समितीत परिषदेचे अध्यक्ष किंवा कार्यवाह यांचा समावेश करावा, व्यावसायिक बालनाट्यांना अनुदान मिळावे, सांस्कृतिक धोरणाची तातडीने अंमलबजावणी करावी, राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीतील संघांना देण्यात येणारी खर्चाची रक्कम २५ हजार रुपये करावी, नाट्यप्रयोगांच्या परवानगीसाठी एक खिडकी योजना राबवावी,’ आदी मागण्यांचे ठराव मंजूर करण्यात आले.

## आवडेल ते डोमेन नेम मिळवा!

‘डॉट नेट’, ‘डॉट इन’, ‘डॉट कॉम’, ‘डॉट ओआरजी’ आदी परंपरागत डोमेन नेमची सद्दी संपण्याच्या मार्गावर असून, लवकरच इंटरनेटविश्वात ‘डॉट गुरू’, ‘डॉट बाइक’ अशी भिन्नभिन्न आणि आजवर कधीही वापरात न आलेली डोमेन नेम्स दिसण्यास सुरुवात होणार आहे.

जगभरात इंटरनेट सेवा देणाऱ्या कंपन्यांमध्ये व्यवसाय युद्ध भडकले असून, त्या पार्श्वभूमीवर व्यवसायवृद्धीसाठी नवनवीन कल्पना लढविण्यात येत आहेत. वेगवेगळी डोमेन नेम वापरण्याची संकल्पना त्याच धर्तीवर पुढे येत आहे. त्यामुळे भविष्यात ‘डॉट सिंगल्स’, ‘डॉट प्लंबिंग’, ‘डॉट क्लोदिंग’ पासून आवडीचे शब्द डोमेनसाठी वापरता येणार आहेत.

अमेरिकेतील ‘डोनट्स इंक’ या कंपनीने याबाबत पुढाकार घेतला असून, ‘प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य’ या तत्त्वावर डोमेन नेमचा पुरवठा करण्यात येणार आहे. त्यामुळे इंटरनेट विश्वात मोठी क्रांती घडून येईल, असा विश्वास कंपनीला वाटतो. हव्या असणाऱ्या डोमेन नेमचा फायदा कंपन्या आणि व्यावसायिकांना करून घेणे शक्य असल्याचे ‘डॉनट्स इंक’ला वाटत आहे. ‘जेनेरिक टॉप लेव्हल डोमेन्स’ अंतर्गत (जीटीएलडी) चालू वर्षात विविध प्रकारची १०० डोमेन नेम उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यात ‘डॉट सिंगल्स’, ‘डॉट प्लंबिंग’, ‘डॉट क्लोदिंग’, ‘डॉट गुरू’, ‘डॉट होल्डिंग्ज’, ‘डॉट व्हेंचर्स’ आदींचा समावेश आहे.

विशिष्ट डोमेन नेमसाठी जगभरातून कुणीही अर्ज करू शकणार आहे. पण ‘प्रथम येणाऱ्यास प्राधान्य’ या तत्त्वावरच त्याचे वाटप करण्यात येणार आहे. कंपनीतर्फे ‘डॉट कॅमेरा’, ‘डॉट इक्विपमेंट’, ‘डॉट इस्टेट’, ‘डॉट गॅलरी’, ‘डॉट ग्राफिक’, ‘डॉट लाइटिंग’, ‘डॉट फोटोग्राफी’ आदी डोमेन नेम्स सादर करण्यात येणार आहेत.

## इंटरनेट यूजरची संख्या २४ कोटींवर

स्मार्टफोनच्या किमती आवाक्यात आल्याने देशातील इंटरनेट वापरात मोठी

वाढझाली आहे. या पार्श्वभूमीवर जून २०१४ पर्यंत देशातील इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या गतवर्षीच्या तुलनेत २८ टक्क्यांनी वाढून २४.३० कोटींवर जाईल.

'इंटरनेट अँड मोबाइल असोसिएशन ऑफ इंडिया'च्या (आयएएमएआय) अहवालानुसार जून २०१३ पर्यंत देशात नियमित इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या १९ कोटी होती. जून २०१२ मध्ये हीच संख्या १५ कोटींच्या आसपास होती. इंटरनेटचा वापर वाढण्यामागे स्मार्टफोनचा वाढता वापर कारणीभूत असल्याचेही निरीक्षण 'आयएएमएआय'ने नोंदविले आहे.

जून २०१३ पर्यंत एकूण इंटरनेट वापरणाऱ्यांमध्ये स्मार्टफोनद्वारे इंटरनेट ॲक्सेस करणाऱ्यांची संख्या १३ कोटी होती. २०१२ हीच संख्या ६.८० कोटी इतकी होती. हाच वेग कायम राहिल्यास जून २०१४ पर्यंत स्मार्टफोनद्वारा इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या २८.५० कोटींवर जाईल, असा अंदाजही 'आयएएमएआय' ने वर्तवला आहे.

डिजिटल उद्योगाला मदतीचा हात

इंटरनेट वापराचा वेग वाढल्याने ई-कॉमर्स आणि डिजिटल ॲडव्हर्टायझिंग यांना विशेष फायदा झाल्याचे 'आयएएमएआय'ने म्हटले आहे. डिसेंबर २००७ मध्ये ८,१४६ कोटी रुपयांवर असणारी डिजिटल उद्योगाची उलाढाल डिसेंबर २०१२ आणि डिसेंबर २०१३ पर्यंत अनुक्रमे ४७,३४९ कोटी आणि ६२,९६७ कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

## 'लंपन'चा ऑडिओ अवतार

लाल मातीतल्या छान मराठीला हेलदार कर्नाटकी चाल, शुद्ध कोवळ्या निसर्गाचे स्वाभाविक दर्शन, रंगरसगंधध्वनींना बिलगून येणारे लोभस शब्द आणि अजाणत्या-जाणत्या वयाच्या सीमेवर घुटमळणाऱ्या मनाचा अत्यंत तरल वेध हे प्रकाश नारायण संत यांच्या कथांचे विशेष. हे विशेष मिरवीत पुस्तकांतील पानांवर हुंदडणारा त्यांचा लाडका 'लंपन' बोलू लागणार असून, त्यासाठीचा योग्य आवाज शोधण्याची मोहीम सुरू झाली आहे.

सन १९६४ मध्ये 'सत्यकथेत' प्रकाश नारायण संत यांची 'वनवास' ही कथा प्रसिद्ध झाली. कथेच्या केंद्रस्थानी असलेला लंपन हा १२-१३ वर्षांचा शाळकरी मुलगा. हा लंपन पुढे अनेक कथांतून, कथासंग्रहातून वाचकांना भेटला. त्याच्याच भाषेत सांगायचे तर 'अठ्ठावीसशे बारा वेळा भेटला आणि त्याच्या गुणिले सतरावेळा तो त्यांना मॅडसारखा आवडला!' लंपनसोबत त्याची आई, बाबा, आज्जी, आजोबा आणि सुमी या सगळ्यांनी वाचकांच्या मनाचा कोपरा हळुवार व्यापला. या सगळ्यांची श्राव्यभेट साहित्यप्रेमींना घडविण्यासाठी पुण्यातील 'स्नॉवेल' कंपनी 'वनवास' हे पुस्तक ऑडिओ स्वरूपात सादर करणार

आहे. 'लंपनचे वय साधारण १० ते १३ वर्षे आहे. त्याच्या व्यक्तिरेखेतील निरागसता आणि खट्याळपणा व्यक्त होईल, अशा आवाजाच्या शोधात आम्ही आहोत,' असे 'स्नॉवेल'चे समीर धामणकर यांनी सांगितले. 'लंपनच्या आजी-आजोबांसाठी आवाज मिळाला आहे. सुमीसाठीही योग्य आवाज शोधण्यात येईल. निपुण धर्माधिकारी या ऑडिओचे दिग्दर्शन करीत असून, त्यास पार्श्वसंगीत, ध्वनिसहाय्य याचीही जोड असेल,' अशी माहिती धामणकर यांनी दिली.

## चक्रधरस्वामी संमेलनाच्या अध्यक्षपदी उत्तम कांबळे

नांदेड जिल्ह्यातील इजळी येथे मार्चमध्ये झालेल्या आठव्या राज्यस्तरीय श्री चक्रधरस्वामी मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद 'सकाळ'चे संपादक-संचालक उत्तम कांबळे यांनी भूषविले. महादंबा साहित्य संघाच्या राज्य कार्यकारिणीतर्फे हे संमेलन भरवले जाते.

## पुण्यात 'आयटी हब'

सरकारी आयटी धोरण आणि 'एसटीपीआय'चे नियम यात बदल झाले आहेत. आयटी क्षेत्रातील स्पर्धा वाढली आहे. रोज नवीन स्टार्टअप्स येताहेत. उत्पादन क्षमतेतील वाढ, निर्यातीसाठी पोषक वातावरण, सिंगल विंडो क्लिअरन्सची सुविधा उपलब्ध झाल्यास आयटीतील निर्यातीला प्रोत्साहन मिळेल, असे 'सॉफ्टवेअर एक्सपोर्टर्स असोसिएशन ऑफ पुणे'चे अध्यक्ष प्रशांत पानसरे म्हणाले.

माहिती तंत्रज्ञानातील (आयटी) पुण्याचे योगदान लक्षात घेऊन सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडियाच्या (एसटीपीआय) पश्चिम भारताचे मुख्यालय पुण्यात येणार असल्याची माहिती महानिदेशक डॉ. ओंकार राय यांनी दिली.

सॉफ्टवेअर एक्स्पोर्टर्स असोसिएशन ऑफ पुणे (सीप) आणि 'नॅसकॉम'ने आयोजित केलेल्या 'आयटी मीट'साठी डॉ. राय पुण्यात आले होते. आशियातील आयटी क्षेत्रात झपाट्याने विकसित होत असलेल्या पुण्याने माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडविली आहे. याआधी 'एसटीपीआय'चे पुण्यात हिंजवडी परिसरात केंद्र होते, मात्र याच ठिकाणी आता मुख्यालयही येत असल्याने नावीन्य, उत्पादन विकास, नवीन व्यवसाय उभारणीला अधिक प्रोत्साहन मिळणार आहे.

राय म्हणाले, ''पुण्यात नव्याने आयटी कंपन्या येत आहेत. भविष्यातील आयटी क्षेत्राचा विचार करून देशाच्या पश्चिम भागातील संबंधित कामकाज पुण्याला हलविण्याचा निर्णय घेतला आहे. आधी मुख्यालय मुंबईत होते. केंद्र सरकारच्या माहिती तंत्रज्ञान आणि दूरसंचार मंत्रालयामार्फत 'एसटीपीआय'ची

स्थापना झाली आहे. त्यानुसार १९९१ पासून आयटी क्षेत्राच्या विकासासाठी प्रयत्न केले जात आहेत.''

## पुण्यातून 'आयटी'ची निर्यात २९ हजार कोटींची

'देशभरातील सॉफ्टवेअर टेक्नोलॉजी पार्क अंतर्गत (एसटीपी) कंपन्यांमधून २०१२-१३ या आर्थिक वर्षात माहिती तंत्रज्ञानविषयक सेवांची सुमारे दोन लाख ५१ हजार कोटी रुपयांची निर्यात करण्यात आली. देशभरातील या निर्यातीमध्ये महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर असून पुण्याचा वाटा तब्बल २९ हजार कोटी रुपयांचा आहे,' अशी माहिती सॉफ्टवेअर टेक्नोलॉजी पार्क ऑफ इंडियाचे महासंचालक डॉ. ओंकार राय यांनी दिली.

देशभरातील एसटीपी अंतर्गत होणाऱ्या निर्यातीत कर्नाटक आघाडीवर असून २०१३-१३ या आर्थिक वर्षात कर्नाटकातून माहिती तंत्रज्ञानांशी निगडीत वस्तू-सेवांची ८१,००० कोटी तर महाराष्ट्रातून ५१ हजार कोटी रुपयांची निर्यात झाली. त्यामध्ये पुण्यातील एसटीपीमधी कंपन्यांचा वाटा २९ हजार कोटी रुपयांचा आहे. बेंगळुरूनंतर पुणे आघाडीवर असून पुण्याकडून येत्या काळात मोठ्या अपेक्षा आहेत.' असे डॉ. राय यांनी स्पष्ट केले.

एसटीपीमध्ये प्रत्यक्ष उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना (प्रॉडक्ट डेव्हलपमेंट कंपनी) भाडे आकारणीतील काही सवलती दिल्या जात आहेत. या उद्योजकांना सुरुवातीच्या भागभांडवलासाठी (रिस्क कॅपिटल) काही निधी देण्याबाबत विचार सुरू आहे.

'आयटी उद्योगांना चालना देण्यासाठी सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कतर्फे पुढील दीड वर्षात देशभरात दहा लाख चौरस फूट जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. यात राज्यातील नागपूर, नाशिक आणि औरंगाबाद या शहरांचा समावेश असणार आहे.

'आयटी सिटी' अशी बिरुदावली मिरवणाऱ्या पुण्यामधील सॉफ्टवेअर टेक्नोलॉजी (एसटीपी) पार्कमधील १४ हजार चौरस फूट जागा सध्या वापराविना पडून आहे. सवलतीचे गाजर दाखवले जात असतानाही 'एसटीपी'च्या धोरणांमधील विविध त्रुटी, शहरापासून दूर असलेली जागा, रेंगाळलेला आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प आणि पायाभूत सुविधांची कमतरता यामुळे आयटी कंपन्या 'एसटीपी' पासून दूर असल्याची माहिती डॉ. ओंकार राय यांनी दिली.

पुण्याजवळील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाचा प्रकल्प अजूनही रखडलेलाच आहे. पुण्यात अनेक मोठ्या बहुराष्ट्रीय आयटी कंपन्या आहेत. परंतु, पुणे अजूनही जगभरातील अनेक महत्त्वाच्या देशांशी हवाई मार्गाने थेट जोडले गेलेले नाही. त्याचाही फटका पुण्यातील आयटी कंपन्यांना बसतो आहे.

बहुतेक कंपन्यांकडून बेंगळुरला प्राधान्य दिले जात आहे.

‘अनेक आयटी कंपन्या छोट्या स्वरूपात कार्यरत आहेत. त्यांना हिंजवडी अथवा भोसरीसारख्या ठिकाणी कंपनी सुरू करणे शक्य होत नाही. त्यातच एसटीपीमध्ये गेल्यानंतरही तेथे सर्व मूलभूत सोयीसुविधा असतीलच याची खात्री नसते किंवा त्यांच्या उभारणीसाठी मोठा काळ लागतो. त्या पार्श्वभूमीवर एसटीपीकडे नोंदणी करून शहरातील स्वत:च्याच जागेत व्यवसाय करणे आयटी व्यावसायिकांसाठी फायद्याचे ठरते.’

## ‘स्वयंशिस्त रुजवू या’ पुस्तकाचे प्रकाशन

‘शिक्षा न करता मुलांवर संस्कार कसे करता येतील, याचा प्रसार व प्रचार सर्व पालकांमध्ये व शिक्षकांमध्ये होणे गरजेचे आहे,’’ असे मत दिग्दर्शक गिरीश गोडबोले यांनी व्यक्त केले.

‘अभय अभियान’च्या गौरी देशमुख, शुभदा जोशी, मिलिंद चव्हाण, बीना जोशी, कविता भागवत, संगीता शिंदे, जयश्री खुर्द यांनी एकत्र घेऊन प्रकाशित केलेल्या ‘स्वयंशिस्त रुजवू या सकारात्मक पद्धतीने’ या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी चित्रकार रमाकांत धनोकर, डॉ. मनीषा गुप्ते वगैरे उपस्थित होते.

गोडबोले म्हणाले, ‘‘शिक्षेबद्दल प्रौढांमध्ये असलेले मत बदलायला हवे. शिक्षा केल्याशिवाय मूल सुधारणारच नाही, हा देशातील स्वतंत्र पालक व शिक्षकांमध्ये झालेला गैरसमज दूर होणे गरजेचे आहे.’’

डॉ. गुप्ते म्हणाल्या, ‘‘धर्म-जातीमध्ये अडकणारे मुलांचे विचार दुसऱ्या धर्म व जातिविरोधात हिंसकता निर्माण करतात, मुले मानसिकदृष्ट्या हिंसक होणार नाहीत, याची काळजी पालकांनी घेणे आवश्यक आहे.’’

देशमुख म्हणाल्या, ‘‘शिक्षेमुळे बालकावर गदा तर येतेच, पण जी मुले जास्त शिक्षा भोगतात तीच जास्त हिंसक होतात. पालक व शिक्षक असे मुलांसोबत वागतात त्याचे अनुकरण भविष्यात ही मुले पालक झाल्यानंतर करतात.’’

## पदवीधर ग्रंथपालांना सुधारित वेतनश्रेणी

पदवीधर ग्रंथपालांना लवकरच सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी मिळणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्यातल्या शिक्षण विभागाला तसे आदेश दिले आहेत.

राज्य सरकारच्या नियमानुसार एक हजाराहून अधिक विद्यार्थी संख्या असणाऱ्या शाळांना पूर्णवेळ ग्रंथपाल नेमणे बंधनकारक आहे, या पदाची किमान शैक्षणिक पात्रता ग्रंथशास्त्रातील पदविका ही आहे. मात्र सध्या शाळांमध्ये काम करणारे हजारो ग्रंथपाल ग्रंथशास्त्रातले पदवीधारक आहेत. उच्च न्यायालयाने

२०११ मध्ये दिलेल्या आदेशानुसार ग्रंथपालांना ९,३०० ते ३४,८०० या दरम्यानची वेतन श्रेणी देण्याचे आदेश दिले होते. तरीही ग्रंथपालांना ५,२०० ते २०,२०० या श्रेणीनुसार वेतन देण्यात येत होते. या विरोधात ग्रंथपालांच्या संघटनेने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती.

राज्यात १२ जून २००९ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला. ग्रंथपालांवरील वा अन्यायाविरोधात शिक्षक आमदार रामनाथ मोरे यांनी शालेय शिक्षण विभागाकडे सातत्याने दाद मागितली होती.

## प्लॅस्टिक पिशव्यांपासून द्रव इंधन

विघटन होण्यास महाकठीण असणाऱ्या आणि वापरानंतर वाया जाणाऱ्या प्लॅस्टिक पिशव्यांचे रूपांतर पॉवर कारच्या इंधनात करण्यात भारतीय शास्त्रज्ञांना यश आले आहे. प्लॅस्टिक पिशव्यांचे रूपांतर इंधनात करण्यासाठी शास्त्रज्ञांनी तुलनेने कमी तापमानाची प्रक्रिया निर्माण केली आहे.

द्रव इंधनाच्या निर्मितीसाठी वापरण्यात आलेल्या कच्च्या मालात कंटेनर, वैद्यकीय, प्रयोगशाळातील उपकरणी, प्लॅस्टिक पिशव्या आणि कम्प्युटरचे सुटे भाग तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे कमी घनतेचे पॉलिमर (एलडीपी) वापरण्यात आले आहे. इंधनाच्या निर्मितीसाठी पुनर्वापर प्रक्रियेचा अवलंब करण्यात आला आहे. जगात सर्वत्र प्लॅस्टिकचा वापर वाढला असून, त्यावर प्रक्रिया न केल्याने ते तसेच वातावरणात पडून राहते, असे पडून राहिलेले प्लॅस्टिक पर्यावरणासाठी आणि सागरी जीवांसाठी अत्यंत घातक आहे.

'सॅच्युरी युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी'तील केमिस्ट अच्युतकुमार पांडा आणि 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, ओडिशा' येथील केमिकल इंजिनीयर रघुवंशकुमार सिंग या शास्त्रज्ञांनी 'एलडीपीई'चा वापर करून द्रव इंधनाची निर्मिती केली आहे. जगभरात निर्माण होणारे बहुतांश प्लॅस्टिक पेट्राकेमिकल्सद्वारेच तयार करण्यात येते. या पार्श्वभूमीवर नवीन संशोधनामुळे प्लॅस्टिकचा पुनर्वापर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच, दिवसेंदिवस संपुष्टात येणाऱ्या पेट्रोलियम पदार्थांना चांगला पर्याय निर्माण झाला आहे. या विषयाची संपूर्ण प्रक्रिया 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ एन्व्हायर्नमेंट अँड वेस्ट मॅनेजमेंट'मध्ये प्रकाशित झाली आहे.

## गोपालकृष्णन यांच्या मदतीतून होणार मेंदूविषयक संशोधन

वृद्धत्वात जडणाऱ्या मेंदूविषयक व्याधी आणि मेंदूच्या गणिती क्षमता यांचा अभ्यास करण्यासाठी इन्फोसिसचे कार्यकारी उपाध्यक्ष क्रिस गोपालकृष्णन यांनी भारतीय विज्ञान संस्थेला (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस) २२५ कोटी रुपयांची वैयक्तिक देणगी दिली आहे. संस्थेच्या १०५ वर्षांच्या इतिहासात

मिळालेली ही सर्वांत मोठी देणगी आहे.

प्रतीक्षा ट्रस्ट ही स्वयंसेवी संस्था क्रिस गोपालकृष्णन आणि त्यांच्या पत्नी सुधा यांनी स्थापन केली आहे. शिक्षण, संशोधन, नवीन कल्पनांचे आविष्करण आणि उद्योजकता यासाठी प्रतीक्षा ट्रस्ट देणग्या देते.

'आयआयएससी'ला संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी ही देणगी देण्यात येणार आहे. आयआयएससीचा कम्प्युटर सायन्स विभाग आणि मद्रास आयआयटीमध्ये तीन अध्यासने स्थापन करण्यासाठीही क्रिस निधी देणार आहेत.

'मेंदूचे कार्य समजावून घेणे हे प्रस्तावित संशोधन केंद्राचे ढोबळ उद्दिष्ट असेल,' असे मेंदूविज्ञान केंद्राच्या प्रमुख विजयलक्ष्मी रवींद्रनाथन म्हणाल्या. मेंदू वृद्ध कसा होतो आणि वृद्धापकाळात मेंदूतील कोणत्या घटकांचा ऱ्हास झाल्याने (न्यूरोडिजनरेटिव्ह कंडिशन) डिमेन्शियासारख्या व्याधी जडतात, याचा अभ्यास आम्ही करणार आहोत. या व्याधींचे प्राथमिक अवस्थेतच निदान करणे शक्य आहे का, ज्यांना या व्याधी जडल्या आहेत त्यांचे जीवनमान कसे सुधारता येईल, चांगले उपचार कसे मिळतील याबाबत आम्ही संशोधन करणार आहोत. कम्प्युटरचे आणखी प्रगत मॉडेल तयार करण्याच्या दृष्टीने मानवी मेंदू आणि कम्प्युटर यांतील परस्परसंबंधही अभ्यासणार आहोत. मानवी मेंदू हे अजूनही पूर्णपणे न उलगडलेले कोडे आहे. भविष्यात वैद्यकीय संशोधन आणि कम्प्युटर यांची सांगड घालणाऱ्या अभ्यासाला चालना देण्यासाठी हे केंद्र महत्त्वाचे ठरेल.

## 'आर्थिक सहकार्यातूनच भारत, अमेरिका संबंध दृढ'

आर्थिक सहकार्यानेच भारत आणि अमेरिका हे दोन देश परस्परांच्या अधिक जवळ येतील, असा विश्वास अमेरिकेतील मॅडलेन अलब्राइट स्टोनब्रिज गटाचे वरिष्ठ संचालक रेमंड व्हिकरी यांनी व्यक्त केला. पुणे इंटरनॅशनल सेंटरतर्फे (पीआयसी) रेमंड व्हिकरी यांचे व्याख्यान नुकतेच आयोजित करण्यात आले होते. 'मराठा चेंबर'चे अध्यक्ष एस. के. जैन, पीआयसीचे उपाध्यक्ष आणि ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ विजय केळकर, ज्येष्ठ पत्रकार दिलीक पाडगावकर उपस्थित होते. 'भारत आणि अमेरिका या जगातील सर्वात मोठ्या लोकशाही शक्ती आहेत. त्यांचे दुरावलेले संबंध, विकासामध्ये धोरणात्मक भागीदार होण्याइतके सुधारले आहेत. आर्थिक सहकार्याने हे संबंध अधिक सशक्त होतील,' असे व्हिकरी यांनी सांगितले. द्विपक्षीय आर्थिक योजनांमुळे भारत आणि अमेरिकेमध्ये परस्पर विश्वासाचा पक्का पाया घातला गेला आहे. यामुळे आपण शांतता आणि समृद्धीकडे जात आहोत. ऊर्जा क्षेत्रामध्ये या दोन देशांमध्ये मोठ्या प्रमाणात सहकार्य होऊ शकते. अलिकडे घडलेल्या काही दुर्दैवी घटनांमुळे, माध्यमांमध्ये आणि लोकांमध्ये काही नाराजी जरी निर्माण झाली असली, तरीही उभयपक्षीय संबंध सशक्त होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## ‘आयआरएस २०१३’ची आकडेवारी तर्कहीन

इंग्रजी वृत्तपत्रांच्या मुंबईतील एकूण वाचकांत २०.३ टक्के वाढ, तर दिल्लीत याच संख्येत १९.५ टक्क्यांची घट. पंजाबमधील एकूण वृत्तपत्र वाचकसंख्या एका वर्षात एक तृतीयांश इतकी घटली, तर हरयाणात १७ टक्के वाढली... असे अचंबित करणारे अनेक निष्कर्ष सन २०१३च्या ‘इंडियन रीडरशिप सर्व्हे’ (आयआरएस) अंतर्गत नोंदवण्यात आले आहेत. ते ‘पूर्णपणे तर्कहीन व तथ्यहीन’ असल्याचे जाहीर करून ‘द टाइम्स ऑफ इंडिया’सह देशभरातील १८ वृत्तपत्रांनी फेटाळले आहेत.

देशभरातील वृत्तपत्रांच्या वाचकसंख्येचे सर्वेक्षण दरवर्षी ‘आयआरएस’ अंतर्गत केले जाते. सन २०१३ मधील ‘आयआरएस’चे निष्कर्ष नुकते जाहीर झाले. त्यात असंख्य त्रुटी व विरोधाभास असल्याचे स्पष्ट झाले आहे. अनेक राज्यांतील, शहरांतील वृत्तपत्र वाचकसंख्येत नोंदवण्यात आलेली वाढवा घट ही अविश्वसनीय पातळीवरची आहे. आंध्र प्रदेशातील सर्व भाषांतील वृत्तपत्रांच्या वाचकसंख्या वाढीचा वेग ३० ते ६५ टक्के कमी झाल्याचा दावा ही आकडेवारी करते. ‘हिंदू बिझनेस लाइन’च्या मणिपूरमधील वाचकांची संख्या चेन्नईमधील वाचकसंख्येच्या तिप्पट असल्याचे हे सर्वेक्षण सांगते. नागपूरमधील ‘हितवाद’ या इंग्रजी वृत्तपत्राची नोंदणीकृत वाचकसंख्या ६० हजार असताना आयआरएसच्या लेखी मात्र या वृत्तपत्राचा एकही वाचक नोंदवण्यात आलेला नाही.

हे सर्वेक्षण ‘आरएससीआय’ व ‘एमआरयूसी’ यांनी केले आहे. या दोघांनी हे सर्वेक्षण तातडीने मागे घ्यावे व सध्या चालू असलेले सर्वेक्षणही थांबवावे, अशी मागणी केली आहे.

द टाइम्स ऑफ इंडिया, जागरण, भास्कर, इंडिया टुडे, आनंदबझार पत्रिका, लोकमत, आऊटलुक, डीएनए, साक्षी, द हिंदू, अमर उजाला, द ट्रिब्यून, वर्तमान पत्रिका, द स्टेट्समन, मिड डे, नई दुनिया, दिनकरन यांनी या सर्वेक्षणाच्या निष्कर्षांना विरोध केला आहे.

## ‘वासुदेव मुलाटे यांच्या निवडक कथा’चे प्रकाशन

‘वासुदेव मुलाटे यांच्या निवडक कथा’ या डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी संपादित केलेल्या संग्रहाचे प्रकाशन सतीश काळसेकर यांच्या हस्ते झाले. पत्रकार महावीर जोंधळे, लेखक मनोहर जाधव, मनोविकास प्रकाशनाचे अरविंद पाटकर उपस्थित होते.

“मराठी साहित्यातील वास्तव हे गुंतागुंतीचे असल्याने कित्येकदा त्यातील महत्त्वपूर्ण लेखन दुर्लक्षित राहते. किंबहुना, वाचकापर्यंतही ते लेखन समर्पक-रीत्या पोचत नाही. हे चित्र बदलायला हवे. समकालीन लेखकांनी एकत्रितरित्या नवनिर्मितीचा ध्यास घेऊन आपले साहित्य वाचकांपर्यंत पोचवावे,” असे मत

कवी सतीश काळसेकर यांनी व्यक्त केले.

ते म्हणाले, ''साहित्याची परंपरा ही काळानुसार बदलत राहते. प्रवाहाप्रमाणे लेखनशैलीही बदलते. त्यामुळे बदलत्या लेखनाला वाचकांनी प्रतिसाद द्यायला हवा. लेखनशैलीतील वेगळेपणा वाचकांसाठी महत्त्वाचा असतो. वासुदेव मुलाटे यांच्या कथांमधून जीवनानुभव, वास्तव, नातेसंबंधातील गुंतागुंत व उत्कटता समर्पकपणे प्रकट झालेली दिसून येईल.''

जोंधळे म्हणाले, ''कथालेखनाची शैली वेगळी असते; पण त्या लेखनातूनच लेखकाचा जीवनानुभव उलगडत जातो. त्यातील वेगळेपण शोधून दुर्लक्षित साहित्य वाचकांसमोर आणले पाहिजे. मराठीतील समीक्षक साहित्यकृतीतील वेगळेपणा शोधण्याचा प्रयत्न करत नसल्याने नव्या लेखकांच्या साहित्याला प्रोत्साहन मिळत नाही.''

## अन्य भाषांतील शब्दांमुळे मराठी समृद्धच होईल

जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित ग्रंथोत्सवामध्ये 'मराठी भाषेच्या संवर्धनात प्रसारमाध्यमांची भूमिका' या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. 'अंतर्नाद'चे संपादक भानू काळे, 'महाराष्ट्र टाइम्स'चे निवासी संपादक पराग करंदीकर, 'पुढारी'चे कार्यकारी संपादक संजय आवटे, लेखक संजय आर्वीकर हे या परिसंवादामध्ये सहभागी झाले होते. ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे यांनी सूत्रसंचालन केले.

'जागतिकीकरणाच्या स्पर्धेत प्रसारमाध्यमांनीच मराठी भाषेला दिमाखात उभे केले आहे. यामुळेच अन्य भाषांमधील वृत्तसमूह मराठी वर्तमानपत्रे काढत आहेत. इतर भाषांमधील शब्द मराठीत आल्याने मराठीचे नुकसान होणार नाही. ती अधिक समृद्धच होईल,' असा सूर परिसंवादात उमटला.

प्रमाण भाषा टिकण्याची गरज आहे असे सांगताना काळे म्हणाले, 'प्रमाण भाषा कोणताही वाद न होता टिकणे हे भाषा संवर्धनासाठी गरजेचे आहे. मराठी भाषा व साहित्य टिकावे, असे लेखन प्रसारमाध्यमांनी केले पाहिजे.'

शासनाचा मराठी भाषा कोश जड शब्दांत असल्याने सामान्य माणसांना ती समजणे अवघड जाते. सर्वसामान्यांसाठी हा सोप्या भाषेत देण्याची गरज आहे. वर्तमानपत्रांनी आपली पारंपरिक भाषा बदलण्याची गरज आहे, असे मत या वेळी व्यक्त करण्यात आले.

## वादग्रस्त पुस्तक : 'द हिंदूज...' पेंग्विन कडून मागे

पेंग्विन इंडिया या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या अमेरिकन इतिहासतज्ज्ञ वेंडी डॉनिअर यांनी लिहिलेल्या 'द हिंदूज् : ॲन अल्टरनेटिव्ह हिस्ट्री' या पुस्तकाच्या प्रती बाजारातून मागे घेण्याचे ठरवले आहे. दिल्लीच्या

'शिक्षा बचाओ आंदोलन कमिटी'ने या पुस्तकामध्ये अनेक त्रुटी असल्याचे कारण देत कोर्टात धाव घेतली होती.

जगातील एका पुरातन धर्माबाबतचे समज आणि इतिहास एका पर्यायी वस्तुस्थितीच्या स्वरूपात समोर मांडण्यात आलेला आहे. ८०० पानांचे हे पुस्तक २००९मध्ये प्रसिद्ध झाले असून त्यात अधिकृत नोंद असलेल्या इतिहासातील बाबी आणि काल्पनिक गोष्टी एकत्र गुंफलेल्या आहेत. या पुस्तकाच्या लेखिका डॉनिजर या हिंदू धर्मसंदर्भातील एक नावाजलेल्या संशोधक मानल्या जातात.

पेंग्विनच्या या निर्णयाबद्दल सर्व क्षेत्रांतून अत्यंत तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. हा अतिशय दुर्दैवी निर्णय असून हे पुस्तक कोणत्याही प्रकारे अवमानकारक नाही, अशी प्रतिक्रिया केंद्रीय मंत्री जयराम रमेश यांनी नोंदवली आहे. 'तालिबानी गटाने द्यावी तशा प्रकारची ही धमकी आहे. आपल्याकडील स्वतंत्र आणि मुक्त विचारसरणीच्या हे विरोधात आहे. पेंग्विनने या निर्णयाचा पुनर्विचार करावा,' असे त्यांनी म्हटले आहे.

## सिंधुताई सपकाळ यांच्यावर लघुपटाची निर्मिती

ज्येष्ठ समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांच्या जीवनावर आधारित अनाथांची यशोदा या लघुपटाचे बालगंधर्व रंगमंदिर येथे १६ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध दिग्दर्शक महेश मांजरेकर, भारती विद्यापीठाचे कुलगुरू शिवाजीराव कदम, प्रसिद्ध उद्योजक डी. एस. कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्या उपस्थितीत प्रकाशन झाले.

सामाजिक कार्यकर्ते आणि उद्योजक परेश भोसले यांनी आपल्या भार्गव फिल्मस अँड प्रॉडक्शनतर्फे हा लघुपट तयार केला आहे. या लघुपटात सिंधुताईंच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे तसेच त्यांची विविध विषयांवरील निर्भीड मते मांडण्यात आली आहेत. ''आपल्या आयुष्यावर आधारित यापूर्वी चित्रपट तयार करण्यात आला आहे. मात्र त्यात आपल्या कार्याची फारशी माहिती देण्यात आलेली नाही. ती या लघुपटाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचू शकेल,'' असे सिंधूताई सपकाळ यांना वाटते.

## डॉ. गणेश देवी यांचा सत्कार

'आयुष्यात हजारो हातांनी मदत केल्यावर आपल्या हातून छोटेसे काम घडून जाते. पुढे कधीतरी त्याला चेहरा मिळतो. याच धारणेतून भाषेसंदर्भात झालेल्या कामाचा चेहरा मी आहे. मी काय काम केले हे माहित नाही. मात्र काम करण्याची गरज आहे, याची जाणीव आहे. समाजात चांगल्या कामाची दखल घेतली जाते ही आशादायी गोष्ट आहे.' असे उद्गार डॉ. गणेश देवी यांनी काढले.

मराठी प्रकाशक परिषद आणि महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या संयुक्त

विद्यमाने भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण या महाप्रकल्पाचे प्रमुख डॉ. गणेश देवी यांचा 'पद्मश्री' सन्मानाबद्दल सिम्बायोसियचे कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रकाशक परिषदेचे अध्यक्ष रमेश कुंदूर, कार्याध्यक्ष अरुण जाखडे, डॉ. माधवी वैद्य, भोरच्या अनंतराव थोपटे कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रसन्न देशमुख, ज्येष्ठ पत्रकार विनय हर्डीकर, डॉ. नीलिमा गुंडी या वेळी उपस्थित होते.

भोर येथे एका गरीब कुटुंबात जन्म... दोन वेळचे पोट भरण्याची मारामार, अशा परिस्थितीवर मात करून घेतलेले शिक्षण... त्यातून मिळालेले जगण्याचे बळ अन् तेथून पुढे झालेला समृद्ध प्रवास.. तरीही गरीब, आदिवासी, भटक्या-विमुक्तांशी जोडलेली नाळ... या आपल्या प्रवासाला भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी यांनी उजाळा दिला.

'आधुनिक काळात मराठी भाषा मरणार नाही हे निश्चित असले तरी मराठी सामान्य माणसाला व्यवसाय देऊ शकणार का, हा महत्त्वाचा मुद्दा आहे – व्यवसाय देऊ न शकणाऱ्या भाषेचा अट्टाहास का धरायचा हा खरा प्रश्न आहे,' असा सवाल मुजुमदार यांनी उपस्थित केला.

अर्चना साने यांनी सूत्रसंचालन केले. अनिल कुलकर्णी यांनी आभार मानले.

## आधुनिक भारतातील धर्मचिंतन

"सध्याच्या काळातील नवधर्मवाद ताणतणाव निर्माण करणारा असून, तो आपणास आत्ममग्न करू पाहत आहे. एकोणिसाव्या व विसाव्या शतकात झालेल्या धर्मचिंतनाने व्यक्तीला समाजमग्न करण्याचा विचार पुढे आणला. अशा समाजमग्नेतचा अंगीकार करणे समाजहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे." असे मत राज्यशास्त्राचे अभ्यासक डॉ. यशवंत सुमंत यांनी पुणे विद्यापीठाच्या संत नामदेव अध्यासनातर्फे आयोजित 'आधुनिक भारतातील धर्मचिंतन' या विषयावर बोलताना व्यक्त केले. उदारमतवाद आणि धर्मचिंतन व बहुजनवाद आणि धर्मचिंतन या विषयांवरही चर्चा झाली. डॉ श्रीपाल सबनीस, प्रा. वीणा आलासे, डॉ. राजा दीक्षित, प्रा. प्रवीण चव्हाण, डॉ. श्रीनिवास हेमाडे, डॉ. दीप्ती गंगावणे यांनी ही विचार मांडले. अध्यासनाचे प्रमुख डॉ. अविनाश आवलगावकर, डॉ. ओमश्रीश श्रीदत्तोपासक उपस्थित होते.

एकोणिसाव्या शतकातील धर्मचिंतन सामाजिक अंगाने विकसित झाले, तर विसाव्या शतकातील धर्मचिंतन राष्ट्रवादाच्या भूमिकेतून घडले, असा फरक सांगताना नवा समाज बांधताना मूल्यांची बैठक कशी असावी, हे डॉ. सुमंत यांनी स्पष्ट केले.

राजा राममोहन रॉय यांच्याविषयी डॉ. आलासे म्हणाल्या, "टोकाचे बुद्धिप्रामाण्यवादी असणारे रॉय पुढे उदारमतवादाच्या दिशेने गेले. इस्लाम व

ख्रिश्चन धर्मांचे तार्किक विश्लेषण त्यांनी केले. स्वप्नपूर्ती व सहानुभूती यांच्या संगमातून सुदृढसमाज निर्माण होत असतो हे रॉय यांच्या विचारांत दिसून येते.''

न्या. रानडे यांच्याविषयी डॉ. दीक्षित म्हणाले, ''भागवत धर्म आणि राष्ट्रीय ऐक्य यांची एकत्रित मांडणी रानडेंच्या विचारात दिसून येते. विवेक व वैराग्य यांचा विचार त्यांनी समाजासमोर उभा केला.''

व्यक्तिस्वातंत्र्याची अत्युच्च आस महात्मा फुले यांच्या विचारांत दिसते. लोक एकत्र आल्याशिवाय स्वतंत्र देशाची संकल्पना उभी राहणार नाही असे त्यांचे मत होते, असे चव्हाण यांनी स्पष्ट केले. आधुनिक काळात न्याय हा धर्माच्या मूल्यमापनाचा निकष असला पाहिजे हा विचार आंबेडकरांनी मांडला, असे डॉ. गंगावणे यांनी सांगितले.

## योगदा संस्थेला पुरस्कार

'साहित्य ज्ञान देत नाही, तर ज्ञानाची प्रचिती देते. तद्वतच आत्मस्वरूपाची प्रचिती योगअभ्यासातून मिळते,' असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

साहित्य समन्वय महासंघातर्फे योगदा या संस्थेचा सन्मान डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा आशा सुरपुर यांनी सन्मान स्वीकारला.

योगाभ्यास आणि साहित्य याविषयी डॉ. कुलकर्णी म्हणाले, 'देवाचा मानव आणि मानवाचा माणूस घडविण्याची शक्ती योगामध्ये आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीची निर्मिती योगावस्थेतूनच केली. योगाभ्यासातून श्रेष्ठ साहित्याची निर्मिती होते. माणूस जन्मापासून अस्तित्वाची विविध आवरणे घेऊन वावरत असतो. जगताना जात, धर्म, पंथ, नाव अशी अजून काही आवरणे चढतात. मात्र योगाभ्यासाने ही आवरणे दूर होऊन आत्मस्वरूपाची ओळख होते. योगाभ्यासाच्या जोरावर रुग्णांना स्वयंपूर्ण करण्याचे काम योगदा संस्थेमध्ये केले जाते. निरोगी जीवनासाठी योग महत्त्वाचा ठरतो.' पुरस्कार वितरणानंतर निमंत्रित कवींनी आपल्या रचना सादर केल्या.

## दोन वर्षांत नव्या ग्रंथालयांचे प्रस्तावच नाहीत

सर्वसामान्यांमध्ये वाचन संस्कृतीच्या वृद्धीसाठी ग्रामीण भागातील सरकारमान्य ग्रंथालये महत्त्वाची भूमिका बजावतात. मात्र, ग्रंथालयांच्या पडताळणीचे काम अद्याप पूर्ण झालेले नसल्याने गेल्या दोन वर्षांत नवी ग्रंथालये सुरू झालेली नाहीत.

राज्य सरकारकडून ग्रंथालयांना वाचनवृद्धी आणि विकासाच्या दृष्टीने आर्थिक मदत म्हणून अनुदान देते. दोन वर्षांपूर्वी राज्यभरातील ग्रंथालयांचा कारभार तपासण्यासाठी ग्रंथालय संचालनालय आणि महसूल विभागाने

पडताळणी केली होती. या पडताळणीचा अहवाल राज्य सरकारला सादर करण्यात आला. या अहवालातील शिफारशींनुसार अकार्यक्षम ग्रंथालये बंद करण्यात आली. काहींना दर्जा सुधारण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या संदर्भात ग्रंथालय संचालक डॉ. बा. ए. सनान्से यांनी माहिती दिली. 'ग्रंथालयांच्या पटपडताळणीची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही, ग्रंथालयांबाबतच्या काही निर्णयांना राज्य सरकारकडून अद्याप मंजुरी मिळणे बाकी आहे. त्यामुळे नव्या ग्रंथालयांच्या प्रस्तावांचा विषयही प्रलंबित राहिला आहे.'

## 'देवकणाची कहाणी!' एडिंबरा विद्यापीठाची ऑनलाइन लेक्चर्स

नोबेल पारितोषिक विजेते भौतिकशास्त्रज्ञ पीटर हिग्ज यांच्या ज्या संशोधनामुळे गॉड पार्टिकलचा (देवकण) शोध लागला, त्या संशोधनकार्याचा अभ्यास करू इच्छिणाऱ्यांसाठी एका ऑनलाइन कोर्सची निर्मिती करण्यात आली आहे. १० हजारांहून अधिक लोकांनी या कोर्ससाठी नावनोंदणी केली आहे. ब्रिटनमधील एडिंबरा विद्यापीठाने सुरू केलेला 'द डिस्कव्हरी ऑफ द हिग्ज बोसॉन' हा कोर्स सात आठवड्यांचा आहे. 'गॉड पार्टिकल थिअरी' विकसित करताना पीटर हिग्ज एडिंबर्ग विद्यापीठातच कार्यरत होते.

स्वित्झर्लंडमध्ये लार्ज हैड्रोन कोलायडर कशा प्रकारे उभारण्यात आला, त्यासाठी विज्ञानातील प्रगतीचा कशा प्रकारे फायदा झाला आणि त्यातून जुलै २०१२ मध्ये हिग्ज बोसॉन कणाचा शोध कसा लागला, याची माहिती या कोर्समध्ये मिळते.

कम्प्युटर आणि इंटरनेटचा ॲक्सेस असलेली कोणीही व्यक्ती या कोर्समध्ये सहभागी होऊ शकते असे विद्यापीठाने म्हटले आहे.

या व्याख्यानांचा लाभ घ्यायचा असेल, तर पुढे दिलेल्या लिंकवर 'साइन अप' करा https//www.futurelearn.com/coureses/higgs

## वेअरेबल पुस्तक

पुस्तके वाचताना मनात झिरपणारा अनुभव त्याचक्षणी प्रत्यक्षात तसाच अनुभवता आला तर?

एमआयटीच्या वैज्ञानिकांनी तेच साधले आहे...

आतापर्यंत तुम्ही पुस्तके वाचली असतील, तसेच बदलत्या टेक्नॉलॉजीबरोबर ई-बुक्स किंवा ऑडिओ बुक्सपर्यंत तुमची मजल गेली असेल. आता तुम्हाला पुस्तके अनुभवताही येतील. म्हणजे पुस्तकातील कथानायकाला बसचा धक्का बसला तर बसल्या जागी बसमध्ये बसल्याप्रमाणे तुम्हालाही धक्का जाणवेल. पुस्तकातील नायकाला वाटते तेच तुम्हाला पुस्तक वाचताना वाटू लागेल. हे सर्व आपल्याला आज काल्पनिक वाटेल, परंतु मॅसॅच्युसेट्स इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी)च्या मीडिया लॅबने असे खरेखुरे

अनुभव देणारे ‘वेअरेबल’ पुस्तक खरोखरच तयार केले आहे.

एमआयटीच्या मीडिया विभागाने सेन्सरी फिक्शन या प्रकल्पात ‘द गर्ल हू वॉज प्लगड् इन’ नावाचे अनोखे पुस्तक तयार केले. या पुस्तकाला एकूण १५० एलईडी लाइटचे दिवे असून वाचकाला अंगावर घालता येतील, अशी कोटासारखी यंत्रे जोडली आहेत. लाइट्स आणि यंत्राच्या मदतीने पुस्तकातील गोष्ट प्रत्यक्षात अवतरणार आहे. ज्याप्रमाणे गोष्टीतील प्रसंग घडतील तसा एलईडी लाइटमधील प्रकाश कमी-जास्त होईल, अंगावरील ‘वेअरबेल’ यंत्रे पुस्तकातील प्रसंगाला अनुसरून कंपने तयार करतील. त्यामुळे वाचकाला आपण स्वत: त्या गोष्टीचा भाग असल्याचा भास होईल.

एखाद्या परिच्छेदात काही धक्कादायक घडत असेल तर शरीरावरील यंत्रांमुळे व्हायब्रेशन होऊन वाचकांचे हार्टबिट्स वाढतील. एखाद्या रोमॅन्टिक प्रसंगी एलईडी लाइट्सचा प्रकाश मंद होताना दिसेल. एखादा उत्कंठावर्धक प्रसंग असल्यास वाचकाच्या शरीराचे तापमान थोडे वाढेल.

सेन्सर्स असणाऱ्या पुस्तकामुळे गोष्टीतील प्रसंग, भावना, वातावरण अनुभवता येणार असले तरी पुस्तक वाचताना संपूर्ण यांत्रिकीकरण टाळण्याचा प्रयत्न संशोधकांनी केला आहे. पुस्तक वाचून मनात तयार होणारे विश्व आणि त्याचा प्रत्यक्ष आयुष्यात केलेला वापर यात मोठा फरक असल्याचे मत काही लेखकांनी व्यक्त केले आहे.

## सूर्यपुत्र, शनी आणि इतर ग्रह

ज्या वायूमेघाचे वस्तूमान/आकार खूप मोठा असतो, त्यांच्यातल्या अणूंचा मोठ्या संख्येमुळे होणाऱ्या आकर्षणातून तो मेघ आकुंचन पावत खूप दाट होतो आणि ऊर्जेची उलाढाल/घालमेल करत तारा होतो असे एक गृहितक आहे. ज्या वायूमेघातून शनी हा ग्रह झाला ती वायूमेघ ह्या परीक्षेत काठावर नापास झाला, ग्रह बनला आणि सूर्याभोवती फिरू लागला असा एक वैज्ञानिक कयास आहे.

आपण शनीला सूर्यपुत्र मानतो. पुढे शनी विरळ झाला असणार, कारण सध्या तो गुरू ह्या ग्रहापेक्षा वस्तुमानाने लहान आहे. परंतु तो गुरूच्या मानाने सूर्यापासून दूर आहे. त्यामुळे त्याला सूर्याभोवती प्रदक्षिणा घालायला वेळ लागतो. संस्कृतमध्ये शनै शनै ह्या अर्थ हळू हळू असा आहे; म्हणून शनीला शनी असे नाव आहे. शनीला भाव आहे हे मात्र नक्की.

नवग्रहांचे संस्कृतमधले वर्णन सूर्यचंद्र मंगलश्च बुधश्चपि बृहस्पति: । शुक्र: शनिश्वरौ राहुकेतूश्चेति । ग्रहा नव: ।। ह्यातले राहूकेतू अस्तित्वातच नाहीत. सूर्य तारा आहे, चंद्र उपग्रह आहे. उरलेल्यात शनीला शनीश्वरी अशी पदवी बहाल करण्यात आली आहे. इथला बृहस्पती म्हणजे गुरू हा सगळ्यात मोठा ग्रह. सगळ्या ग्रहांची बेरीज केली तरी त्याहून हा मोठा. जितके जास्त वस्तुमान, तेवढे

आगामी

T- BOOK २४ मधील दुसरे पुस्तक

# द प्रॉफेट मर्डर्स

मूळ लेखक
मेहमेत मुरात सोमेर

तुर्की तून इंग्लिश अनुवाद
केनेथ डकन

अनुवाद
जयंत गुणे




इस्तंबूलमध्ये काहीतरी विलक्षण घडत आहे. एक पिसाट खुनी मोकाट सुटला आहे आणि शहरातील ट्रान्सव्हस्टाईटचे एकापाठोपाठ एक खून चालले आहेत. प्रत्येक खुनानंतर परिस्थितीचा गुंता वाढत चाललाय. या कथानकाचा नायक हा इस्तंबूलच्या रंगेल जीवनातील एक प्रख्यात असामी असतो. तो दिवसा संगणकतज्ज्ञ व रात्री ट्रान्सव्हस्टाईट असे दुहेरी आयुष्य जगत असतो. दिवस मावळल्यानंतर ओठांना लिस्पटीक लावून तो स्त्रीवेशात या खुनांचा शोध घ्यायचं ठरवतो खरं; पण खुनांच्या मागे असलेल्या माथेफिरू शक्तींचा सामना करणं वाटतं तेवढं सोपं नसतं आणि प्रकरण अंगावर शेकण्याची वेळ येते. कथानायिकेच्या रूपातील आपला कथानायक त्यातून मोठ्या चातुर्याने मार्ग काढतो. ट्रान्सव्हस्टाईट, समलिंगी वेश्यांच्या अनोख्या जीवनावर आधारित विनोदी धाटणीची चातुर्यकथा.
अशा प्रकारचा किंचित चावट पण प्रसंगनिष्ठ व बौद्धिक विनोदी मराठीत प्रथमच येत आहे.

आगामी

T- BOOK २४ मधील तिसरे पुस्तक

# द किस मर्डर

मूळ लेखक
मेहमेत मुरात सॉमर

अनुवाद
जयंत गुणे




दिवसा एक बुद्धिमान, साहसी पुरुष आणि रात्री सुंदर नखरेल स्त्री असं दुहेरी आयुष्य जगत असलेली व्यक्ती इस्तंबूलच्या नाइट लाइफमध्ये ‘छेलछबेली’ म्हणून प्रसिद्ध असते. स्त्रीवेषात ती ऑड्रे हेपबर्नसारखी दिसते. सूर्य मावळताच तिची पावले तिच्या मालकीच्या नाइट क्लबकडे वळतात. एक दिवस तिच्या एका कर्मचाऱ्याचा खून होतो. आपले चातुर्य आणि मार्शल आर्ट पणाला लावून ती खुन्यांचा शोध घेते.

मेहमत मुरात सॉमर यांच्या या धक्कादायक, उत्साहवर्धक आणि शेवटपर्यंत खिळवून ठेवणाऱ्या कादंबरीने रहस्यकथांच्या विश्वात खळबळ उडवून दिली.

त्यांचे आकर्षण जास्त म्हणून आकाशातल्या आकर्षणाला गुरुत्वाकर्षण असे म्हटले जाते. आकाशातल्या आपल्या आसपासच्या ग्रहामध्ये शुक्र जरा तळपतो, सुंदर दिसतो म्हणून तो सौंदर्याचे प्रतीक. बुध सूर्याच्या सर्वांत जवळ. झटपट प्रदक्षिणा घालतो म्हणून शीघ्रबुद्धीचा आणि मंगळ पृथ्वीचा मुलगा आहे अशी समजूत म्हणून त्याला भीमु नाव दिले आहे. मुलगा असूनही तो कुंडलीत त्रास देतो. म्हणून अमंगळ. भौमा नाम मंगळु ३५/१५ ज्ञा. अशी उपरोधपूर्ण ओवी आहे. शेवटी ग्रह ह्या शब्दाचा अर्थ कल्पना/ समजूत असा आहे.

## प्रबोधनकार ठाकरे साहित्य संमेलन

बहुजन विकास साहित्य परिषदेतर्फे प्रबोधनकार ठाकरे साहित्य संमेलनाचे आयोजन २३ फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते. या संमेलनाचे उद्‌घाटन शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि माजी गृहराज्यमंत्री गजानन कीर्तिकर यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला डॉ. रंगनाथ पठारे, अभिनेते सयाजी शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्रा. रा. रं. बोराडे होते.

'परिवर्तनवादी चळवळ आणि समाजवास्तव'या विषयावरील परिसंवादात डॉ. साहेबराव खंदारे, महावीर जोंधळे, प्रा. संतोष पवार यांचा सहभाग होता. ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अनिल अवचट यांची मुलाखतही झाली.

डॉ. विठ्ठल वाघ यांना साहित्य गौरव आणि रविमुकुल यांना कलागौरव पुरस्काराने गौरवण्यात आले. प्रत्येकी अकरा हजार रुपये, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

प्रा. फ. मुं. शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कथाकथनात हिंमत पाटील, अरुण गिरी सहभागी होते. ज्येष्ठ कवी - वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कविसंमेलनात प्रकाश होळकर, नारायण सुमन, अशोक थोरात, संध्या रंगारी, प्रकाश घोडके, अस्मिता चांदणे, भरत दौंडकर, विष्णू थोरे, रमजान मुल्ला, प्रदीप जाधव, तुकाराम धांडे सहभागी झाले होते. संमेलनाचे स्वागताध्यक्ष बाळासाहेब भांडे होते.

## चौथे अपंग साहित्य संमेलन

अपंग साहित्य व सांस्कृतिक परिषदेच्या वतीने चौथे अपंग साहित्य संमेलन पुण्यामध्ये संपन्न झाले. कोल्हापूरच्या सोनाली नवांगुळ अध्यक्ष होत्या. अपंग साहित्यिकांच्या अभिव्यक्तींना हक्काचे व्यासपीठ देण्याबरोबरच त्यांच्या दररोजच्या संघर्षाला बळ देणे हा या संमेलनाचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

संमेलनाच्या उद्‌घाटनाला माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष फ. मुं. शिंदे आणि अपंग कल्याण विभागाचे मुख्य आयुक्त

प्रसन्न कुमार उपस्थित होते. वैकुंठ कुंभार हे या संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. या दोन दिवसांच्या संमेलनात निमंत्रितांचे कविसंमेलन, सांस्कृतिक कार्यक्रमांसह तंत्रज्ञानातून अपंगत्वावर मात, अपंगत्व-पालकत्व विषयांवर परिसंवाद झाले. समारोपाच्या कार्यक्रमाला खासदार संजय काकडे, आमदार बच्चू कडू, 'एमआयटी'चे संस्थापक विश्वनाथ कराड उपस्थित होते. निमंत्रक बापू बोभाटे, संयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. रवींद्र नांदेडकर, कार्यवाह नीलेश छडवेलकर हे होते.

तिसरे अपंग साहित्य संमेलन कराडमध्ये भरविण्यात आले होते. त्या संमेलनानंतर संयोजन समितीकडे काही निधी उरला होता, त्यातील बावीस हजार रुपयांची मदत गोविंद पवार या अपंग कलाकाराला करण्यात आली. या रकमेतून मिळालेल्या वाद्यांच्या मदतीने गोविंद पवार विविध कार्यक्रम करत स्वयंपूर्ण झाले आहेत. ते विशेषत: शासकीय योजनांच्या जनजागृतीचे काम करतात.

चौथ्या अपंग साहित्य संमेलनाची सुरुवात वालुका शिल्पाच्या पूजनाने झाली. अकोल्याचे राजेश तावरी यांनी सुमारे बारा क्विंटल वाळूपासून सरस्वतीची मूर्ती तयार केली. वेद वासुदेव प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजितकृष्ण तुकदेव यांच्या हस्ते पूजा करण्यात आली.

## अभिजात भाषेचा दर्जा मराठीला मिळावा

मराठी ही तोडणारी नाही, तर जोडणारी भाषा आहे. मराठीमध्ये इतर भाषांना सामावून घेण्याची ताकद आहे. संगीत, नाटक, साहित्य चळवळींनी मराठी भाषा समृद्ध असून, तिला अनेक शतकांचा वारसा आहे. त्यामुळे मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्याच्या मागणीला पाठिंबा असल्याचे ज्येष्ठ भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी यांनी सांगितले. तसेच अभिजात भाषा निवड समितीचा सदस्य म्हणून मराठीला हा दर्जा मिळण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याच्या प्रक्रियेविषयी डॉ. देवी म्हणाले, 'अभिजात दर्जा मिळण्याची प्रक्रिया प्रत्येक भाषेबाबत वेगळी असते. त्यामुळे मराठी भाषेला हा दर्जा मिळण्यात किती वेळ जाईल हे निश्चितपणे सांगता येणार नाही. याबाबतचा अहवाल आधी गृह मंत्रालय आणि त्यानंतर मंत्रिमंडळात मंजुरीसाठी जातो. त्यानंतर दर्जा जाहीर केला जातो. मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यास नवीन आत्मविश्वास निर्माण होईल.'

भारतीय भाषांच्या लोकसर्वेक्षणाबद्दल त्यांनी माहिती दिली. महाराष्ट्रात विविध भागांत एकूण ५२ बोली भाषा अस्तित्वात आहेत. मराठीसह उर्दू, सिंधी, हिंदी या भाषा सर्वाधिक बोलल्या जातात. मराठी भाषेतील साहित्य, नाटक, संगीत चळवळींही त्यासाठी कारणीभूत आहेत. महाराष्ट्र, अरुणाचल प्रदेश, आसाम, गुजरात आणि ओडिशा या पाच राज्यांत सर्वाधिक भाषिक वैविध्य आहे. महाराष्ट्रातील सर्वाधिक बोलीभाषा जिवंत आहेत ही महत्त्वाची गोष्ट आहे. महाराष्ट्र

उद्योग, व्यवसाय आणि शिक्षणाच्या बाबतीत पुढे असला, तरी आसाम भाषासमृद्धीच्या बाबतीत अग्रेसर आहे, असे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रात सर्व बोलीभाषांची पाळेमुळे खूपच घट्ट असल्याने मराठी भाषा कधीच मरणार नाही. जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठी १८ व्या स्थानावर आहे.

## कॅन्सरसह अन्य आजारांवरील संशोधनास चालना

''सध्या बायोलॉजी आणि पर्यायाने बायोइन्फर्मेटिक्सला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळेच नव्याने तयार करण्यात येत असलेल्या 'राष्ट्रीय सुपर कॉम्प्युटिंग मिशन'मध्ये बायोइन्फर्मेटिक्सवर भर देण्यात येणार आहे. बायोइन्फर्मेटिक्ससाठी स्वतंत्र सुपर कम्प्युटर विकसित करण्यात येणार आहे. त्यामुळे कॅन्सरसह काही विशिष्ट आजारांवर होणाऱ्या संशोधनाला चालना मिळणार आहे,'' अशी माहिती इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान विभागाचे समूह समन्वयक डॉ. जी. व्ही. राजाराजू यांनी दिली.

'सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स कम्प्युटिंग'च्या (सी-डॅक) बायोइन्फर्मेटिक्स विभागातर्फे आयोजित 'अक्सिलरेटिंग २०१४' या परिषेदेचे उद्‌घाटन हैदराबाद येथील सेंट्रल युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. रामाकृष्णा रामास्वामी यांच्या हस्ते झाले. 'सी-डॅक'च्या कॉर्पोरेट स्ट्रॅटेजी आणि 'आर अँड डी' विभागाचे वरिष्ठ संचालक डॉ. पी. के. सिन्हा, 'सी - डॅक'च्या पुणे विभागाचे कार्यकारी संचालन डॉ. हेमंत दरबारी, बायाइन्फर्मेटिक्स विभागप्रमुख डॉ. राजेंद्र जोशी या वेळी उपस्थित होते.

सी-डॅकच्या बायोइन्फर्मेटिक्स विभागाने विकसित केलेल्या 'परम बायोब्लेझ' या सुपर कम्प्युटरचे उद्‌घाटन डॉ. रामास्वामी यांच्या हस्ते झाले.

''जनुकीय बदलांच्या माध्यमातून कॅन्सरसह काही विशिष्ट आजारांवर संशोधन करण्याचे काम येथे करण्यात येत आहे. बायोइन्फर्मेटिक्स क्षेत्रात सरकारने मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे. त्याचा फायदा संशोधकांना होणार आहे,'' असे डॉ. रामाराजू यांनी सांगितले.

''कॅन्सरसाठी केवळ एक जनुक कारणीभूत नसते, तर माणसाचे वर्तन आणि त्याच्या भोवती असलेले वातावरणही कारणीभूत असू शकते. त्याच्या योग्य अनुमानासाठी विशिष्ट लोकसंख्यात्मक माहिती जमा करण्याची आवश्यकता आहे. बायोइन्फर्मेटिक्समधून जमा होणाऱ्या मोठ्या माहितीसाठ्याची साठवणूक आणि त्याचे विश्लेषण ही आजही आव्हानात्मक गोष्ट आहे,'' असे डॉ. रामास्वामी यांनी सांगितले.

## डॉ. बी. जी. शेखर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

'आमदार-खासदार होण्यासाठी करोडो रुपये लागत असतील, तर साहित्यिक, कवी, सामान्य माणसांनी तिथे जाण्याचा प्रश्न उरतो का?' असा

सवाल करीत ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांनी राजकारणातील वास्तवावर प्रकाश टाकला.

ग्रंथाली प्रकाशनातर्फे आयपीएस अधिकारी डॉ. बी. जी शेखर यांनी लिहिलेल्या 'शोध' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमाला विधानसभेचे अध्यक्ष दिलीप वळसे-पाटील, अतिरिक्त पोलिस आयुक्त चंद्रशेखर दैठणकर, अतिरिक्त पोलिस आयुक्त (गुन्हे) शहाजी साळुंखे, निवृत्त अपर पोलिस महासंचालक टी. सी. वानखेडे, ग्रंथालीचे विश्वस्त प्रभाकर भिडे आदी उपस्थित होते.

सध्या आमदार-खासदार होण्यासाठी करोडो रुपये लागतात, अशा स्थितीत सर्वसामान्य माणूस तिथपर्यंत जाऊच शकत नाही असे महानोर यांनी स्पष्ट केले.

''मीरपूड, चाकू घेऊन जाणाऱ्या आमदाराला पोलिस संरक्षण आहे. मात्र त्याला विरोध करणाऱ्या पोलिसांना दंडुके मारण्याची व्यवस्था आहे. राजकारणाच्या कक्षा दिवसेंदिवस बदलत चालल्या आहेत. आमदार, पालकमंत्री, गृहमंत्री यांच्या फोनमुळे पोलिसांच्या कामावर मर्यादा येतात आणि वेगळे चित्र उभे राहते. मूठभर लोकांनी केलेल्या भ्रष्टाचार आणि नको त्या गोष्टीमुळे पोलिस खाते बदनाम होत आहे. चुकीचे काम करणाऱ्यांना शिक्षा द्या. मात्र पोलिस खात्याची बदनामी करू नका. कारण पोलिस समाजाचा खरा रक्षक आहे.'' असे ते म्हणाले.

ब्रिटिश गेल्यानंतर पोलिस व्यवस्था बदलली आहे. पोलिस आणि सामान्य माणूस यांच्यामध्ये निर्माण झालेले अंतर कमी व्हावे, पोलिस आणि सर्वसामान्य माणूस यांच्यामध्ये प्रेमाचे संबंध निर्माण व्हावेत. मात्र त्यामध्ये धाक वाटणार नाही इतकी जवळीक असता कामा नये, अलिकडच्या काळात बरेच पोलिस अधिकारी ट्रॅक बदलायला लागले असल्याचे वळसे-पाटील यांनी नमूद केले.

## स्मार्टफोन

सध्याचे युग हे स्मार्टफोनचे आहे. मात्र अनेकांना स्मार्टफोन घेताना कोणती फीचर्स पहायची, याची पूर्ण माहिती नसते. अनेकदा मोबाईलच्या जाहिरातीमध्ये ड्यूअल कोड प्रोसेसर, एमएएच बॅटरी यासारख्या शब्दांचा अर्थ कळत नाही. त्यामुळेच स्मार्ट फोन घेताना या गोष्टींकडे खास लक्ष द्यावे.

ऑपरेटिंग सिस्टीम : फोनमधील ऑपरेटिंग सिस्टीममुळे तुमच्या फोनला स्मार्ट म्हटले जाते. अँड्रॉइड, आयओएस आणि विंडोज या तीन सिस्टीम सध्या मार्केटमध्ये लोकप्रिय आहेत. आपल्याकडे अँड्राईड फोन वापरणाऱ्यांची संख्या अधिक आहे. या फोनवर गुगलवरील काही ॲप्लिकेशन अगदी मोफत मिळतात. ॲपलची आयओएस आणि मायक्रोसॉफ्टची विंडोज यामध्ये अनेक ॲप्लिकेशन

मोफत असली, तरी बहुतेकांना अँड्राईड वापरणे अधिक सोपे वाटते.

प्रोसेसर : ड्युअल कोअर आणि क्वाड कोअरच्या पर्यायांमध्ये बहुतांशी सर्वच स्मार्टफोन उपलब्ध आहेत. ड्युअलपेक्षा क्वाड कोअर प्रोसेसर जास्त क्षमतेचा असतो. मात्र प्रोसेसर चीपची माहिती जास्त देताना ए५, ए७, ए८, ए१५ अशाप्रकारे नंबर सांगितले आतात, या नंबरवरूनही तुम्ही प्रोसेसर चांगला आहे की नाही हे ओळखू शकता. जितका नंबर अधिक, तितका चांगला प्रोसेसर या समीकरणानुसार क्वाड कोअर ए८ हा क्वाड कोअर ए१५ पेक्षा कमी क्षमतेचा आहे.

रॅम : जितकी जास्त रॅम तितका मोबाइल अधिक वेगाने काम करतो, जरी मेमरी कार्ड असले, तरी एखादे ॲप्लिकेशन इन्स्टॉल केल्यावर त्यातील काही बेसिक फाइल फोन मेमरीमध्येच सेव्ह होतात. त्यामुळे जास्त रॅम हा नेहमीच प्लस पॉईंट ठरतो.

स्टोरेज : स्मार्टफोनमध्ये आपले विश्व सामावते, ई-मेल, सोशल नेटवर्क, फोटो, व्हिडिओ, म्युझिक या साऱ्याच गोष्टी आपल्याला हव्या असतात, तेव्हा स्मार्टफोन घेताना ज्या स्मार्टफोनचे स्टोरेज सर्वाधिक असेल त्या स्मार्टफोनला प्राधान्य द्या. ज्या फोनमध्ये स्टोरेजची क्षमता ८जीबी आहे, असे सांगण्यात येते, त्यात ६.५ जीबी एवढीच जागा मिळते, त्यामुळे अपेक्षित वापरापेक्षा जरा जास्त क्षमतेचा मोबाइल घेणे योग्य ठरते.

बॅटरी : स्मार्टफोनमधील वेगवेगळ्या ॲप्सच्या सततच्या वापरामुळे फोनच्या बॅटरीची समस्या बऱ्याचदा निर्माण होते. मोठी स्क्रीन, प्रोसेसर, टॉकटाइमसाठी बॅटरीचा सर्वाधिक वापर होतो. जर तुम्ही ४.५ इंचाचा मोबाइल घेण्याचा विचार करीत असल्यास कमीत कमी २००० एमएएच क्षमतेची बॅटरी आवश्यक आहे.

डिस्प्ले : पाच  इंच किंवा त्यापेक्षा कमी आकाराचा फोन घेत असाल, तर एचडी (७२० पिक्सेल) स्क्रीन योग्य ठरेल, मात्र फ्लॅबलेटसाठी फुल एचडी (१०८० पिक्सेल) घेतल्यास उत्तम. स्क्रीन सर्व बाजूने पाहून तिच्या कलरमध्ये होणाऱ्या बदलावरून स्क्रीनचा दर्जा तपासू शकता. ॲल्मोड, गोरिला ग्लास, एलसीडीसारखे स्क्रीन ऑप्शन्सही उपलब्ध आहेत.

## ‘गुगल आर्टिफिशियल इंटेलिजंट’ परिषदेतील सूर

सध्याच्या तंत्रज्ञान युगात कम्प्युटर आणि रोबो मानवी जीवनाचे अविभाज्य घटक झाले आहेत. या पार्श्वभूमीवर आगामी १५ वर्षामध्ये स्वत:चे अनुभव सांगणारे, विनोद सांगून हसविणारे किंवा फ्लर्ट करणारे रोबोही प्रत्यक्षात येतील, असा सूर ‘गुगल’तर्फे आयोजित ‘आर्टिफिशियल इंटेलिजंट’ परिषदेत व्यक्त करण्यात आला.

‘गुगल’च्या इंजिनीअरिंग विभागाचे संचालक रे कुर्झवेल यांच्या मते

२०२९ पर्यंत कम्प्युटर आणि रोबो माणसापेक्षाही प्रगत असतील. त्यामुळे ते मानवी भावनांची सहज सांगड घालू शकतील आणि त्या आधारे एखादी गोष्ट समजून घेणे आणि किंवा गोष्टी सांगणे अशा क्रिया सहज करू शकतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कुर्झवेल यांनी मानवी चेहरा वाचू शकणाऱ्या, संवाद करू शकणाऱ्या 'फ्लॅटबेड स्कॅनर' नामक कम्प्युटर प्रोग्रॅमिंगची निर्मिती केली आहे.

१९९० कुर्झवेल यांनी कम्प्युटर माणसाला 'चेस' अर्थात 'बुद्धिबळा'त सहज हरवू शकेल, असे भाकित केले होते. त्यांचे भाकित खरे ठरविताना १९९८ मध्ये 'वर्ल्ड चेस चॅम्पियनशिप'मध्ये 'आयबीएम' च्या 'डीप ब्लू' या कम्प्युटरने माजी जगज्जेता गॅरी कास्पारोव्ह याला पराभूत केले होते.

'कम्प्युटर किंवा रोबोच्या मानवी हालचाली अथवा बोलण्याच्या कृतीसाठी सिरीचा (आयफोनची व्हॉइस रिकग्निशन टेक्नॉलॉजी) वापर करण्यात येणार आहे. या तंत्रामुळे आपण जे बोलू ते कॅम्प्युटर अथवा रोबो प्रत्यक्षात उतरविणार आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून गुगल भविष्यात सेल्फ ड्रायव्हिंग कारच्या निर्मितीसाठी उतरणार आहे.' असेही कुर्झवेल यांनी स्पष्ट केले.


## 'फेसबुक'ने 'व्हॉट्स ॲप' १९.५ अब्ज डॉलरला खरेदी केले.

केवळ चार वर्षापूर्वी कार्यान्वित झालेले एखादे मोबाईल फोन ॲप्लिकेशन (ॲप) बड्या सोशल मीडियाची झोप उडवू शकते, याचे प्रत्यंतर जगाला आज आले. 'फेसबुक' या जगप्रसिद्ध सोशल मीडियाने 'व्हॉट्स ॲप' या अल्पावधीत प्रचंड लोकप्रियता मिळविलेल्या ॲपच्या खरेदीसाठी १९.५ अब्ज डॉलर मोजले आहेत. 'व्हॉट्स ॲपची' लोकप्रियता आणि एसएमएससारख्या पारंपरिक संदेशप्रेरणा सुविधेला मागे टाकून मोबाईल फोनधारकांच्या मनावर गारुड करण्याची मोठी क्षमता, यामुळे 'फेसबुक'ला मोठी किंमत मोजण्याचा मोह आवरला नसावा असे तज्ज्ञ सांगतात.

'व्हॉटस ॲप'ची लोकप्रियता प्रचंड आहे. या ॲपवर थोड्याच दिवसात एक अब्ज युजर्स नोंदविले जातील, असे फेसबुकचे प्रवर्तक मार्क झुकेरबर्ग, यांनी म्हटले आहे.

'व्हॉट्स ॲप' खरेदी करण्यापूर्वी केलेल्या सर्वेक्षणातील निष्कर्षानुसार जगभरात ४५ कोटी लोक दर महिन्याला हे ॲप वापरतात, त्यापैकी ७० टक्के लोक प्रत्येक दिवशी एकदा तरी त्याचा वापर करतात. ही सेवा वापरणाऱ्यांची संख्या दर दिवशी १० लाख आहे त्यांच्याकडून १९ अब्ज संदेश पाठविले जातात. या ॲपद्वारे ३४ अब्ज संदेश स्वीकारले जातात.

**नाही स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स**
**मराठीत प्रथमच, खरीखुरी E-Books**




**मेहता पब्लिशिंग हाऊस**

१९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर, माडीवाले कॉलनी, पुणे ३०.
फोन: +91-20-24476924, 24460313 एक्सटेन्शन क्र. 221, 245, 250 मो. 94220 46575
e-mail: sales@mehtapublishinghouse.com
Follow us on : http://www.facebook.com/mehta.publishinghouse

**आगामी**

# आघाडीचे महिला नेतृत्त्व

मूळ लेखिका
सुधा मेनन

अनुवाद
सुमिता बोरसे




आता ती केवळ... राबणारी बिनचेहऱ्याची बाई राहिलेली नाहीतर ती स्वत:चे हक्क असलेली स्वतंत्र नागरिक आहे.
केवळ घरकाम, मोलमजुरीच नव्हेतर उद्योगसमूहाची अध्यक्षा... बँकेची व्यवस्थापिका... प्रतिष्ठित सामाजिक कार्यकर्ती... ते उत्कृष्ट कलाकार अशा विविध कार्यक्षेत्रांत तिने आपल्या कर्तृत्वाचा 'कॅन्व्हॉस' चितारला आहे.
अनु आगा... लीला पूनावाला... मेहेर पद्मजी... किरण मुझुमदार-शॉ... यांच्यासारख्या प्रथितयश उद्योजिका!
शुभा मुद्गल, मल्लिका साराभाई यांच्यासारख्या कलाकार!
शिखा शर्मा... नैना गिडवाई... प्रिया पॉल... यांच्यासारख्या यशस्विता आणि सुवर्णकन्या पीटी उषा...
यांच्या यशोगाथांचा हा आलेख!




## अर्णव गोस्वामी यांना 'जनजागरण श्रेष्ठ' पुरस्कार

'जातीयता, धर्मांधता आणि भेदभाव अशा चुकीच्या गोष्टींविषयी आवाज उठवत योग्य आणि व्यापक चर्चा घडवून आणणाऱ्या आणि व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या नव्या पत्रकारितेची आपल्याला गरज आहे,' असे मत 'टाइम्स नाऊ' वृत्तवाहिनीचे मुख्य संपादक अर्णव गोस्वामी यांनी व्यक्त केले. देश महासत्ता बनवण्यासाठी अराजकता हा मार्ग नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

माईर्स एमआयटीतर्फे दहाव्या भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कारांचे वितरण ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते झाले. भगवान महावीर विकलांग सहायता समितीचे संस्थापक डी. आर. मेहता यांना 'विज्ञान - तंत्रज्ञान श्रेष्ठ पुरस्कार', साधना सेंटर फॉर मॅनेजमेंट अँड लीडरशीप डेव्हलपमेंटचे संस्थापक प्रा. एम. एस. पिल्ले यांना 'आचार्य श्रेष्ठ पुरस्कार', ओडिशातील बोलांगीर मतदारसंघाचे खासदार कालिकेश नारायण सिंग देव यांना 'जनप्रतिनिधी श्रेष्ठ पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

ज्येष्ठ कम्प्युटर तज्ज्ञ डॉ. विजय भटकर, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. वासुदेव गाडे, एमआयटीचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड, प्रा. मंगेश कराड, प्रा. डी. पी. आपटे या वेळी उपस्थित होते.

'देशावर आर्थिक सुधारणा लादण्यात आल्या. परंतु, देशातील राजकीय नेत्यांचा अजूनही जात-पात आणि सांप्रदायिक राजकारणावर विश्वास आहे. अशा परिस्थितीत आर्थिक विकासाचा उपयोग आहे का आणि भ्रष्टाचारावर भांडणारे राजकीय पक्ष जातीपातीच्या राजकारणावर गप्प का?' असे प्रश्न गोस्वामी यांनी उपस्थित केले.

'आपल्याकडे विद्यार्थ्यांना साचेबद्ध शिक्षण दिले जाते. त्यातून 'लीडर्स' नव्हे तर 'फॉलोअर्स' तयार होतात. कायम एका विशिष्ट हेतूने प्रेरित होऊन कार्यरत रहा, पराभवाची, अपयशाची भीती बाळगू नका,' असा सल्ला पिल्ले यांनी दिला.

'युवक आणि राजकीय नेते यांच्यातील वाढते अंतर ही चुकीची गोष्ट असून

युवकांनी राजकारणात उतरले पाहिजे. अण्णा हजारेंच्या आंदोलनात युवकांनी सक्रिय सहभाग घेतला होता. त्यातून नव्या पक्षाच्या सरकार उभारणीपर्यंतचे बदल आपण अनुभवले आहेत,' असे खासदार कालिकेश यांनी सांगितले.

'आयआयटीसारख्या बड्या संस्थांमध्ये शिक्षण घेणारे काही विद्यार्थीही आपले आडनाव लावत नाहीत. हा बदल आता जाणवू लागला आहे. जेव्हा मॅनेजमेंट, इंजिनीअरिंगसारख्या विषयांतील प्रगत शिक्षणासाठी परदेशी विद्यार्थी भारतात येतील, तेव्हाच भारत खऱ्या अर्थाने महासत्ता होईल,' असे डॉ. भटकर यांनी सांगितले.

## शाहीर संभाजी भगत यांना संत तुकाराम पुरस्कार

नगर जिल्ह्यातील पारनेरच्या मातोश्री प्रतिष्ठानचा जगतद्गुरू संत तुकाराम महाराज पुरस्कार शाहीर संभाजी भगत यांना प्रा. फ. मुं. शिंदे यांच्या हस्ते ५ फेब्रुवारीला प्रदान करण्यात आला. आंबेडकरी विद्रोही शाहिरी जलसा, गीतलेखनासह भगत यांनी 'शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहल्ला' या नाटकाचे संगीत दिग्दर्शन केले आहे.

## सवाई एकांकिका स्पर्धा

चतुरंग प्रतिष्ठान आयोजित सवाई एकांकिका स्पर्धेत या वेळी नवनवीन विषय आणि दर्जेदार सादरीकरण पाहायला मिळाले, पण परीक्षकांच्या मते एक चांगले 'प्रॉडक्ट' म्हणून फार कमी एकांकिका सादर झाल्या. सर परशुराम महाविद्यालयाची 'बेल' चांगलीच वाजली. मतिमंद मुलाची व्यथा मांडणारी गरवारे वाणिज्य महाविद्यालयाची 'चॉकलेटचा बंगला' ही एकांकिकाही गोड झाली.

ओम साई कलामंचाची 'फ्लॉवरपॉट' ही एकांकिका गुलदस्त्यातील गोष्टी मांडण्यात थोडीशी कमी पडली. भारती विद्यापीठाची 'उळागट्टी' म्हणजे पुराने वेढलेल्या एका झाडावर सादर करण्याचा सर्जनशील प्रयत्न होता. तिला अभिनयाची व तांत्रिक साथ अप्रतिम मिळाली होती. कीर्ती महाविद्यालयाची 'नहीं तो गोली मार दूँगा' तेवढीशी मनोरंजक ठरली नाही. एम आय टी ची 'क' ला काना 'का' ही एकांकिका सत्य पूर्ण माहिती नसतानाही शिवाजी महाराजांच्या नावाचा वापर होत असल्याची व्यथा मांडणारी होती.

पुरस्कार विजेते

| | | |
|---|---|---|
| एकांकिका प्रथम | : | 'क'ला काना 'का'? (एम आय टी, पुणे) |
| एकांकिका द्वितीय | : | उळागट्टी (भारती विद्यापीठ, पुणे) |
| सर्वोत्तम लेखक | : | अभयसिंह जाधव ('क'ला काना 'का'?) |
| सर्वोत्तम दिग्दर्शक | : | क्षितिज दाते (बेल) |

| | | |
|---|---|---|
| सर्वोत्तम अभिनेता | : | अजिंक्य गोखले (चॉकलेटचा बंगला) |
| सर्वोत्तम अभिनेत्री | : | पूर्वा वनपाळ ('क' ला काना 'का'?) |
| सर्वोत्तम प्रकाशयोजना | : | हेमंत चातुर्य, शुभंकर सौदणकर (उळागट्टी) |
| सर्वोत्तम ध्वनिसंयोजक | : | आकाश चौधरी (उळागट्टी) |
| सर्वोतम नेपथ्य | : | अमेय भालेराव, प्रसाद राजोपाध्ये (उळागट्टी) |

## मार्कोनी पुरस्कार विजेते आरोग्यस्वामी पॉलराज

आपल्या देशातील वैज्ञानिकांच्या बुद्धिमत्तेचे चीज परदेशात गेल्यानंतरच होते असा आजवरचा अनुभव आहे. अमेरिकेतील अनिवासी भारतीय वैज्ञानिक आरोग्यस्वामी जोसेफ पॉलराज यांचीही कथा याच दिशेने जाणारी आहे.

तंत्रज्ञानातील नोबेल मानले जाणारे एक लाख डॉलरचे पारितोषिक त्यांना अलिकडेच गुलिमो मार्कोनी सोसायटीतर्फे देण्यात आले.

आरोग्यस्वामी पॉलराज हे सध्या स्टॅनफर्ड विद्यापीठात प्राध्यापक असून, त्यांनी अतिशय वेगवान अशी बिनतारी वाय-फाय सेवा तसेच फोर जी मोबाईल सेवा यात मोलाचे संशोधन केले आहे. त्यांनी शोधून काढलेल्या एमआयएमओ म्हणजे मल्टिपल इनपुट व मल्टिपल आऊटपुट या तंत्रज्ञानामुळे वायरलेस ब्रॉडबॅण्ड सेवा अधिक वेगवान बनली असून, त्यामुळे मल्टिमीडिया म्हणजे बहुमाध्यम सेवा अधिक जलद झाली आहे. आज आपण जे वाय-फाय रूटर व फोर जी सेवेवर आधारित फोन वापरतो त्यात पॉलराज यांनी विकसित केलेले एमआयएमओ हे तंत्र वापरले गेले आहे. आता सर्वबिनतारी यंत्रांमध्ये त्याचा वापर सुरू होईल तेव्हा जग  लाइटनिंग फास्ट होईल.

पॉलराज यांचा जन्म तामिळनाडूतील कोईमतूर येथे झाला. वयाच्या पंधराव्या वर्षी हे खडकवासल्याच्या राष्ट्रीय संरक्षण अकादमीत आले व नंतर तीस वर्षे नौदलात सेवा केली. १९७९ मधील पाकिस्तान युद्धात आपल्या नौदलाकडे असलेल्या सोनार यंत्रात अनेक त्रुटी असल्याचे दिसून येताच पॉलराज यांनी नौदलास अपसोह (ॲडव्हान्सड पॅनोरसिक सोनार हल माऊंटेड) ही यंत्रे तयार करून दिली. त्याबद्दल भारताने पद्मभूषण, अतिविशिष्ट सेवापद असे काही सन्मान दिले. भारतीय नौदलाने त्यांना दिल्लीतील आयआयटीत पाठवले, त्यासाठी त्यांचे विद्युत अभियांत्रिकीचे प्राध्यापक पी. व्ही. इंदिरेशन यांनी आग्रह धरला होता.

१९७०च्या सुमारास मूळचे पुण्याचे असलेले स्टॅनफर्ड विद्यापीठाचे प्राध्यापक थॉमस केलथ हे दिल्लीच्या आयआयटीत व्याख्यानासाठी आले होते. त्यांनी तेथे जे भाषण केले त्यामुळे आरोग्यस्वामी पॉलराज भारावून गेले व दूरसंचार तंत्रज्ञानाकडे वळले. त्यांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन भारतीय

नौदलासाठी बरेच काम केले, कालांतराने ते स्टॅनफर्डला गेले. तेथे प्राध्यापक झाले. नंतर दोन वर्षांची अभ्यास रजा घेऊन भारतात आले तेव्हा त्यांना भारतीय नौदलात रुजू करून घेण्याची संधी होती, पण नोकरशाहीच्या लालफितीच्या कारभाराला वैतागून ते स्टॅनफर्डला परत गेले. भारतात बुद्धिमान व्यक्तींच्या कामाचे चीज होत नाही हे असे!

## लाभसेटवार पुरस्कार

'जात, धर्म, प्रांत, लिंगभेदाला कडाडून विरोध करीत माणूस म्हणून श्वास घेतो आणि माणूस म्हणूनच लेखन करीत आहे. मात्र माणसांच्या जगात माणूसपणाचे बोलणाऱ्यालाच समाजातून टाळले आणि वगळले जात आहे. एकूणच गुन्हेगारी, राजकारणी आणि नट-नट्या यांच्या जमान्यात साहित्याचे स्थान गौण झाले आहे.' अशी खंत कादंबरीकार राजन खान यांनी व्यक्त केली.

अमेरिकेतील डॉ. लाभसेटवार प्रतिष्ठान आणि नागपूर येथील डॉ. अनंत व लता लाभसेटवार न्यास यांच्यातर्फे २५ जानेवारी रोजी संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते खान यांना साहित्य सन्मान प्रदान करण्यात आला. डॉ. अनंत लाभसेटवार यांच्या 'अमेरिकतील झोके' या पुस्तकाचे प्रकाशनही मोरे यांच्या हस्ते झाले. या वेळी व्यासपीठावर सुनीलकुमार लवटे आणि अनिल मेहता उपस्थित होते.

'लेखक हा कुठल्याही जातीचा, धर्माचा, प्रांताचा, लिंगाचा नसावा अशी भूमिका घेतल्यामुळेच मी साहित्यक्षेत्रात बदनाम झालो आहे. जातीधर्माला कडाडून विरोध केला. अशा पद्धतीने काम करणारा एकांडा शिलेदार असतो. पण असे पुरस्कार माझ्या लेखनाची उमेद वाढवितात,' असे राजन खान म्हणाले.

या वेळी डॉ. सदानंद मोरे म्हणाले, 'राजन खान हे साहित्याच्या कोणत्याही संप्रदायामध्ये नाहीत. ते कोणत्याही कंपूशाहीत नाहीत. एकाच वेळी सर्वांना लागू पडेल असे आणि त्या वेळी प्रत्येकाचे वेगळेपण अधोरेखित करण्याची सिद्धी त्यांच्या लेखनात जाणवते. पूर्वी कोणी कोणावर अन्याय केले याचे हिशोब मांडून वर्तन केले तर माणसांत सख्य निर्माण होणारच नाही, हे सख्य निर्माण व्हावे हेच खान यांच्या लेखनाचे उद्देश आहे.'

लाभसेटवार, सुरेश हिंगलासपूरकर, सुनीलकुमार लवटे यांनी मनोगत व्यक्त केले. कथाकार राजन खान हे कादंबरीकार, संपादक, नाटककार, पटकथा लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. आजवर त्यांच्या १७ कादंबऱ्या, वीस कथासंग्रह, सहा लेखसंग्रह, दोन नाटके, दोन पटकथा, अनुवाद, संकीर्ण असे विपुल साहित्य प्रकाशित झाले आहे.

## अवचट, आगाशेंना 'गोदावरी' पुरस्कार

नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे गोदावरी गौरव पुरस्कार वितरण १० मार्च रोजी करण्यात आले. अनिल अवचट, एन. राजम, डॉ. मोहन आगाशे, रमेश पानसे, नेहा पावसकर, सुहास बहुलकर हे पुरस्काराचे मानकरी होते. कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या संकल्पनेतून सुरू झालेला हा पुरस्कार वर्षाआड देण्यात येतो.

लोकसेवा, संगीत-नृत्य, चित्रपट-नाट्य, ज्ञान-विज्ञान, क्रीडा-साहस, चित्र-शिल्प या क्षेत्रातील मान्यवरांना नाशिकमध्ये आमंत्रित करून त्यांना ऐकण्याची संधी मिळावी म्हणून हा उपक्रम राबवण्यात येतो. २१ हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे सन्मानाचे स्वरूप आहे. सन्मान सोहळ्याचे यंदाचे बारावे वर्ष आहे.

सामाजिक कार्यकर्ते आणि लेखक अवचट यांनी गरीब, हमाल, देवदासी, विडी कामगार अशांचे प्रश्न समाजापुढे मांडून त्यातून चळवळी उभ्या केल्या.

बाल प्रज्ञावंत म्हणून वयाच्या पंधराव्या वर्षीच वाखाणल्या गेलेल्या डॉ. एम. राजन यांनी व्हायोलिनवरील अलौकिक प्रभुत्वामुळे गेल्या पन्नास वर्षात श्रोत्यांच्या मनावर अधिराज्य केले. संगीत क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा गौरव प्रतिष्ठानतर्फे केला गेला.

## मंदा खांडगे यांना बालसाहित्यकार पुरस्कार

''विविध प्रसंग, अनुभव यातून कवी, लेखक शिकत असतो. लहान मुलांचे भावविश्व जाणून त्यांच्या कथा, व्यथा सोप्या भाषेत मांडल्यास त्यांना भावतात. त्यामुळे आजच्या तरुण लेखकांनी लहान मुलांचे विश्व समजून लेखन करावे.'' असे मत लेखिका डॉ. मंदा खांडगे यांनी साहित्यप्रेमी भगिनी मंडळाचा 'बाल साहित्यिक मालतीबाई दांडेकर' पुरस्कार स्वीकारताना व्यक्त केले. छात्र प्रबोधनचे संपादक महेंद्र सेठिया, कल्याणी दिवेकर, मंजिरी ताम्हनकर आदी उपस्थित होते.

डॉ. खांडगे म्हणाल्या, ''आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टी मुलांपर्यंत पोचायला हव्यात. त्यामुळे काल्पनिक कथेपेक्षा वास्तव कथेवरील लेखनावर भर हवा, शालेय वयापासूनच लेखनाची आवड रुजल्याने लहान मुलांच्या व्यथा, प्रश्न मांडत लेखन केले, तसेच नववी दहावीतील विद्यार्थ्यांसाठी सोप्या भाषेत निबंध लिहिले.''

सेठिया म्हणाले, ''मुलाच्या प्रगतीसाठी शिबिरापेक्षाही सहवास, प्रत्यक्ष अनुभव यातून मिळणारे शिक्षण आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात महत्त्वाचे आहे. प्रत्येक मुलातील स्वत:ची क्षमता सकारात्मक वृत्ती आणि कौशल्यांची जडण-घडण शालेय वयापासूनच होत असते.''

## डॉ. ह. वि. सरदेसाई यांना कानिटकर पुरस्कार

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचा गुरुवर्य शंकरराव कानिटकर पुरस्कार ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. ह. वि. सरदेसाई यांना प्रतापराव पवार यांच्या हस्ते देण्यात आला. त्यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, उपकार्याध्यक्ष डॉ. माधव नामजोशी, श्यामकांत देशमुख, सुरेश तोडकर, प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, कुंदा सरदेसाई उपस्थित होते. आरती गोगटे यांनी सूत्रसंचालन केले.

## मराठी विश्वकोशाच्या संकेतस्थळाला पुरस्कार

कॉंप्युटर सोसायटी ऑफ इंडिया या नामवंत संस्थेने राष्ट्रीय स्तरावर घेतलेल्या स्पर्धेत मराठी विश्वकोशाच्या www.marathivishwakosh.in या संकेतस्थळाने द्वितीय पारितोषिक पटकावले आहे.

## 'माहेश्वरी स्कॉलर' पुरस्कारांचे वितरण

माहेश्वरी विद्या प्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना 'एमव्हीपीएम माहेश्वरी स्कॉलर ॲवॉर्ड' हा पुरस्कार देऊन नुकतेच गौरविले. या वेळी फायनान्शिअल सर्व्हिसेसचे अध्यक्ष आनंद राठी, सीडॅकचे महासंचालक रजत मुना उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष रमेश चांडक यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला. मुना म्हणाले, 'आपल्याकडे इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा वापर प्रचंड वाढला आहे. पण, त्यांचे उत्पादन भारतात करणे आवश्यक आहे. या वस्तूंच्या आयातीसाठी आपण क्रूड ऑइल आयातीसाठी लागणाऱ्या चलनापेक्षाही जास्त खर्च करीत आहोत. ही परिस्थिती बदलण्यासाठी संशोधनावर भर दिला पाहिजे. कोणत्याही क्षेत्रात यश संपादनासाठी शिक्षणाबरोबरच कठोर परिश्रमांची गरज असते. या विद्यार्थ्यांचा सत्कार ही त्यांच्या श्रमाची पोचपावती आहे, असे मत राठी यांनी व्यक्त केले. माहेश्वरी स्कॉलर हा पुरस्कार संस्थेने दोन वर्षांपासून सुरू केला असून, शैक्षणिक क्षेत्रात चमकणाऱ्या विद्यार्थ्यांची यासाठी निवड केली जाते. पन्नास हजार रुपये आणि ताम्रपट असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यंदा मुंबईच्या श्रद्धा भट्टड, गुवाहाटी आयआयटीचे शंतनू मुंदडा, हैदराबाद आयआयटी नमिता पोरवाल, युनिव्हर्सिटी ऑफ मॅसेच्युसेट्ससे डॉ. साहस राठी, राधिका सारडा, डॉ. स्नेहा सिकची यांना पुरस्कार देण्यात आले.

## मलाला युसफझाई हिला 'बाल नोबेल'चे नामांकन

पाकिस्तानच्या दुर्गम भागात महिला शिक्षणासाठी प्रयत्न करताना तालिबानी दहशतवाद्यांच्या हल्ल्याची शिकार झालेल्या मलाला युसफझाई हिला स्वीडनच्या

'वर्ल्ड चिल्ड्रेन प्राइज'साठी नामांकन मिळाले आहे. 'बाल नोबेल' म्हणून ओळखले जाणारे हे पारितोषिक बाल हक्क आणि शिक्षणक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बालकांना दिले जाते.

मलालाने केलेले काम जगभरातील बालकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळे तिला या पारितोषिकासाठी नामांकन मिळाले, असे या पारितोषिकासाठी ज्युरीचे काम करणाऱ्या लिव क्जेलबर्ग यांनी सांगितले. 'वर्ल्ड चिल्ड्रेन प्राइज' हे २००० पासून देण्यात येते. ११० देशांतील ६० हजार शाळांमध्ये जनजागृती कार्यक्रम राबवून या पारितोषिकासाठी बालकांना नामांकन देण्यात येते.

## तळवलकर ट्रस्टतर्फे विविध पुरस्कार

कृ. ब. ऊर्फ अण्णा तळवलकर ट्रस्टतर्फे दिला जाणारा 'समाजशिक्षक' पुरस्कार यंदा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापन डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना तर निटॉर इन्फोटेकचे सी. ई . पोतनीस यांना 'अनुकरणीय उद्योजक', मानसी करंदीकर आणि केतकी घाटे यांना 'अवनीमित्र' या पुरस्कारांचे वितरण ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांच्या हस्ते झाले.

डॉ. दाभोलकर यांचा पुरस्कार त्यांचे पुत्र डॉ. हमीद दाभोलकर यांनी स्वीकारला.

## प्रदीप चंपानेरकर यांना 'पब्लिशर ऑफ द इयर' पुरस्कार

पब्लिक रिलेशन कौन्सिलिंग ऑफ इंडियातर्फे देण्यात येणारा 'पब्लिशर ऑफ द इयर' पुरस्कार यंदा रोहन प्रकाशनचे संचालक प्रदीप चंपानेरकर यांना देण्यात आला. रोहन प्रकाशनने २०१३ मध्ये 'असा घडला भारत' हा ग्रंथ तसेच सरदार वल्लभभाई पटेल, फील्डमार्शल सॅम माणकेशा, ऑपरेशन ब्लू स्टार, नोबेल कथा अशी विविध उल्लेखनीय पुस्तके प्रकाशित केली आहेत. १४ फेब्रुवारीला मुंबईत एका कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण झाले.

## आबासाहेब करंजे यांना पुरस्कार प्रदान

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागातर्फे उल्लेखनीय कार्याबद्दल देण्यात येणारा 'वसंतराव नाईक समाजभूषण पुरस्कार' शिक्रापूरचे (ता. शिरुर) माजी सरपंच आबासाहेब करंजे यांना मुंबई येथे राज्यपाल के शंकरनारायणन यांच्या हस्ते देण्यात आला. पंचवीस हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## वि. दा. पिंगळे यांना 'बालकवी' पुरस्कार

कवी वि. दा. पिंगळे यांना शिक्षणमंत्री राजेंद्र दर्डा यांच्या हस्ते नुकताच 'बालकवी काव्य पुरस्कार' बालकवीच्या धरणगाव (जळगाव) या जन्मगावी देण्यात आला. पिंगळे यांनी १७ पुस्तके लिहिली असून, अण्णा भाऊ साठे यांच्यावरील त्यांच्या पुस्तकास बालवाङ्मय पुरस्कार मिळाला आहे.

## सुरेश वाडकर यांना राम कदम पुरस्कार

शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा स्व. राम कदम पुरस्कार ज्येष्ठ गायक सुरेश वाडकर यांना १९ फेब्रुवारीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते देण्यात आला.

## मंथा, हुरजूक यांना मानद डॉक्टरेट

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ १७ फेब्रुवारी रोजी झाला. 'एआयसीटीई'चे अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा यांना सन्माननीय डीएस्सी तर 'हेल्पर्स'च्या अध्यक्षा नसीमा हुरजूक यांना डीलिट पदवी देण्यात आली. अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर आणि बिहारचे राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यावेळी उपस्थित होते.

## डॉ. माशेलकर यांना धारिया राष्ट्रनिर्माण पुरस्कार

वनराई फाउंडेशनच्या वतीने सुरू करण्यात आलेला पहिला 'स्व. मोहन धारिया राष्ट्रनिर्माण पुरस्कार' सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांना देण्यात आला. माजी केंद्रीय मंत्री व वनराईचे संस्थापक डॉ. धारिया यांनी आयुष्यभर रचनात्मक कार्य करणाऱ्यांना आधार दिला. त्यांच्या जीवनापासून इतरांनी प्रेरणा घ्यावी, या उद्देशाने वनराई फाउंडेशनने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या लौकिक कार्याचा ठसा उमटविणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार देण्याचे ठरविले आहे. एक लाख रुपये रोख, शाल, श्रीफळ व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## पुणे नगर वाचन मंदिराचे पुरस्कार

'शिक्षणामुळे माणसाचा विकास होतो. त्यामुळे स्वत:ची उन्नती साधता येते. मात्र वाचनालयामुळे स्वत:चा आणि समाजाचा विकास साधता येतो', असे मत ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांनी व्यक्त केले.

पुणे नगर वाचन मंदिराच्या १६६ व्या वर्धापनदिनी माधुरी दाते यांना 'आदर्श ग्रंथपाल' पुरस्कार, निर्मला सोवनी यांना 'सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार'

आणि अभंग तुकयाचे हा ग्रंथ लिहिणारे प्रा. डॉ. दत्तात्रय पटवर्धन यांना ‘संत वाङ्मयविषयक ग्रंथ पुरस्कार’ राजदत्त यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

डॉ. पटवर्धन हयात नसल्याने त्यांच्या वतीने त्यांची कन्या मेघना वर्तक यांनी पुरस्कार स्वीकारला. नगर वाचन मंदिराचे अध्यक्ष प्रा. माधव सोमण, कार्यवाह अरविंद रानडे, अनिल देऊरकर, प्रसाद जोशी आदी या वेळी उपस्थित होते.

‘पुस्तके’ हा विचार असतो. त्यामुळे पुस्तकांचे गांभीर्याने वाचन करून त्यातील विचार समाजात पोहोचविणे आवश्यक आहे. पुणे नगर वाचन मंदिर दुर्लक्षित व्यक्तींना सन्मानित करून समाजापुढे आणण्याचे महत्त्वपूर्ण काम करत आहे, असे राजदत्त यांनी सांगितले.

पुरस्कारार्थींनीही या वेळी मनोगत व्यक्त केले. रवींद्र धारगळकर यांनी सूत्रसंचालन केले, पुष्पा टांकसाळे यांनी आभार मानले.

## राज्य वाङ्मय पुरस्कार

राज्य सरकारतर्फे उत्तम वाङ्मयनिर्मितीसाठी देण्यात येणारे पुरस्कार १८ फेब्रुवारीला जाहीर करण्यात आले. प्रज्ञा दया पवार, मधु मंगेश कर्णिक, बाबा भांड, नीरजा या ज्येष्ठ साहित्यिकांसह अवधूत डोंगरे, गुणवंत पाटील, प्रसाद नामजोशी, ऋषिकेश पाळंदे, अभय दाणी या नवोदित लेखकांच्या साहित्याचाही गौरव करण्यात आला आहे.

२०१२-१३ या वर्षातील साहित्य निर्मितीसाठी हे पुरस्कार आहेत.

**काव्य** - कवी केशवसुत पुरस्कार - दृश्यांचा ढोबळ समूह - प्रज्ञा दया पवार (पॉप्युलर प्रकाशन)

**काव्य (प्रथम प्रकाशन)** - बहिणाबाई चौधरी पुरस्कार - एरवी जाळ हा - अभय दाणी (लोकवाङ्मयगृह)

**कादंबरी** - हरी नारायण आपटे पुरस्कार - अस्वस्थ वर्तमान - आनंद विनायक जातेगावकर (शब्द पब्लिकेशन)

**कादंबरी (प्रथम प्रकाशन)** - श्री. ना. पेंडसे पुरस्कार - स्वत:ला फालतू समजण्याची गोष्ट - अवधूत डोंगरे (अक्षरमानव प्रकाशन)

**लघुकथा** - दिवाकर कृष्ण पुरस्कार - पावसात सूर्य शोधणारी माणसं - नीरजा (पॉप्युलर प्रकाशन)

**लघुकथा (प्रथम प्रकाशन)** - ग.ल. ठोकळ पुरस्कार - भरळ - गुणवंत पाटील (अक्षरमानव प्रकाशन)

**ललितगद्य** - अनंत काणेकर पुरस्कार - सुहाना सफर - हेमंत देसाई बाबूमोशाय (मॅजेस्टिक प्रकाशन)

**ललितगद्य (प्रथम प्रकाशन)** - ताराबाई शिंदे पुरस्कार - दोन चाकं आणि मी - ऋषिकेश शिंदे (प्रफुल्लता प्रकाशन)

**विनोदी साहित्य** - श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्कार - स्वप्नसुंदरी सुलभ हप्त्यात - अनिल सोनार (मनोरमा प्रकाशन)

**चरित्र** - न. चिं. केळकर पुरस्कार - लोकपाळ राजा सयाजीराव - बाबा भांड (साकेत प्रकाशन)

**आत्मचरित्र** - लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार - करूळचा मुलगा - मधु मंगेश कर्णिक (मौज प्रकाशन)

**समीक्षा** - श्री. के. क्षीरसागर पुरस्कार - दलित कविता आणि अमेरिकन ब्लॅक पोएट्री - डॉ. ऋषिकेश कांबळे (गोदा प्रकाशन)

**समीक्षा (प्रथम प्रकाशन)** - रा. भा. पाटणकर पुरस्कार - अर्वाचीन कवींचा काव्यविचार - हेमंत खडके (पद्मगंधा प्रकाशन)

**राज्यशास्त्र / समाजशास्त्र** - डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार - तिची भाकरी कोणी चोरली? - संध्या नरे पवार (मनोविकास प्रकाशन)

**इतिहास** : शाहू महाराज पुरस्कार - आंबेडकरी चळवळीतील दादासाहेब गायकवाड यांचे योगदान - अविनाश फुलझेले (लोकवाङ्मयगृह)

**भाषाशास्त्र / व्याकरण** - नरहर कुरुंदकर पुरस्कार - संकल्पना कोश खंड - सुरेश वाघे (ग्रंथाली)

**विज्ञान आणि तंत्रज्ञान** - महात्मा ज्योतीराव फुले पुरस्कार - मुंगी एक अद्भुत विश्व - प्रदीपकुमार माने (पद्मगंधा प्रकाशन)

**शेती** - वसंतराव नाईक पुरस्कार - गावगाडा शतकानंतर - अनिल पाटील - (मनोविकास प्रकाशन)

**दलित साहित्य** - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार - जोहार - ॲड. नानासाहेब निकम - (जातक प्रकाशन)

**तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र** - ना. गो. नांदापूरकर पुरस्कार - सूफी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन - डॉ. मुहम्मद आजम (पद्मगंधा प्रकाशन)

**शिक्षणशास्त्र** - कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार - शाळाभेट - शंकर माळी (साधना प्रकाशन)

**पर्यावरण** - डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार - विश्वाचे आर्त - अतुल जातेगावकर (लोकवाङ्मयगृह)

**अनुवादित** - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार - भारताच्या संसदीय

लोकशाहीची अग्निपरीक्षा - सुजाता गोडबोले (राजहंस प्रकाशन)

**संकीर्ण** - भाई माधवराव बागल पुरस्कार - शॉर्टकट - प्रसाद नामजोशी (मनोविकास प्रकाशन)

**बालवाङ्मय कविता** - बालकवी पुरस्कार - गावाकडं - इंद्रजित भालेराव (मनोविकास प्रकाशन)

**बालवाङ्मय एकांकिका आणि नाटक** - भा. रा. भागवत पुरस्कार - आनंद फुलवू या - अरुणा भागवत (इसाप प्रकाशन)

**बालवाङ्मय कादंबरी** - साने गुरुजी पुरस्कार - खारीच्या वाटा - ल. म. कडू (राजहंस प्रकाशन)

**बालवाङ्मय कथा** - राजा मंगळवेढेकर पुरस्कार - नील आणि प्रिन्स ऑफ पर्शिया - गौरी पटवर्धन (ज्योत्स्ना प्रकाशन)

**बालवाङ्मय सर्वसामान्य ज्ञान** - यदुनाथ थत्ते पुरस्कार - आकाश कसे पाहावे?- आनंद घैसास (मनोविकास प्रकाशन)

**बालवाङ्मय संकीर्ण** - ना. धों. ताम्हनकर पुरस्कार - गायबगळा - मदन हजेरी (स्पर्श प्रकाशन)

**बृहन्महाराष्ट्र पुरस्कार** - सयाजीराव गायकवाड पुरस्कार - पूर्वरंग - डॉ. प्रतिभा आठवले (कॉन्टिनेन्टल प्रकाशन)

## बालकुमार साहित्य संस्थेचे पुरस्कार

अखिल भारतीय बालकुमार साहित्य संस्थेचे उत्तम बालवाङ्मय निर्मितीसाठीचे पुरस्कार जाहीर झाले. डॉ. सुरेखा पाणंदीकर यांची जीवनगौरव पुरस्कारासाठी आणि डॉ. संध्या पवार, आनंद खरबस, अवधूत म्हमाणे आदी साहित्यिकांची या पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली आहे. गेल्या पंचवीस वर्षांपासून बालवाङमयाच्या निर्मितीसाठी बालकुमार साहित्य संस्था पुरस्कार देते. १८ मार्चला ज्येष्ठ साहित्यिक माजी संमेलनाध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

**पुरस्कार पुढीलप्रमाणे :**

**बालकथा** : वा. गो. आपटे पुरस्कार : १०१ बोधकथा : सुभाष वैष्णव, पुणे

**किशोरकथा** : दयार्णव कोपर्डेकर पुरस्कार : अशी ही फुग्याची गोष्ट : अवधूत म्हमाणे, सोलापूर

**बालकादंबरी** : वा. म. जोशी पुरस्कार : बंड्या : सुलभा जकाते, नागपूर

**चरित्र** : स. गो. देसाई पुरस्कार : गॅलिलिओ : डॉ. संध्या पवार, नागपूर

**एकांकिका** : रा. वा. शेवडे गुरुजी पुरस्कार : नामाच्या गावा जाऊया ज्योतीराम कदम, पुणे

**ललित** : सुलोचला नातू पुरस्कार : मोहोरे : इंदुमती अरकडी, पुणे

**स्वैर अनुवाद** : भा. रा. भागवत पुरस्कार : नाथा (कादंबरी) : सुभाष विभुते, आजरा

**नाटक** : चिं. वि. जोग पुरस्कार : भ भ भुताचा : आनंद खरबस, सोलापूर

**प्रथम प्रकाशन** : कार्ले गुरुजी पुरस्कार : खुलताबादचा खजिना : मीरा सिरसमकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

**विज्ञान** : श्री. बा. रानडे पुरस्कार : असे शोध, असे संशोधक : दीप्ती कुलकणी, कोल्हापूर

**दिवाळी अंक** : कुमार दिवाळी अंक २०१२, पुणे

**बालमित्र पुरस्कार**

**प्रकाशन** : बा. रा. मोडक पुरस्कार : गुरू शेट्ये, कोमल प्रकाशन मुंबई

**सजावट** : सर्जेराव जगताप पुरस्कार : इटुकली पिटुकली - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

**पक्ष्यांचे कवीसंमेलन** : विनोद सिनकर, औरंगाबाद, कावळ्यानं बनवलं कोल्होबाला मामा : पु. ग. वनमाळी, पुणे


**दिवाळी अंक उत्कृष्ट कथा पुरस्कार** :

भिंगरीवाला : सुहास बारटक्के - चिपळूण,

यशापयश दोन्ही सारखेच : बबन शिंदे- धुळे,

एका वेड्याची गोष्ट : संजय सागडे - बारामती

आगामी




# तिसरा नवरा नको गं बाई

मूळ लेखिका
लिसा स्कॉट्टोलाईन

अनुवाद
शोभना शिकनीस

स्त्रियांनो, हे पुस्तक तुमच्यासाठी आहे.
या लेखनाची शैली आहे अनौपचारिक, गप्पा मारल्यासारखी.
यातून लेखिका विनोदी शैलीत तिच्या आयुष्यात घडलेले घटना-प्रसंग तुमच्याशी शेअर करते, गंभीर विषयांना हात घालते. हे शेअरिंग करताना प्रत्ययास येणारा तिचा हजरजबाबीपणा आणि शहाणपणा अचंबित तर करतोच, पण अंतर्मुखही करतो.
एके ठिकाणी ती म्हणते, ‘प्रत्येकाकडे त्याची अश्लीलता असते आणि रिअल इस्टेटच्या जाहिराती हे माझं अश्लील साहित्य आहे!’ किंवा ‘माता या एक नैसर्गिक शक्ती आहेत आणि पर्यायी इंधनही!’
सुज्ञ, चटपटीत, संवेदनशील, विनोदी, तसंच चटका लावणारं, प्रेमाने हळुवारपणे स्पर्श करणारं हे पुस्तक आंबट-गोड-तिखट अशा विविध चवीच्या पदार्थांची मेजवानी आहे!




# फॉरवर्ड अँड डिलिट

लेखिका
स्वाती चांदोरकर


‘बदला घेण्यासाठी रक्तलांच्छितच घटना
घडायला हव्यात असं कोण म्हणतं?
आणि जर तसं म्हणत असतील,
तर ते चूक, अयोग्य.
शांत मनाने आणि अक्कलहुशारीनेही
बदला घेता येतो.
आणि मग तो गुन्हा ठरत नाही.
ठरवता येत नाही.
गुन्हेगार सापडतच नाही.’

अमोलिका मनातल्या मनात
असाच काहीसा विचार करत होती,
आणि नरोत्तम हॉस्पिटलच्या
आयसीयूमध्ये शेवटच्या घटका
मोजत होता....




# छंद बागेचा

## आपल्या घरी आपली बाग




लेखिका : सुनीती देशमुख

पृष्ठे १८० । किंमत २०० रु. । पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

लहानपणापासून फुलझाडांची व बागेची हौस असणाऱ्या सुनीती देशमुख यांनी अनेक महिला मंडळे, रोटरी, इनरव्हील क्लब, शाळा, कॉलजे, मूकबधिर विद्यालय, श्रमिक विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ प्रौढशिक्षण विभाग व उद्यान विद्या कोर्स वगैरे ठिकाणी पुष्परचना, सॅलड डेकोरेशन व बोन्सायच्या कार्यशाळा घेतलेल्या आहेत. आपल्या ज्ञानाचा लाभ इतर उद्यानप्रेमींना व्हावा हा उद्देश समोर ठेवूनच त्यांनी 'छंद बागेचा' हे पुस्तक लिहिले आहे.

बागेचा छंद असा आहे की, तो आपल्याला आनंद देतोच पण बघणाऱ्यालाही आनंद देतो. बागेमुळे आपल्याला फळे, फुले, भाजीपाला, औषधी वनस्पती मिळतात. वेद, उपनिषदे, पौराणिक ग्रंथ, कोरीव लेणी, मंदिरातील शिल्पकला धार्मिक विधी, सण उत्सव यामधून वेगवेगळ्या झाडांचे व फुलांचे महत्त्व कळते. संपूर्ण कृष्णचरित्र तर वने, उपवने, फुले, वृंदावन, कुंजवन आणि फळाफुलांच्या उल्लेखांनी भरलेले आहे. महाभारतामध्ये उपवने, वनविहार, पाने-फुले, वेगवेगळे वृक्ष, लता-वेली यांचे सुंदर वर्णन आढळते, तसेच रामायणातही. जैन धर्मातील २४ तीर्थंकरांना ज्या २४ पवित्र वृक्षांखाली ज्ञानप्राप्ती झाली यांची यादी देखील लेखिकेने पहिल्या प्रकरणात दिली आहे. मोगल बागाची वैशिष्ट्ये, ब्रिटिश साम्राज्यातील गार्डन्स याबद्दलही लिहिले आहे. त्या म्हणतात, 'गेली २५ वर्षे मला जो आनंद मिळत आहे तो तुम्हा बागप्रेमींनाही मिळावा.'

जागेनुसार बाग तयार कशी करायची? त्यासाठी काय काय तयारी करायची? बाग तयार झाल्यावर ती नीट कशी ठेवायची? काळजी कशी घ्यायची? यासारख्या प्रश्नांची उत्तरे या पुस्तकात मिळतील.

बागांचे विविध प्रकार, बोन्साय कसे करावे, खते-कीटकनाशके कशी वापरावीत व पुष्परचनेचे विविध प्रकार कोणते इत्यादी विषयांची सचित्र माहिती पुस्तकात दिलेली असल्यामुळे हे पुस्तक सर्वांसाठी उपयुक्त आहे असे आवर्जून सांगावेसे वाटते.

घराला जिवंतपणा देण्याचे काम बाग करते. बाग म्हणजे घराचा साजशृंगार आहे. बागेची रूपरेषा आखताना तुमची अभिरुची, झाडांची निवड व नैसर्गिकपणा या सर्वांचा समतोल राखला गेला पाहिजे. ही बागकामाची पहिली पायरी होय.

प्रारंभी नक्षत्र उद्यानाबद्दल (पान ९) माहिती दिली आहे.

फळझाडे व परसबाग करण्यासाठी शक्यतो मागची जागा निवडावी. गच्चीवरसुद्धा कुंड्या तयार करून ठेवता येतात कारण फळभाज्या व पालेभाज्यांसाठी सूर्यप्रकाश व ऊन भरपूर लागते. पूजेसाठी लागणारी फुलझाडे व फळझाडे कडेने लावावीत. ज्या ठिकाणी भरपूर ऊन आहे अशा ठिकाणी हंगामी

फुलांचे वाफे लावावेत. रंगीत फुलांसाठी उन्हाची अत्यंत गरज असते.

हिरवळ (लॉन) अनेक आकारात व अनेक प्रकारची लावता येते. हिरवळ कशी लावावी, खते कोणती वापरावीत व त्यांचे प्रकार ही माहिती आपल्याला मिळते. हिरवळ थोडी हिरवी दिसू लागल्यावर युरिया टाकावा. युरिया पानांवर पडू देऊ नये. तो पाण्यात घालून फवारावा. हिरवळीभोवती मोकळ्या जमिनीचा काठ ठेवावा. हिरवळ सतत हिरवीगार ठेवण्यासाठी खताचा उपयोग करणे आवश्यक असते. हिरवळ एक दीड इंच उंच झाल्याबरोबर कापावी. गवताची उंची अर्ध्या इंचापेक्षा जास्त नसावी.

गच्चीवरील बाग (टेरेस गार्डन) - बऱ्याच फ्लॅटधारकांना गच्ची उपलब्ध होऊ शकते. छोट्याशा बाल्कनीत सुंदर बाग तयार करता येते.

ज्या झाडांची मुळे खोलवर जाऊन इमारतीला धोका पोहोचवू शकत नाहीत, अशी झुडुपवर्गीय झाडे गच्चीवर लावावीत. पपई, लिंबू, डाळिंब, आवळा, शेवग्याच्या शेंगा इत्यादी फळझाडे गच्चीवर लावता येतात. यासाठी प्लॅस्टिकच्या मोठ्या कुंड्या घ्याव्यात. गच्चीवर झाडे लावण्यासाठी कोणती तयारी करावी व काय काळजी घ्यावी हेही पुस्तकात सांगितले आहे (पान २५).

रोप वाटिका (नर्सरी), धबधबा (वॉटर फॉल), जलोद्यान (वॉटर गार्डन), रॉक गार्डन यांचीही माहिती आपणास मिळते.

परसबाग (किचन गार्डन) - बागेचा हा विभाग सर्वांना परिचित व पूर्वापार चालत आलेला आहे. गच्चीवरसुद्धा परसबाग केली जाते व थोड्याशा श्रमाने आपण घरच्या घरी भाजीपाला पिकवू शकतो. लिंबू, आले, गवती चहा, अळू, कढीपत्ता, पुदिना ही रोजच्या उपयोगाची झाडे कुंड्यांमध्ये लावता येतात. घरातला ओला कचरा जिरवूनही किचन गार्डन तयार करता येते.

पालक, मेथी, पोकळा, भेंडी, गवार, टोमॅटो अशी कुठलीही भाजी आपण परसबागेमध्ये लावू शकतो. या पुस्तकात परसबागेमध्ये येणाऱ्या काही भाज्यांच्या जाती आणि त्यांचा हंगाम यांची यादी दिलेली आहे. (पान ४३)

हंगामी फुलझाडे - हंगामी फुलझाडांची फुले फार सुंदर असतात. फुलांच्या ताटव्यांशिवाय बागेला शोभा नाही. लहान जागेपासून अगदी मोठ्या जागेपर्यंत खूप वेगवेगळ्या रचना करून आपण बागेला, घराला, बाल्कनीला, व्हरांड्याला सजवू शकतो. पावसाळी, हिवाळी, उन्हाळी फुलझाडे, रोपे तयार करणे, त्यांची काळजी घेणे याबद्दल व्यवस्थित माहिती या प्रकरणात वाचायला मिळते आपल्याला हंगामी फुलझाडे लावून घर सजवायची प्रेरणा मिळते.

सावलीतील रोपे (इनडोअर प्लँट) - लेखिकेच्या मतानुसार घर, ऑफिस, कारखाने यांची कितीही सजावट करा, महागडे फर्निचर ठेवा, पेंटिंग लावा, शोभेच्या वस्तूंनी वास्तू सुशोभित करा, तरी त्या वास्तूला वा ऑफिसला

जिवंतपणा येत नाही. पण फक्त दोन-चार कुंड्या ठेवल्या तरी त्या जागेचे स्वरूप बदलते. ती जागा जिवंत वाटू लागते. ही जागा कायमची जिवंत वाटण्यासाठी सावलीतील रोपांशिवाय पर्याय नाही.

घरात झाडे ठेवण्याचे सजावटीबरोबर इतरही अनेक फायदे होतात. ते म्हणजे – झाडे वातावरण शुद्ध करतात. उदाहरणार्थ जेड, एपीक्रा, डोलटोडिया, सेडम, पिन्नटा इ. वनस्पती आपले अन्न तयार करण्यासाठी वातावरणातून कार्बनडाय ऑक्साइड वायू घेतात व प्राणवायू सोडतात. त्यामुळे वातावरण शुद्ध ठेवण्याचे काम ही झाडे करतात. प्रदूषण कमी करतात. हल्ली अनेक प्रकारची सावलीतील झाडे मिळतात. या झाडांची काळजी जास्त घ्यावी लागते. प्रकाश कमी असेल तर कृत्रिम प्रकाश द्यावा लागतो. म्हणून कमी प्रकाशात वाढणारी झाडे निवडावीत.

शिंकाळी (हँगिंग्ज) तयार करण्यावरही एक प्रकरण आहे.

कॅक्टस (निवडुंग) आणि सक्युलंट या प्रकरणात लेखिका म्हणते, की सर्वात सुंदर फूल असेल तर ते कॅक्टसचे. सॅक्युलंटच्या पानांचे आकार विविध व मनोहर असतात. बघणाऱ्याने बघतच राहावे!

कॅक्टस व सक्युलंट हे दोन्ही प्रकार म्हणजे निसर्गाचे सुंदर आविष्कार आहेत. आपण ज्याला ब्रह्मकमळाचे फूल म्हणतो ते ब्रह्मकमळ नव्हे, ते फड्या निवडुंगाचे परदेशी रूप आहे. कमळासारखे दिसते म्हणून त्याचे नाव ब्रह्मकमळ पडले असावे. मूळ ब्रह्मकमळ ही हिमालयात दहा हजार फुटांवर उगवणारी वनस्पती आहे. तिच्या उग्र वासाने भोवळ येऊ शकते. कमळापेक्षा सुंदर रंग व वासाचे ते एक सक्युलंटचे फूल आहे. (पृ. ७८)

बागेत कॅक्टस व सक्युलंट यांच्या कुंड्या एकत्र ठेवल्यास एक वेगळीच शोभा दिसते म्हणून यांना अशुभ मानू नये.

शुष्क काष्ठ, तबकातील बाग, बॉटल गार्डन यांचीही सचित्र माहिती दिलेली आहे.

विभाग २ मध्ये बोन्साय, केन्साय म्युरल, ट्रे लँडस्केप, ट्रे वॉटर गार्डन, रॉक प्लँटिंग याची माहिती वाचायला मिळते.

बोन्साय ही लोकप्रिय कला आहे. एखादा शिल्पकार किंवा चित्रकार सुंदर कलाकृती ज्याप्रमाणे तयार करू शकतो, त्याप्रमाणे बोन्सायप्रेमी निसर्गातल्या मोठ्या झाडांना कलात्मकरीत्या छोटे रूप देऊन छोटी-छोटी झाडे तयार करून छोट्या ट्रेमध्ये निसर्गाचे जिवंत सुंदर रूप साकार करू शकतो. निसर्गातल्या मोठ्या झाडांचं हे जिवंत बटुरूप पाहून अगदी अरसिक माणूससुद्धा थक्क होऊन जातो. या कलेच्या छंदामुळे मनाला निसर्गाचा लळा लागतो. निसर्ग निरीक्षणाची सवय लागते. सुख, दुःख, चिंता, क्लेश यांचा विसर पडतो. (पृ ९९)

पुष्परचना - या पुस्तकाच्या तिसऱ्या भागात लेखिकेने पुष्परचनेविषयी सविस्तर माहिती दिली आहे.

पुष्परचना म्हटले की आपणास जपानी 'इकेबाना' आठवतं. जपानने या कलेत केलेली प्रगती अचाट आहे. पुष्परचनेचा पाश्चिमात्य प्रकार जपानी पुष्परचनेच्या मानाने सोपा आहे. इकेबाना शिकण्यासाठी जिद्द, चिकाटी, सराव यांची अत्यंत आवश्यकता असते.

भारतीय नृत्यप्रकारांचे हावभाव लक्षात घेऊन त्या आधारे सुंदर रचना आपल्याला करता येतील किंवा अशाच सुंदर भारतीय कल्पनांचा उपयोग करून आकर्षक अशी पुष्परचना करता येईल असेही लेखिकेने सुचवले आहे.

'पुष्परचना' ही कला भारतीय लोकांसाठी नवीन नाही. आपण तर तिच्याकडे परमेश्वराची आराधना किंवा परमेश्वराची प्रतिकृती म्हणून पाहतो. आपण श्री सत्यनारायणाची पूजा बांधतो तीही एक पुष्परचनाच आहे. तांब्यातील गौरी, मंगळागौरीची पूजा, हरितालिकेची पूजा या सुंदर पुष्परचनाच आहेत.

पुष्परचना करताना खालील गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

(१) नाजूक फुलांच्या वापरासाठी नाजूक फ्लॉवरपॉट वापरा.
(२) फ्लॉवरपॉटच्या रंगाप्रमाणे फुलांचा रंग निवडावा.
(३) फ्लॉवरपॉट भडक रंगांचे नसावेत.
(४) पुष्परचना केल्यावर बघणाऱ्यांचे लक्ष पुष्परचनेकडे आकर्षित झाले पाहिजे, पुष्पपात्रावर नाही.
(५) पुष्परचना घाईघाईने करू नये.
(६) पुष्परचना करण्याआधी पाने-फुले अर्धा तास पाण्यात ठेवा.
(७) फुलापानांची उंची सारखी ठेवू नका.
(८) १, ३, ५ अशा विषम संख्येने फुले-पाने लावावीत.
(९) शक्यतो पिन होल्डर दिसणार नाही याची काळजी घ्या.
(१०) फुला-पानांची मांडणी व्यवस्थित करा. त्यांना जास्त वेडेवाकडे कापू नका.
(११) रंगसंगतीचा नीट विचार करून रचना करा.
(१२) पुष्परचना पुष्पपात्राच्या साधारण दीडपट असावी.

चिरतरुण इकेबाना मध्ये तीन प्रमुख फांद्या असतात. त्यांनाच स्वर्ग, मानव, पृथ्वी किंवा सब्जेक्ट, ऑब्जेक्ट, सेकंडरी असे म्हटले जाते. जपानी भाषेत 'शिला', 'सोये', 'हीकाए' अशी त्यांची नावे आहेत. इकेबाना जास्त नैसर्गिक व सांकेतिक रचना असून त्या संदेशवाहकही असतात.

पाश्चिमात्य शैलीची पुष्परचना, भिंतीवरील पुष्परचना, पाण्यावरचा गालिचा ही प्रकरणेही खूप काही शिकवणारी आहेत.


चौथ्या विभागात लेखिकेने औषधी वनस्पती, रासायनिक खते, गांडुळखत, रोपवाटिका, बागकामासाठी लागणारी अवजारे व हंगामी फुलझाडांचा तक्ता अशी माहिती देणारे लेख लिहिले आहेत.

एकंदरीत हे पुस्तक उद्योगप्रेमींना व निसर्गप्रेमींना तसेच बागकामाची आवड असणाऱ्या उत्साही नवशिक्यांना खूप आवडेल; कारण बागकाम करताना नेमके काय काय करायचे याबद्दलच्या अनेक उपयुक्त 'टीप्स' पुस्तकात मिळतात.

– डॉ. निर्मला सारडा

**५वी आवृत्ती**

# खुश खरेदी




लेखक
शंकर पाटील

किंमत :१००/-रु. । पोस्टेज :२५/-रु.

बाबू चांगलाच कर्जबाजारी झाला. तवनाप्पाचे घेतलेले दहा हजार रुपये कशानं फेडायचे हे कळेना झालं. अखेर यावर पंचाईत बसली आणि सगळ्यांनी मिळून असं ठरवलं, बाबूनं हे हॉटेल कर्जापोटी तवनाप्पाला लिहून द्यावं आणि तवनाप्पानं त्यात आपलं कर्ज वळतं करावं, इतरांचीही देणी भागवावीत आणि एक-दोन हजार रुपये बाबूला रोख द्यावेत. पंचाईतीत ठरल्याप्रमाणं सगळ्या गोष्टी नमूद करून पक्का कागद केला. रोख रुपये दोन हजार घेऊन खुशखरेदी लिहून दिली. हॉटेलची मालकी तवनाप्पाकडे आली. सगळ्या फर्निचरसह, सगळ्या वस्तूंसह हॉटेल ताब्यात देऊन बाबू मोकळा झाला. कुणाच्यातरी व्यवस्थेखाली 'स्वल्पविराम' हॉटेल तवनाप्पा चालवू लागला आणि बाबूनं रोख मिळालेल्या पैशात जवळच दुसरं हॉटेल खोललं. असे आठ - पंधरा दिवस गेले आणि गावात जे अतिशहाणे चार लोक होते, त्यांनी एक नवीच शक्कल काढली.


३ री आवृत्ती

# पुणे ते पंतप्रधानांचे कार्यालय

मूळ लेखक
बी.जी.देशमुख

अनुवाद
अशोक पाध्ये

किंमत:४००/-रु. । पोस्टेज:३०/-रु.




.बोफोर्ससारख्या प्रकरणांचा जन्म इंदिरा गांधी यांच्या कारकीर्दीत झाला. पुढे काँग्रेस पक्षाला पैसे मिळवून देण्यासाठी संजय गांधी यांनी हे तंत्र पाहिजे तसे सुधारले...


...राजीव गांधी यांनी किंवा त्यांच्या कुटुंबीयांपैकी कोणीही बोफोर्स प्रकरणामध्ये दलाली, कमिशन अथवा पैसे घेतले नाहीत. पण तरीही परिस्थितीजन्य पुरावे हेच दर्शवितात की, दलाली घेतलेल्यांची नावे त्यांना ठाऊक होती आणि ती नावे उघड करण्यास ते नाखूष होते. कदाचित ती नावे काँग्रेस पक्षातील व्यक्तींची असतील, जवळच्या नातेवाईकांची किंवा मित्रांचीही असतील.

ही नावे त्यांना बोफोर्सचा करार पक्का होण्यापूर्वी कळली होती की, करार झाल्यानंतर कळली होती?

...शिक्षणसंस्था, सैन्य, निमलष्करी दले आणि सरकारी नोकऱ्यांतील बढत्या येथे आरक्षणाचे धोरण राबवले जाणार नाही, असे आश्वासन पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांनी दिले होते. पण तरीही आरक्षणविरोधी भावना शमली नाही.

....लटपट्या व भोंदू तांत्रिक चंद्रास्वामी हा भारतात आज रात्री परतत आहे, ही बातमी महसूल सचिव मिश्रा यांनी पंतप्रधान चंद्रशेखर यांना दिली. परंतु या बातमीमुळे त्यांना फारसा आनंद झालेला दिसत नव्हता, म्हणून मी असा तर्क काढला की, आता ही बातमी चंद्रास्वामी यांच्यापर्यंत पोहोचवली जाईल. मग ते भारतात परतण्याचे नक्की रहित करतील. अन् शेवटी तसेच झाले. आता मिश्रा यांची लवकरच बदली होणार हे मी हेरले.

**६वी आवृत्ती**




# क्रांतिसूर्य

लेखक
विश्वास पाटील

किंमत : १५०/-रु.
पोस्टेज :३०/-रु.

१९४२ मध्ये ब्रिटिशांची झोप उडवणाऱ्या क्रांतिसिंह नाना पाटीलयांची समरगाथा...
१९४२ च्या धगधगत्या कालखंडात सातार्याच्या भूमीमध्ये ‘प्रतिसरकार’ (पत्रीसरकार) स्थापन करून ब्रिटिशांची झोप उडवणाऱ्या क्रांतिसिंह नाना पाटलांची ही समरगाथा. क्रांतिसिंह - एक फर्डा वक्ता, द्रष्टा समाजसेवक, डाव्या चळवळींचा सेनानी, संयुक्त महाराष्ट्राचा लढवय्या, महाराष्ट्राचा माळकरी मार्क्सवादी. त्यांचे लोभस, रांगडे व्यक्तिमत्त्व, मातीतून आकारलेले नेतृत्व, मुलखावेगळे कर्तृत्व यांचा शोध घेणारी, कादंबरीकार विश्वास पाटीलयांच्या लेखणीतून साकारलेली ‘क्रांतिसूर्य’.




# आणि विक्रमादित्य हरला!

## समकालीन नीतिमत्तेतील गुणदोषांची झाडाझडती घेण्यासाठी विक्रम-वेताळ यांचा उपयोग




लेखिका : स्वाती चांदोरकर

पृष्ठे १५६ । किंमत १६० रु. । पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

स्वाती चांदोरकर यांनी आपल्या वडिलांचा, व.पु.काळे यांचा लेखनाचा वारसा आपल्या प्रयोगशीलतेने पुढे चालवला आहे.

गेल्या आठदहा वर्षात त्यांच्या नावावर युथनेशिया, पवित्रम्, एक पायरी वर या कादंबऱ्या, काळाकभिन्न आणि विक्रमादित्य हरला हे दोन कथासंग्रह, वपुंचे व्यक्तिचरित्र, ओशोंच्या चार पुस्तकांचे अनुवाद वगैरे ग्रंथसंपदा नोंदवली गेली आहे. स्वाती चांदोरकरांच्या कथाकादंबऱ्यांमध्ये विषयाचे तसेच शैलीचे वेगळेपण आढळते. 'युथनेशिया'मध्ये इच्छामरणाची संकल्पना पुरस्कृत करण्यात आली आहे; पवित्रम् मध्ये दशक्रिया करणाऱ्या किरवंत पुरोहित भटजींना त्यांच्याच भाऊबंदांकडून मिळणाऱ्या दुय्यम दर्जाच्या वर्तणुकीचे कडवट अनुभव टिपण्यात आले आहेत. 'एक पायरी वर' मध्ये आजच्या स्त्री मुक्तीच्या जमान्यातही स्त्रियांना बंडखोरी करून खरे स्वातंत्र्य किंवा सन्मान मिळवणे कसे अवघड जाते यावर प्रकाशझोत टाकला आहे. त्यांच्या कथांमध्येही वेगवेगळे विषय हाताळले जातात. आजकाल बहुतेक लेखक आपल्या आत्मकथनापासून लेखनाला प्रारंभ करतात आणि आपल्या जीवनातील अनुभवांवरच आपले लक्ष केंद्रित करतात. अशा वेळी स्वाती चांदोरकर यांनी वपुंवर लिहिण्यापासून जरी प्रारंभ केला असला तरी केवळ आत्मकथनाच्या शिदोरीवर आपली वाटचाल चालू न ठेवता वेगवेगळे विषय आणि वेगवेगळे लेखनशैलीचे प्रयोग करण्याचे धाडस दाखवले याचे कौतुक वाटते.

आपल्या जीवनानुभवांबरोबरच समकालीन समाजस्थितीचे निरीक्षण करून, त्यात आढळणाऱ्या विसंगती, भ्रष्टाचार, दुटप्पीपणा, नीतिमूल्यांबाबतचा गोंधळ, स्वार्थपरायणता यांच्या विदारक वास्तवाचा वेध घेण्याचाच त्यांचा प्रयत्न जाणवतो. त्याच्या प्रभावी अभिव्यक्तीसाठी भारतीय कथाभांडाराच्या पारंपरिक आकृतिबंधांचा आधार घेण्याची संधीही त्यांना उपयुक्त वाटते आहे हे त्यांच्या 'आणि विक्रमादित्य हरला!' या नव्या पुस्तकावरून जाणवते. विक्रम आणि वेताळ, सिंहासन बत्तिशी यासारख्या आपल्या संस्कृत कथामालिकांचा वापर या पुस्तकात त्यांनी केला असून आधुनिक नीतिमूल्यांबाबतची आपली अनास्था किंवा अडचण यावर त्यांनी नेमके शरसंधान केले आहे.

विक्रम-वेताळ सारख्या संकल्पनांमध्ये सातत्याने नवा आशय आविष्कृत करण्याची क्षमता आहे, याकडे स्वाती चांदोरकर लक्ष वेधतात. आपल्या सुहासदादाला हे पुस्तक अर्पण करताना त्या म्हणतात, ... ''ह्या कथांचे जनक राजा विक्रमादित्य आणि वेताळ आपण दोघांनी लहानपणी एकत्र अनुभवले. अशा संकल्पनांना वय नसते. आणि अशा काही गोष्टी वय कितीही वाढलं तरी आपल्याला चिरतरुण ठेवतात. तू असाच कायम तरुण आहेस. तुझा उत्साह, तुझी रसिकता, तुझ्या कला ह्या तुझ्यातल्या तरुणाला माझे विक्रमादित्य वेताळ

अर्पण.''

आपल्या मनोगतातही स्वाती चांदोरकर म्हणतात, ''राजा विक्रमादित्य आणि वेताळ यांना मला माझ्या नजरेनं बघावंसं वाटलं. ही फॅन्टसी नाही. कारण माझ्या मनात, माझ्या विचारांतून राजा विक्रमादित्य आणि वेताळ कायमचेच मुक्कामाला आले. तो काळ आणि आजचा काळ, त्या काळातल्या घटना-गोष्टी आणि आजच्या काळातल्या घटना-गोष्टी यात तफावत आहे. या आजच्या गोष्टींवर काही उत्तरं आहेत का असा सहज प्रश्न निर्माण झाला. प्रश्नांना उत्तर देणारा राजा आठवला. आज जर तो खरोखरच असता तर त्यानं काय उत्तरं दिली असती? वेताळाने त्याला कसे प्रश्न विचारले असते? गोष्ट ऐकताना वय लहान की मोठे असा प्रश्न उद्भवत नाही. या गोष्टींचं स्वरूप बदललेलं नाही. पण त्या सांगण्यासाठी आता अनेक मार्ग उपलब्ध झालेले आहेत. तरीही आपला जुना अंगवळणी पडलेला मार्ग मला खुणावत राहिला. आणि ह्या कथांना वेताळाचा आवाज आणि विक्रमादित्याची नि त्याची खोड असावी असं प्रकर्षानं वाटलं.''

विक्रमादित्य आणि वेताळ या जोडीच्या एकूण १४ कथा 'आणि विक्रमादित्य हरला' या पुस्तकात आल्या आहेत.

''हातात नंगी तलवार, अंगात अंगरखा, खाली सुरवार आणि पायांत मोजड्या. कंबरेवर शेला. त्यात खोवलेला बिचवा. मानेवर रुळणारे घुंगरुदार केस. कपाळावर उभं गंध आणि लफ्फेदार मिशा. कानात मिकबाळी. राजहंसी आत्मविश्वास प्रकट करणारी चाल, मौन मुद्रा आणि पाणीदार पण करारी डोळे. झाडावर लटकणारे प्रेत आपल्या धष्टपुष्ट बाहूंनी लीलया खांद्यावर घेऊन राजा विक्रमादित्याची पावलं स्मशानवाट चालू लागली.'' ही आरंभीच उभी केलेली विक्रमादित्याची प्रतिमा आपल्या मनावर पक्की छाप उमटवते.

-आणि तेवढ्यात प्रेतातला वेताळ त्याला नामोहरम करण्याच्या, त्याला खच्ची करण्याच्या ईर्षेने बजावतो, ''आजही तुझं हे मौन सोडायला मी तुला भाग पाडणार.''

पारंपरिक कथांमध्ये वेताळाने विक्रमादित्यापुढे उभे केलेले नीतिअनीतीचे, न्याय अन्यायाचे प्रश्न हे त्या काळातील संदर्भातले होते. आजच्या वेताळाने विचारलेले प्रश्न समकालीन संदर्भातले आहेत; असायला हवेत, हे स्पष्टच आहे.

स्वाती चांदोरकरांच्या या आधुनिक विक्रमादित्य - वेताळ कथांमध्ये किंवा केस हिस्टरीमध्ये नैतिक - अनैतिक, उचित - अनुचित, न्याय-अन्याय, शिष्ट-अशिष्ट भूमिकांचे संदर्भ येतात.

'फक्त नरकच' या कथेतला गर्भश्रीमंत विलास कोकणातील शेतीवाडीची व्यवस्था लावून मुंबईला कारने परत निघतो. पनवेलजवळ त्याची कार एका टू व्हीलरला उडवते. तिच्यावरचे दोन तरुण हवेत उडून खाली धडपडतात. पण

विलास कार न थांबवता तसाच पुढे निघून जातो. एका पंपावर थांबून एका ट्रक ड्रायव्हरला मुंबईपर्यंत कार दोरीने बांधून टो करायची व्यवस्था करतो. घरी पोचतो तर मुलगा अंशुमन अजून घरी पोचलेला नसल्याने विलासची बायको चिंताग्रस्त असते. थोड्या वेळाने पनवेलच्या हॉस्पिटलमधून फोन येतो. ''लगेच पनवेल हॉस्पिटलमध्ये ॲक्सिडेंट वॉर्डमध्ये या. आपला मुलगा ॲडमिट आहे.'' टू व्हीलरवरचा अंशुमनचा जोडीदार विराज पांचाळ याच्या आईचाही फोन येतो. ''कोण तो कसाई? मुलांना उडवून निघून गेलाय, डॉक्टर म्हणाले, जर लगेच मदत मिळाली असती तर दोघेही वाचले असते.''

वेताळ ही हकीकत सांगून विक्रमादित्याच्या प्रतिक्रियेची वाट बघतो.

''फक्त स्वत:बद्दल विचार करणाऱ्या विलासने हातून गुन्हा घडलाय तर प्रायश्चित्तही घ्यायला हवे. त्याने जर आपणहून प्रायश्चित्त घेतले असते तर कडेलोट व्हावा इतकी तीव्र सजा त्याला मिळाली नसती... प्रत्येकजण फक्त स्वत:चा विचार करतोय. विलासने तेच केले. तो मदतीसाठी थांबला असता तर ते दोन जीव वाचले असते. आता विलासला होणारं दु:ख हे केवळ यासाठी आहे की मृतांपैकी एकजण त्याचा मुलगा आहे. तो त्याचा मुलगा नसता तर विलास आपलं विलासी आयुष्य जगत राहिला असता. स्वत:चा विचार करण्याआधी दुसऱ्याचा विचार करण्याची वृत्ती असली तर त्याच्यावर दु:ख करण्याची पाळी आली नसती...''

वेताळ मुकाट्याने त्याच्या झाडावर प्रेतासकट लटकू लागतो. तर विक्रमादित्य आपल्या राजवाड्याकडे निघालो.

कापडाच्या दुकानाबाहेर शोकेस मध्ये आकर्षक स्त्रीदेहाचे पुतळे सजवून ठेवलेले असतात. त्याकडे लोक हपापल्यासारखे बघत असतात... तेजस्विनी मोहिते ही तरुणी सहा दुकानांच्या शोकेसच्या काचा दगड मारून फोडते. पोलिसांना सांगते, ''मी या काचा फोडलेल्या आहेत. माझ्यावर खटला भरा. मला कोर्टात उभे करा. फक्त माझ्या घरी फोन करून कळवा.'' न्यूज चॅनल्सवर ही बातमी झळकते. ती न्यायाधीशांना सांगते, ''जज्जसाहेब, तो पुतळा होता, पण एका स्त्रीचा होता. मी संपूर्ण कपड्यात असनूही नग्नतेची भावना माझ्या मनाला डसू लागली. ही नग्नता विचारांची, अशा तऱ्हेने स्त्रीला उघड्यावर ठेवणाऱ्या दुकानदाराची, दगडी नजरेनं बघणाऱ्या तमाम स्त्री जमातीची आणि स्त्रीचं हेच रूप प्रकाशात आणणाऱ्या पुरुषी समाजाची! हे सर्व तोडून फोडून टाकावं या एकाच विचारानं मी झपाटले. मिळेल तो दगड हातात घेतला आणि... मग काचांचे आवाजच येत राहिले मी फक्त अशीच दुकाने फोडली. विचारा या सहाही दुकानदारांना!''

तेजस्विनीची ही कहाणी राजा विक्रमादित्याला सांगून वेताळ विचारतो,

''सांग राजा, तेजस्विनीचं पुढं काय झालं असेल? तिने जे कृत्य केले ते योग्य होते की अयोग्य? माझ्या प्रश्नांचं निरसन करणं शक्य असूनही तू मौन पाळलंस तर तुझ्या डोक्याची शकलं होतील.''

विक्रमादित्य उत्तर देतो, ''आपल्या राज्यात असं कधी घडलं नाही. पुढंही घडणार नाही. या आटपाट नगरातील जनता ही अशी असावी? मी सर्द झालो आहे. माझ्या विचारांना तुझ्या प्रश्नांच्या संदर्भात कसं बांधावं हे ठरवतो आहे. तेजस्विनीला न्याय मिळायला हवा. तिची सन्मानाने पाठवणी करायला हवी ती तिच्या घरीच. न्यायमूर्तींनी तसंच केलं असणार. मात्र भावनेच्या भरात केलं गेलेलं हे कृत्य आहे. स्त्रीत्वाचा जाज्ज्वल्य अभिमान आणि म्हणूनच स्त्रीच्या देहाची होत असलेली विटंबना, जनतेला – आम जनतेला आलेली बधिरता. या अशा कारणास्तव आणि नव्या पिढीचा एकांगी दृष्टिकोन यांचा उद्रेक तेजस्विनीला असह्य होणे स्वाभाविक आहे. कारण समाजामध्ये सुधारणा होत नसून चुकीच्या धारणेलाच नाविन्याचं नाव दिलं जातंय... पण या सहा दुकानांच्या काचा फोडून, स्त्रीमूर्ती तोडून काय साध्य झालं? हा समाजाच्या दृष्टिकोनाचा प्रश्न आहे... सामाजिक नैतिकता आवश्यकच आहे, हे कुमारवयातच शिकवलं गेलं पाहिजे. नैतिकता पाळूनही व्यवसाय उत्तम होऊ शकतो असा आत्मविश्वास निर्माण करायची गरज आहे. विचारांची सुंदरता हवी. ती आपणच स्वत: जपायला हवी.''

... वेताळ म्हणतो, ''मी तुझं मौन मोडण्यात यशस्वी झालो... मी जिंकलो, हा मी चाललो.''

... अशा अनेक कथा आणि त्यातून उभे राहणारे नैतिकतेचे जटिल, ... गुंतागुंतीचे मुद्दे आपल्या विचारबुद्धीला, मानवतावादाला, न्यायप्रियतेला आव्हान देतात. त्यामुळे या नव्या विक्रम-वेताळ कथांचे स्वागत करायला हवे.

-शंकर सारडा

## (आणि विक्रमादित्य हरला या पुस्तकातील काही अंश)

## शोध

राजा विक्रमादित्य चिंतित होता. हा राजमहाल इतका पुरातन... अनेक पिढ्यांचं इथे बहरास येणं आणि काळानुसार त्यांचं अस्तित्व नाहीसं होणं. पण आजतागायत अशी शक्यता कधीच कुणी उच्चारली नव्हती की, या राजमहालात भूत-पिशाच असेल. परंतु आजकाल राजा विक्रमादित्याच्या कानांवर तशी ओझरती चर्चा पडत होती. राजाला हसू येत होतं. वर्षानुवर्षे, युगानुयुगं त्याचं नातं

अशाच एका पिशाचाशी होतं आणि त्याचं त्याला कधी भय वाटलं नव्हतं. त्याला म्हणजे पिशाचाला ‘वेताळ’ का म्हणायचं, हेही त्याला ज्ञात नव्हतं आणि ज्ञात व्हावं असा राजाने कधी यत्नही केला नव्हता.

राजमहालात एक प्रकारची गूढता निर्माण झाली आहे, हे मात्र राजाला जाणवत होतं. एक भीती-भय. ‘भय का निर्माण होतं?’ वेताळाला विचारायला हवं. खरंतर वेताळ म्हणजे नक्की कोण? आणि का आपल्याला त्याला भेटावंसं वाटतं? आपण मानव असूनही वेताळाकडे कसे काय आकृष्ट होतो?’ राजाच्या मनात प्रश्नांची मालिकाच सुरू झाली.

‘सर्वसामान्य माणसांना कसलं भय असतं रे वेताळा? आणि का? किती प्रकारचं भय असतं? वर्गवारी काय ह्या भयाची?’

‘राजा, आज हे असे सवाल का मनात उद्‌भवत आहेत?’

‘जितक्या मानवांच्या तऱ्हा, तितकी भयाची व्याप्ती. हो ना?’

‘हो. सत्य आहे. परंतु...’

‘वेताळा, ती स्त्री बघ... काय होतंय तिला?’

‘ते जाणून घ्यायला हवं. तर उमजेल.’

‘चल. बघू या...’

एक विचित्र भय. खरंतर भीती, भय ह्या शब्दांचा मला प्रचंड तिटकारा आहे. कधीपासून? अगदी... न कळत्या वयापासून का? असेलही.

लहानपणी भीती वाटायची अंधाराची. अंधार म्हणजे प्रकाशाची गैरहजेरी. अंधार असतोच. प्रकाश निर्माण करावा लागतो. प्रकाशात येण्याची धडपड. एकदा का प्रकाशात आलो की आधार वाटायचा. जन्म काळोखात होतो म्हणून अंधाराची भीती वाटते का? ‘जन्म’ हीच खरी भीती. म्हणजे जन्म नसता तर मरणाची भीती वाटलीच नसती. पण आईच्या उदरातला तो जन्म. पुढले अंधारातले नऊ महिने. त्याची खरंतर सवय झालेली असते आणि तरीही प्रकाशाची भीती न वाटता अंधाराची भीती वाटत राहते. थोडं मोठं झाल्यावर समजलं होतं की, अंधार भीतिदायक, भयावह नसतो. मग प्रकाश, उजेड... तर उजेडात दिसणाऱ्या गोष्टींची भीती वाटू लागली. झुरळ! बाप रे! झुरळाची भीती का? ह्याला उत्तर नाही. असंख्य जिवांसारखा तोही एक जीव. पण तरीही. आई भ्यायची झुरळाला. ती झुरळाला बघून ओरडायची. ती ओरडली की, आपल्याला भीती वाटायची. तिच्या ओरडण्याची भीती वाटायची की ती जी वस्तू बघून ओरडते त्या वस्तूची भीती! अर्थात वस्तू. वस्तू काय म्हणत्ये मी? जीव... झुरळ! त्याच्या त्या दोन मोठ्ठाल्या मिश्या आणि एकंदरीतच त्याचं रंग-रूप! बेगॉन स्प्रे मारला की ते मरतं हे समजलं तेव्हा मी शूर झाले. भीती कमी झाली.

एका भीतीची जागा लगेचच दुसरी गोष्ट घेते. आग! सायन्समध्ये शिकवलं गेलं, आग दिसली की आधी पाणी ओतायचं. पण उकळलेलं पाणीच जर अंगावर पडलं तर मग? भाजण्याची भीती! रस्त्यावरून जाताना कुणी ॲसिड फेकेल... भीती. कारण हवंच त्यासाठी असं नाही. गैरसमजूत होऊनही कुणी दुसरीवरच ॲसिड फेकून पलायन करतं.

या भीतीची यादी वय वाढत जातं तशी वाढतच जाते. सुसाट धावणाऱ्या गाड्या, मारामारी, गणित, इंग्रजी, परीक्षा... परीक्षा म्हणजे भीतीचा मुकुट. एकवीस वर्षं सतत झगमगत राहणारा. अजून मोठी झाले आणि ह्या मुकुटात शिरपेच खोवला गेला भीतीचा. ही भीती माणसांची! काही काही माणसं भीतिदायक वाटू लागली. त्यांचं अस्तित्व भयकारी! त्यांचा आवाज जिवाचा थरकाप उडवणारा. ह्या भीतीने तारुण्य नासवलं. अंकुर फुटला नाही. वेल कोमेजून गेली.

मग केव्हातरी जाग आली. वाटलं, का भ्यायचं?

एक बेडरपणा. भीतीवर मात करणारा आणि मग जाणवलं की, अशी माणसं स्वत:च प्रचंड घाबरलेली असतात. दुबळी असतात. हे दुबळेपण लपवण्यासाठी त्यांना त्यांचा आवाज जरुरीपेक्षा कितीतरी पटीने वाढवावा लागतो, कारण त्यांना त्यांचा आतला आवाज ऐकायचा नसतो. संपूर्ण आयुष्य ह्याच चिंतेत व्यतीत होतं. सतत हीच धडपड, हाच प्रयत्न आणि मग नंतर? नंतर एक नीरव शांतता. सगळा आटापिटा थंड, शांत! मग ते कलेवर अग्नी गिळंकृत करतो किंवा धरणी आपल्या पोटात घेते. एखादा प्राणी जर मरतो, तर काही ना काही मार्गे उपयोगी तरी पडतो. त्याचं मांस प्राणी, पक्षी खातात. पक्षी म्हणजे गिधाडं, कावळे... कातडीच्या वस्तू बनतात... आणि अशा प्राण्यांना मनुष्य घाबरतो. असा मनुष्य घाबरतो ज्याचा मेल्यानंतरही कुणाला उपयोग नाही. पृथ्वीच्या पोटात अनेक सांगाडे असतील आणि पृथ्वीचा जरासाही भाग आज कित्येक युगं जन्मणारा आणि मरणारा मनुष्य – त्याने व्यापलेला असेल मरणोत्तर आणि अशाच पृथ्वीवर मंदिरं, घरं, चर्च, गुरुद्वारा, मशिदी उभारल्या गेल्या आहेत. पवित्रतेचं लावण्य घेऊन सजून उभ्या आहेत एका-एका धर्माच्या पवित्र खुणा! मग भ्यायचं कशाला? का?

भय गेलं. नक्कीच गेलं, पण अशी एखादी कातर संध्याकाळ येते आणि एक रुखरुख सुरू होते. एक दुसरीच संध्याकाळ आठवते. अगदी पाठलाग करते. भीती वाटते.

'भीती कशाची?'

'आयुष्याच्या अनिश्चिततेची.'

‘हे काय आज नव्याने समजलं का तुला?’

‘नाही.’

‘मग? आयुष्यात अनिश्चिततेची. आयुष्याला फसवणारी अनेक घटनांची मालिका बघत आली आहेस तू. तीही जाहिरातींशिवायची मालिका. नो ॲड्स प्लीज! आणि त्या भीतीला मनातून पार उखडून टाकलं आहेस. होय ना? अगदी मुळासकट...’

‘पण तरीही, कधीतरी वाटतं की, मीही हे सोंग घेतलं आहे बेडरपणाचं. इतरांसारखी मीही आतून घाबरलेली...’

‘कशाला?’

‘मरणाला, माणसांना, कधीकधी स्वत:लाही...’

‘कुठलीही भीती ही नेहमीच मरणाशी निगडित असते.’

‘कसं शक्य आहे?’

‘आहे. पूर्वी तू झुरळाला घाबरायचीस. का?’

‘आई घाबरायची म्हणून मग मलाही...’

‘चूक. ते झुरळ आपल्याला काहीतरी करेल, मग आपण मरू त्यापेक्षा तेच मेलेलं बरं...’

‘असेलही...’

‘आणि अंधार?’

‘अंधार म्हणजे? बरोबरच आहे. दिसत नाही काही. मग कुठे आपटेन, पडेन...’

‘लागेल, रक्त येईल, अंधारात कुणी लपलं असेल, तर मारेल... मरण...’

‘असेल. असेल.’

‘चाळीतला तो डुगडुगणारा जिना. त्याचा कठडा दोरीने बांधलेला. त्यावर चुकून रेललं तर कठडा मागे झुकणारा आणि खाली पायऱ्यांचं वाटोळं – उताराकडे जाणारं...’

‘कुणाचा चुकून तोल गेला तर सरळ खाली...’

‘म्हणजे मरणच ना?’

‘हो.’

‘मग आगीची भीती. मरण देणारी. अव्याहत मरणाची लांबलचक साखळी. कित्ती वेळा मरत असतो आपण... पण ते जगताना जाणवत नाही. पण असा एखादा क्षण येतो आणि माणूस मरतो... परीक्षा... सतत पास होत राहायचं म्हणून धडपड.’

‘पण हल्ली भीती वाटण्याअगोदरच म्हणजे नापास व्हायच्या अगोदरच मृत्यूला मिठी मारली जाते, निकाल जाहीर व्हायच्या आधीच. आणि तरीही परीक्षा

संपत नाहीत.'

'आता पटलं तुला.'

'मुलांची काळजी वाटते आता. दोघांचीही. मुलगी वयात आली आहे म्हणून आणि मुलगा तटस्थ होत जात आहे म्हणून. तो व्यसनी तर होणार नाही ना? कुणा मुलीला फसवणार तर नाही ना? एकतर्फी प्रेम झालं त्याला तर त्या मुलीचा बदला घेणार नाही ना? एक ना दोन. संस्कार सगळेच करतात आपल्या मुलांवर, पण समाजाच्या गर्दीत ते फार थिटे पडत आहेत आणि मुलीचं काय होणार? नहाण आलं आहे तिला. हल्ली नहाण येणं हे ते येण्याआधीच मुलींना सर्व काही समजलेलं असतं म्हणा! हे उपकार आहेत, सायन्सचे, जाहिरातींचे.'

'ऊठ आता. कातरवेळी अशी बसून राहू नकोस. उद्या दिवाळी आहे. सामान आणायचं आहे. मग कंदील लावायचा आहे. सर्व जबाबदारी तुझीच. ऊठ.'

'उठलेच. हल्ली विनाकारण मेंदूत काहीतरी घोळ होत असतो. मुलं म्हणतातच की, आई हल्ली सतत कुठेतरी हरवलेली असते. मन पार झटकून टाकलं. सगळे घरी येण्याअगोदर पटापट आवरून टाकावं. चेहरा मस्त हसरा करावा. निघावंच बाहेर.'

रस्ता वाहनांनी, माणसांनी, हरतऱ्हेच्या वस्तूंनी रंगीबेरंगी झालेला. त्या गर्दीत माझीही भर पडली. उत्साह अगदी ओसंडून वाहतोय. कंदील, पणत्या, रांगोळी, छोटे छोटे चौथरे... मस्त! बरं झालं बाहेर पडले आणि ह्या उत्साहाचा एक भाग झाले ते. चायना मेड लहान लहानसे दिवे. त्यांची माळच माळ...

हवं नको बघत-बघत, भाव करत, अगदी रमत-गमत. गर्दीला आपलंसं केलं की, गर्दीचा त्रास होत नाही. हे विनाकारण ह्या गर्दीवर चिडतात. मला वाटतं प्रत्येकाला असं वाटतं की, आपण काही कारणाने घराबाहेर पडलो की, रस्ते रिकामे असावेत. गंमत वाटली. सिग्नल बघून थांबले. थांबायलाच हवं. गाड्या नुसत्या धावत आहेत. आता एवढ्या ट्रॅफिकमध्ये धावताना त्यांचा वेग तो काय असणार? पण गाडी म्हटलं की, धावणं हाच शब्द मनात येतो. माणूस चालतो, गाडी धावते, उंदीर पळतो. वाघ झेप घेतो. मोर नाचतो.... केवढा हा आवाज? इतका करकचून ब्रेक. एक मुलगी आपल्याच तंद्रीत रोड क्रॉस करताना दिसली. गाड्या जात-येत आहेत. कशाचंच भान नाही. तिलाच वाचवण्यासाठी दोन-तीन गाड्यांनी करकचून ब्रेक लावले. हॉर्न वाजतोय, लोकं ओरडत आहेत, गाडीतली माणसं शिव्या घालतायत, तरीही ती आपली शांत, स्वत:तच रमत-गमत रस्ता क्रॉस करत माझ्या दिशेने येत्येय. अशाही गडबडीत एक रिक्षा तिला प्रदक्षिणा घालून पुढे गेलेली आणि तिला बघत बघत रिक्षावाला पचकन् थुंकला. दोन-पाच सेकंदांचा प्रसंग... आणि क्षणांपुरती उलथापालथ. ती ह्या बाजूला पोचली. पुन्हा सर्व पूर्ववत सुरू झालं. पण ते काही क्षण भीतीची एक रेघ माझ्या अंगात उमटवून

गेले. ती... केसांचं टोपलं, रंग मूळचा गोरा असावा, पण आत्ता त्यावर पुटं चढलेली दिसत आहेत. अनवाणी भेगा पडलेली पावलं – मला माझी ढम्पू आठवली. तिला ढम्पू म्हटलेलं आवडत नाही. मोठी झाल्ये ना आता, पण ढम्पू आठवली. दरमहा पार्लरमध्ये जाणारी. पेडेक्युअर, मॅनेक्युअर करणारी. नितळ पांढऱ्या-गुलाबी टाचांची! ही पण ढम्पूच्याच वयाची असेल. पायांच्या टाचेवरून माझी नजर वर गेली आणि मला धडधडायला लागलं. गुदमरायला झालं. तिच्या खमीसावरचे रक्ताचे ओलसर, सुकलेले डाग बघून प्रचंड भीती दाटून आली. तीन-चार टारगट पुरुषांनी – मुलांनी एकमेकांना टाळ्या दिल्या तिच्याकडे बघत. ते हसत होते. काहीतरी बोलत होते, गलिच्छ हावभाव करत होते आणि ती शांत होती. ओढणी बोटाला गुंडाळत, कधी केसांत खाजवत सहज चालत होती. मला लाज वाटू लागली, घाम फुटला. मी सरळ घर गाठलं, थरथरत्या पावलांनी. साधं लॅच उघडता येईना. पाणी, पाणी हवं होतं. पण....

मी पळपुटी ठरले.

कोचावर कोसळले. प्रचंड रडू येऊ लागलं. सगळे हसत होते, कुणालाही तिची कणव आली नाही. वाटलं की, सरळ दोन थोबाडीत माराव्यात त्यांच्या, पण मी काहीच केलं नाही. पळून आले.

अशीच पळून आले होते एकदा, शाळेत असताना. नुकतच नहाण आलेलं. आईने सगळं समजावून सांगितलं होतं. मी काळजी घेत होते. पण एकदा काही वेगळंचं घडलं. स्राव जास्त होत होता. शाळेत अभ्यासात लक्ष लागत नव्हतं. शाळेतल्या बाथरूममध्ये जाणं म्हणजे जिवावर येई. पण गेले आणि घाबरले. पेटिकोट खराब झाला होता. प्रचंड भीती दाटून आली. कुणी पाहिलं असेल का? काय करावं? घरी कसं जावं? मुलं-मुली हसतील. चिडवतील... रडून रडून डोळे सुजले. वर्गात जायला उशीर होत होता. बाई कविता शिकवत होत्या. खूप सुंदर. पण नाही – आणि मग पळाले तशीच. दप्तरही वर्गातच सोडून दिलं. शिपायाची नजर चुकवून घर गाठलं. पुढे किती तमाशा झाला मोठा. पण... पुन्हा दुसऱ्या दिवशी शाळेत जायची हिंमत होईना. भीती वाटू लागली. बाईंना समजलं. त्यांनी वर्गात सांगितलं असेल तर? संपूर्ण शाळा मला शोधत होती त्या दिवशी. आईने शाळेत फोन केला तेव्हा सगळं शांत झालं म्हणे...

तेव्हा पळून गेले होते आणि आत्ताही पळून आले.

कुठे गेली असेल ती? काय करत असेल? तिचा कुणी गैरफायदा घेतला तर? काय झालं असेल तिच्या आयुष्यात? कुणी तिला हाकललं?

ह्या पळपुटेपणाचा मला प्रचंड तिटकारा आला. एका स्त्रीची ही विटंबना बघून मी पळ काढला. स्त्री – एक कुमारिका, बहीण, बायको, आई... केवढं तिचं महात्म्य वर्णिलं जातं. तिला मोठं मानलं जातं. पण हे सर्व तात्पुरतं –

साहित्यापुरतं! स्त्रीची शत्रू स्त्रीच का असते? स्त्रीच मुलीला जन्म द्यायला का नकार देते? रस्त्यावरची अशी बेघर स्त्री आणि सुरक्षित चार भिंतीआडची स्त्री, ह्यांच्यात खरंच फरक आहे का?

अंधारून आलं आहे. दिवे लावायला हवेत. कंदील उजळायला हवा. रांगोळी? मुलं, हे – यायची वेळ झाली. कुणा एका अनोळख्या, परक्या मुलीसाठी मी उगीचच इथे घर अंधारात ठेवलं आहे.

अजून कुणी आलं नाही. ह्या घरच्यांना सणाचंही महत्त्व नाही. घर उजळलंय, दार सजलंय, पण ते घर रिकामंच आहे. ढम्पू आता खरंच मोठी दिसायला लागली आहे. साडी नेसली की किती गोड दिसते. हळूहळू तिच्या लग्नाचंही बघायला हवं. एकदा का लग्न झालं की, मी सुटले. माझ्या विचारांची झेप इतपतच. मुलीचं लग्न झालं की, आपण आपलं कर्तव्य पार पाडलं, ती सुखात राहील. ह्या चार भिंती ओलांडून दुसऱ्या चार भिंती! की ती इथेच सुखात आहे? त्या चार भिंती कशा असतील?

दिवाळीच्या निमित्ताने काही चांगले कार्यक्रम आहेत का टीव्हीवर? आजकाल प्रत्येक सिरिअलमध्ये जे-जे सण येतात ते-ते दाखवले जातात. सेलिब्रेट केले जातात. सिरिअलमध्ये कुठला सण दाखवत आहेत हे बघून पुढल्या काळात लोकांना समजेल की, होळी दाखवत आहेत का, म्हणजे होळी जवळ आली. पंचांग बघायलाच नको. सिरियल हेच पंचांग.'

सगळ्या तारका सजल्या आहेत अगदी. तशाही चोवीस तास त्या सजलेल्याच असतात! काय साड्या नि काय दागिने... आज आता त्यात अजून भर – कुठली सिरिअल आहे ही? कळेकळेपर्यंत जाहिराती सुरू झाल्या. नेमकं काही खायला घ्यावं तेव्हा टॉयलेट स्वच्छता मोहीम. सारखी ती हार्पिकची जाहिरात लागते. लागलीच... आणि... आता पाऊस पडू लागला. ते पावसाचं पाणी शोषून सॅनिटरी नॅपकिनचं फूल फुललं. हॅव अ हॅपी पिरेड! उड्या मारा, नाचा, खेळ खेळा... निळ्या रंगाच्याऐवजी वापरा की लाल रंगच. नाहीतरी लाजा सोडूनच दिल्या आहेत... ओता लाल पाणी...

लाल रंग...

ओलसर सुकलेला...

मी ताडकन उठले. चपलेत पाय सरकवला. दिवाळी असून दार ओढून घेतलं. तरातरा बाहेर पडले. केमिस्ट गाठला. हॅपी पिरेडसाठी व्हिस्परचं एक पाकीट विकत घेतलं. तडक चालत सुटले. वर्दळ कमी झाली होती. सिग्नलपाशी पोचायला पंधरा मिनिटं पुरली. फटाके कानाचे पडदे फाडत होते. मधूनच बाण सुटत होते. कुठे आकाश झगमगत होतं. मला कश्शाचंही भान नव्हतं. लहान लहान मुलं हातात छोटे छोटे कंदील घेऊन सिग्नलवर थांबणाऱ्या प्रत्येक

गाडीच्या काचेवर टकटक करत होती. फळांपासून, विमानापर्यंत प्रत्येक वस्तू सिग्नलवर विकली जात होती आणि ह्या सर्व गोंधळात माझी नजर तिला शोधत होती.

मी धावत होते, थांबत होते, ह्या फुटपाथवरून त्या फुटपाथवर, एखादी गल्ली... हा वेडेपणा होता माझा. मला ते कळतंही होतं. घरी सगळे पोचले असतील, काळजी करत असतील. पण मला तिला भेटायचं होतं. कसंही करून. वडापावच्या गाडीजवळ... फुलं विकणाऱ्या बाईजवळ. सरबतांच्या बाटल्यांमागे, पणत्यांच्या राशीमागे. एखाद्या दुकानाच्या फळीवर... गल्लीत... अंधारी गल्ली? थोडासा अंधूक उजेड असणारी... एखादी गल्ली. दोन इमारतींच्या मधल्या जागेत... शोध घेत्ये... दिसेल का ती?... शोध... वेड्यासारखा शोध. एक अस्वस्थ शोध. तिला कुणी काही... भीतीने शोध... कुणाला विचारू का? काय विचारणार? अशी... एक मुलगी... जिच्या खमिसावर मागे रक्ताचे... नाही नाही... कुठे शोधू?

हताश... हरले. हातातलं वर्तमानपत्रांत गुंडाळलेलं ते... आनंद देणारं... वर्तमानपत्र ओलं झालं होतं. हाताला येणाऱ्या घामाने. पाय जड झाले होते. परतायला हवं – परतले. वेडेपणा! मूर्ख! मला हसू आलं. ती जरी दिसली असती. मी तिला हे दिलं असतं. तरी तिला समजलं असतं का? हे कसं वापरायचं? का वापरायचं? छे! वेडी! मीच.

आणि अचानक ती समोर दिसली. तशीच चालत – स्वत:तच. ती त्या गल्लीत जात्ये. मला तिला अडवायचं आहे. पण काय हाक मारू? मी धावत्ये. तिला गाठलंच गल्लीत. ती लोखंडी सळयांवर बसली. गल्ली अंधारी होती. अंधूक उजेडाची. मी तिच्या जवळ गेले. फार नाही. पण गेले. तिने मान वर करून बघितलं. ती माझ्याकडंच बघत होती की माझ्या आरपार बघत होती?

'ये ले.'

'अं?'

'ले. खाने की चीज नहीं है।'

तिला शब्द समजले. ओलसर वर्तमानपत्र तिने बाजूला केलं... ती व्हिस्परचं प्लॅस्टिक उघडू लागली. 'रुक! मैं जाऊ – तो खोलना – और – और इस्तेमाल करना –'

तरीही तिने प्लॅस्टिक उघडलंच. आतून एक नॅपकिन काढला आणि तिचे डोळे... तिची ती नजर – अगदी केविलवाणी. पण त्या नजरेत दोन अश्रू तरळताना दिसले. अंधूक प्रकाशाने त्या डोळ्यांतल्या पाण्यात चमक ओतली होती. तिच्या चेहऱ्यावर हसू उमटलं.

मी माघारी आले. दिव्यांचा झगमगाट दिसत होता दुतर्फा. पण ह्या झगमगटापेक्षाही तेजस्वी दोन चमकदार अश्रू मला दिपवून टाकत होते. पूर्ण रस्ताभर!

‘वेताळा, खऱ्या भुतांपेक्षा ही माणसांनी निर्माण केलेल्या परिस्थितींची भुतं फारच भयावह आहेत.’

‘सत्य राजा.’

‘माणसांनी असं का करावं?’

‘अति झालं की गती संपते.’

‘म्हणजे?’

‘लहानपणी ऐकलेली म्हण आहे – ‘अति तेथे माती.’’

‘हा अतिरेक कशाचा?’

‘प्रत्येक गोष्टीचा. अगदी आपल्या मैत्रीचाही.’

‘नाही वेताळा. आपली मैत्री हा अतिरेक असणं हे कदापि शक्य नाही.’

‘असं कसं?’

‘सध्या राजवाड्यात काय चालू आहे?’

‘भय. गूढता. पिशाचाचं वास्तव्य.’

‘हेच. तूच उत्तर दिलंस.’

‘पण हे भय खोटं आहे. अवास्तव आहे. भय असायला हवं ते माणसांचं, त्यांच्या विकृतींचं.’

‘हं!’

‘पण दिलासा आहे वेताळा. आजही विकृतीपेक्षा कृती-संस्कृती जास्त आहे म्हणून माणूस जिवंत आहे.’

‘हं!’

‘आज राजवाड्यात आदेश निघेल. मृत आत्म्यांना भिण्यापेक्षा सजीव आत्म्यांना सांभाळा. दु:ख-क्लेष देऊ नका. भयापेक्षा अभय व्हा. मी निघालो. मला हे कार्य त्वरित करायचं आहे.’

‘राजा, थांब, मला माझ्या महाली कोण सोडणार?’

‘तुझा तू जाऊन लटक. मला चांगल्या विचारांच्या ज्योती प्रज्वलित करायच्या आहेत...’


४थी आवृत्ती

# अर्थाच्या शोधात

मूळ लेखक
व्हिक्टर फ्रॅन्कल

अनुवाद
विजया बापट

किंमत : १५०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.




दररोज, दर तासाला, दर मिनिटाला स्वतःच्या वागण्यासंबंधी निर्णय घेण्याची संधी समोर येत असते. तुमच्या अस्मितेचा नाश करणाऱ्या तुमचे मनोबल हिरावून घेऊ पाहणाऱ्या शक्तींना शरण जायचे की नाही हे पदोपदी ठरवावे लागते.


तुम्ही केवळ नियतीच्या हातातील खेळणे बनता की नाही हे तुमच्या निर्णयावर अवलंबून असते.

आपले मानसिक स्वातंत्र्य घालवून, आत्मसन्मान गमावून मेंढरासारखे मनानेही कैदी होता की नाही हे ठरविण्याचे तुमचे स्वातंत्र्य अबाधित असते.




# सांगावेसे वाटले, म्हणून

जीवन आनंदाने जगण्यासाठी आहे.
एकमेकांना सुख देण्यासाठी आहे.



लेखिका : शान्ता ज. शेळके

पृष्ठे १८० । किंमत १५० रु. । पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

शांता शेळके यांनी ललित लेखनाला खरे तर साठीनंतर आरंभ केला. तोही स्तंभ लेखनाच्या निमित्ताने. निरनिराळ्या वृत्तपत्रांत व नियतकालिकांत त्यांनी वेळोवेळी स्तंभलेखनाची जबाबदारी स्वीकारली आणि आपल्या तरल संवेदनक्षम गोष्टीवेल्हाळ स्वभाववृत्तीचे नाना रंग मिसळून त्या स्तंभलेखनालाही रमणीय रसात्मकतेत शिगोशिग बुडवून आकर्षक बनवले. शांताबाई कवी आहेत, गीतकार आहेत. विशिष्ट माध्यमांच्या गरजांचे भान ठेवून त्या लिहितात, परंतु केवळ पाट्या टाकण्याच्या वृत्तीने त्या त्या लेखनाकडे पाहत नाहीत. मागणी पुरवठ्याच्या व्यावसायिक मर्यादा सांभाळूनही स्वत:च्या सर्जनशील अंत:प्रेरणेशी त्या प्रामाणिक राहिल्या आणि त्या दोहोंचा सुरेख मेळ घालण्यात त्यांनी आपले कौशल्य प्रकट केले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू त्यांच्या ललितलेखनात सहजपणे आविष्कृत होत राहिले, आणि त्या व्यक्तिमत्त्वाची मोहिनी रसिक वाचकांना झपाटून टाकणारी ठरली. मराठमोळ्या ग्रामीण परंपरेत वाढलेल्या, लोकगीतांच्या आदिम सुरांनी भारलेल्या अशा अभिरुचीला साहित्याच्या सुजाण व्यासंगातून आलेले अभिजात पारदर्शक रूप त्यांच्या ललित लेखनात समोर येते, आणि ते आपल्या भावजीवनाशी जवळीक साधते.

'सांगावेसे वाटते म्हणून' या पुस्तकात २९ लेख आहेत. त्यात आलेल्या विषयांची विविधता साहजिकच लक्षवेधक आहे. 'मांजरे आणि मी', पोरकी पुस्तके, निरर्थक वाचन, आयुष्याचे उखाणे, एकान्त :नकोसा-हवासा, मोनालिसा भेटलेली, न भेटलेली, अशा काही शीर्षकांवरून विषयाचा बोध होता, तर 'होईल का असे जग, सावल्या, संवाद, संतुष्ट, सलगी देणे' वगैरे शीर्षकांवरून असा स्पष्ट बोध होत नसला तरी काहीतरी मानसशास्त्रीय अनुभवांची त्यात नोंद झालेली असणार अशी अपेक्षा निर्माण होते, एका परीने हे सर्व लेखन म्हणजे आपल्या अनुभवांच्या आधारे मानवी जीवनाबद्दल केलेले भाष्यच होय.

हे भाष्य करण्यामागे संवादाची, सहभागाची, शेअरिंगची भावना जास्त प्रबळ आहे. ''मनावरची ही सारी ओझी दूर लोटून सारी जळीजळमटे झटकून अगदी सहजसुंदर साधेपणाने आपणाला एकमेकांशी वागता येणार नाही का? माणसाचे माणूसपण एवढाच त्याच्या असण्याचा अर्थ आपण ध्यानात घेणार नाही का? बहिणाबाईंनी 'माणसा माणसा कधी होशील माणूस' हा जो प्रश्न विचारला आहे तो किती अर्थांनी आणि किती पातळ्यांवरून समजून घ्यायला हवा.'' असे 'सलगी देणे' या लेखात त्या अनेक उदाहरणांद्वारे पटवून देण्याचा प्रयत्न करतात.

जिथे मोठ्यांना मोठेपणाचा अहंकार असणार नाही व लहानांना लहानपणची ओशाळगत वाटणार नाही असे सामाजिक जीवन हे खरे आदर्श जीवन आहे. ''पण जोवर माणसे केवळ माणुसकीच्या नात्याने मोजली जात नाहीत, पैसा,

गुणवत्ता, प्रतिष्ठा, सत्ता कसली ना कसली वीट पायांखाली असल्याखेरीज त्यांना उंच माथा करून समाजात वावरता येत नाही तोवर कदाचित हे असेच चालणार असेल. गमतीची गोष्ट ही आहे की, की साध्या सुसंस्कृतपणाने वागायला फारसे काही लागत नाही. अगदी लहान लहान गोष्टीतही सुसंस्कृता दडलेली असते, याचाच मुळी अनेकांना पत्ता नसतो.''

''तुमच्या सहवासात आलेल्या कुठल्याही माणसाला अवघडल्यासारखे वाटता कामा ने तरच तुम्ही खरे सुसंस्कृत, अशी जवाहरलाल नेहरू यांनी जी व्याख्या केली आहे ती मला फार आवडली.''

आपली दोन व्यक्तिमत्त्वे असतात, दोन मने असतात. एक मन रसिक, कलाप्रेमी, बालकासारखे निर्भर आणि निरागस, तर दुसरे मन बऱ्यावाईट अनुभवांनी बिघडलेले, दूषित झालेले, पूर्वग्रहांनी पछाडलेले आणि आपल्या शहाणपणाचा नको तितका अभिमान बाळगणारे. असे मनाचे दोन प्रकार सांगून शांताबाई म्हणतात, ''श्रेष्ठ कलाकृतीचा आस्वाद घेताना हे दुसरे मन पहिल्या मनाला पछाडून टाकते आणि कलाकृतीचा निर्भेळ आनंद घेण्याची त्याची ताकदच हरपते.'' (जेथे जातो तेथे)

साध्या साध्या घटनेतही खोल व व्यापक आशय दडलेला असतो.

'लाखेचे मणी' मध्ये सोन्याच्या दागिन्यांना लाखेचे दागिने समजणाऱ्या एका शेजारणीबाबत शांताबाईंची आई जे उद्‌गार काढते ते देऊन, आईच्या म्हणण्यातील व्यापक आशय स्पष्ट केला आहे.

''जे आपल्या जवळ नाही ते दुसऱ्या कुणाजवळ आहे, त्याला ते सहजपणे मिळतंय हे अनेक लोकांना सहन होत नाही, त्यांना हेवा, मत्सर वाटायला लागतो आणि मग दुसऱ्याजवळ जे आहे त्यातील दोष, उणिवा दाखवून समाधान मिळवण्याचा प्रयत्न कोणी करतात. मनुष्य स्वभाव आहे हा. आपली दुखावलेली अहंता कुरवाळून घेण्याचा हा एक मार्ग असतो,'' आईने नोंदवलेले हे निरीक्षण शांताबाईंना मानसशास्त्रातील एक महत्त्वपूर्ण प्रमेय वाटते. त्यावरून आयुष्यातला एक बहुमोल धडा मिळाल्यासारखे त्यांना वाटते. आपल्याला सोने परवडत नसेल तेव्हा माणसे इतरांजवळच्या सोन्याला तुच्छतेने लाख म्हणून, आपली दुखावलेली अहंता कुरवाळून घेण्याचे समाधान मिळवतात. हा अनुभव सर्वच क्षेत्रात येतो.

आज मोठ्या पदी असणाऱ्या व्यक्तींचा एकेरी उल्लेख करणे किंवा त्यांच्या सुरुवातीच्या दैन्यावस्थेत व उमेदवारीच्या काळात त्यांना केलेल्या कमीजास्त मदतीबद्दल आढ्यतेने बोलणे हाही प्रकार याच स्वभाववृतीचा निदर्शक आहे. प्रत्येक लेखककवी व कलावंत एकेकाळी उमेदवारीच्या रांगेत उभा असतो. प्रसिद्धीसाठी धडपडत असतो आणि आपल्याला प्रसिद्धी वा संधी देऊ शकेल

अशा संपादक-प्रकाशक-समीक्षकांकडे तो आशाळभूतपणे बघत असतो. पुढे ते लेखक, कवि, कलावंत लोकप्रिय व मान्यताप्राप्त झाले म्हणजे त्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न अनेकजण करतात किंवा जे निखळ सोने म्हणून तावून सुलाखून निघाले आहे ते वस्तुत: सोने नसून सोन्याचा पत्रा चढवलेली लाख आहे असे दाखवण्याचा आटापिटा करतात. आदर आणि आपुलकी संपून हेवादावा व अवहेलना कुठे सुरू होते हे सांगणे अशावेळी अवघड ठरते, असे मार्मिक विवेचन त्या करतात.

''एकाकीपण हे जीवनातले अटळ सत्य तर आहेच, पण त्यापेक्षा माणसाची ती एक महत्त्वाची गरजही आहे... एके काळी मी एकटेपणाला भीत होते. आता मी त्या एकाकीपणात पुरेपूर रमू शकते.'' (पृष्ठ ४०)

''स्वार्थत्यागाचेही एक व्यसन होऊन बसते. कष्टाचीही एक सवयच जडते. कर्तव्यपालनाची देखील नशा चढते. ही माणसे इतरांसाठी धडपडता धडपडताच जगणार आणि तशीच ती मरणार.'' (पृष्ठ ४५)

''शनिमहात्म्यातील विक्रम राजाच्या मागे शनी लागल्याने भिंतीवरचा चित्रातला हंस खुंटीवरचा हार गिळून टाकतो आणि विक्रमावर चोरीचा आळ येतो - ही कथा प्रतीकात्मक आहे. आपल्या वाट्याला येणारी दु:खे किती अतर्क्य, अकारण आणि किती भीषण असू शकतात याचे इतके भेदक उदाहरण दुसरे मिळेल का?'' (८०)

''पिरॅमिडच्या फसव्या दारांसारखीच माणसांच्या मनांनाही फसवी दारे असतात. ही दारे इतरांना त्या त्या माणसांच्या अंतरंगात प्रवेश करू देत नाहीत. त्यामुळे आपले खरे व्यक्तित्व त्या माणसांना इतरांपासून लपवून ठेवता येते. आपल्या खाजगीपणावर, खोल भावनासंचितावर कुणी दरोडा घालू नये हाच या व्यक्तींचा हेतू असतो. जगासमोर आपली एक विशिष्ट साजरीगोजिरी, आकर्षक प्रतिमा उभी करून आपल्यामधले सूक्ष्म अंतर्विरोध, तर्कविसंगत वर्तन त्यामुळे जगापासून लपवता येते.'' (पृष्ठ ९२)

''कोवळ्या वयातले काही प्रसंग व अनुभव, घटना व्यक्ती आपल्याला झपाटून टाकतात. त्यांच्या गोड आठवणी जन्मभर आपल्यापाशी राहतात आणि पुढे प्रौढवयातही त्या मनात एक गोड, उदास हुरहुर जागी करतात. हा पूर्वस्मृतींचा नॉस्टॉल्जिया आपणा सर्वांच्या मनात असतो. तो सुदंरही असतो. फडके-खांडेकरांच्या, माडखोलकरांच्या कादंबऱ्यांनी, तरुण वयातल्या अनुभवांनी मला अनुपमेय आनंद दिलेला आहे. त्या आनंदाशी मी आजही कृतज्ञ आहे. पण अशी कृतज्ञता बाळगणे वेगळे आणि मनाने तिथेच थांबून राहणे वेगळं. पहिली गोष्ट निकोप, स्वाभाविक आहे तर दुसरी गोष्ट रोगट, विकृत आहे.'' (पृष्ठ १०४)

''आपल्याला वाटते की आपण स्वत:ला अगदी आतून बाहेरून ओळखतो.

पण वस्तुस्थिती अशी असते की आपल्याच स्वभावातले गहन कानेकोपरे, धोक्याच्या अंधाऱ्या जागा, चित्रविचित्र वाटा आणि वळणे आपल्याला माहीत नसतात. एखादी  कृती आपण करून जातो आणि मग आपणच का हे केले असा प्रश्न स्वत;ला विचारत राहतो. माणूस हा मुळातच फारसे तर्कशुद्ध वागणारा प्राणी नाही. त्याच्या व्यक्तित्वात अनेक विसंगती असतात.'' (पृष्ठ १०६)

''चांगली मैत्री म्हणजे चांगली सोबत. चांगला सहवास. मानसिक आणि भावनिक संवाद साधण्याचे एक चांगले स्थळ. चांगली सोबत हे आपल्या व्यक्तिमत्त्वाचे एक एक्स्टेंशन, एक वाढलेले रूप आहे. आपल्यामधल्या अनेक उणिवा तिथे परिपूर्ण झालेल्या असतात. आपली अपुरी राहिलेली स्वप्ने त्या ठिकाणी साकार झालेली दिसतात.'' (पृष्ठ ११५)

''आपले दीर्घकालीन स्नेहसंबंध वेगळे. ते मित्र, त्या मैत्रिणी आपल्या आयुष्याचाच भाग बनतात. पण जीवनाच्या अनेक वळणांवर अनपेक्षितपणे भेटणारे, अगदी अल्पावधीत उमलून मिटणारे पण तेवढ्या वेळातही फुलून दरवळणारे हे छोटे छोटे स्नेह – – यांनीही कळत नकळत आपल्याला किती समृद्ध केलेले असते!'' (पृष्ठ १५२)

''असत्य हे देखील एका वेगळ्या पातळीवर फार उत्कटपणे सत्यच असते. खरे बोलण्यापेक्षा खोटे बोलणे जास्त अवघड आहे. खरे बोलणे म्हणजे काय? तर घडले तसे सांगायचे. पण खोटे बोलण्यात साहसी वृत्ती, बेदरकारपणा, सर्जनशील, प्रतिमा अशा अनेक शक्ती कसाला लागतात. खोटे बोलणे, विशेषत: ज्यात काही व्यक्तिगत लाभाची अपेक्षा नाही, असे खोटे बोलणे हे भित्रेपणाचे नव्हे तर शौर्याचे लक्षण आहे. एकाचे असत्य हे दुसऱ्याचे निर्भेळ सत्य असू शकते.'' (पृष्ठ १३९)

''आईवडिलांनी मुलांना देता येईल ते द्यावे, वाटल्यास देऊही नये. पण स्वतंत्रपणे आपल्या मर्जीनुसार आपल्या जीवनाला बरावाईट आकार देण्याचा त्यांचा अधिकार मात्र त्यांनी कधीही हिरावून घेऊ नये. ही एक प्रकारची भावनिक पिळवणूकच आहे. अतिशय धूर्तपणे, वरकरणी प्रेमाचा आव आणून कित्येक आईबाप आपली अपुरी राहिलेली स्वप्ने, आशाआकांक्षा मुलांवर लादताना दिसतात. मोठ्या झाडांच्या सावलीत लहान झुडूप खुरडून जाते तसे या बिचाऱ्या मुलामुलींचे आयुष्य नासून, बेचव होऊन जाते.'' (पृष्ठ १२१)

अशा अनेक गोष्टी शांताबाईंना आपल्या स्वत:च्या अनुभवांमुळे, वाचनामुळे, परिचितांच्या वागण्यामुळे जाणवल्या. त्या आपल्या वाचकमित्रांना सांगण्याची ऊर्मी अनावर झाली. मानवी स्वभाववृत्तीतील गुंतागुंत, माणसांचे परस्परांशी असणारे संबंध याबद्दल हे जे काही त्यांच्या लक्षात आले, ते सांगून आपल्या भावविश्वात इतरांनाही सामावून घ्यावेसे त्यांना वाटले. एक प्रकारे हे

मानसशास्त्रातील बारकावेच त्यांनी टिपले आहेत. त्यामुळे हे लेख वाचताना त्यांची कळकळही जाणवते. हे आयुष्य सर्वांनी आनंदाने, सुखाने, एकमेकांना आदर आपुलकी देत, समृद्ध करावे असे त्यांना वाटते. त्यातील अनावश्यक ताणतणाव टाळावेत असे त्यांना वाटते. सुखी जीवनाची काही सूत्रे विशद करणारे हे आशावादी प्रेरणादायक लेखन आहे.

– शंकर सारडा


(पूर्वप्रसिद्धी - मेहता मराठी ग्रंथजगत, फेब्रुवारी २०००)


७वी आवृत्ती

# चकाट्या

लेखक
द. मा. मिरासदार

किंमत : १५०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.





शिवाजीमहाराजांच्या हस्ताक्षराने मास्तर व बाबांकडून खिंडीत सापडलेला मोरेश्वर... जगबुडीचा प्रलय आला; पण तो गावापर्यंत पोहचलाच नाही... भुतालाही न घाबरणारे बाबा उंदराला घाबरतात तेव्हा... दगडू व बाबूचा फोटो तर काढला, पण त्यांची छबी त्यात उमटलीच नाही... 'स्वभाव' तो कोणाचाही असो, मग तो शेजारणीचा असेल तर... जागेवर न जाता केला जाणारा पोलीस-तपास... घराला रंग दिला; पण तो पेंटर नव्हे?... शेतातून नवा रस्ता जाऊ नये म्हणून एकनाथला करावी लागलेली तडजोड... ढग कसे तयार होतात?... ग्रहण म्हणजे काय?... या सोप्या प्रश्नांची उत्तरं 'बाबांच्या अभ्यास' मध्ये मिळतात. अशा गावगप्पांमधून तयार झालेला 'गावरान मेवा' द.मा. मिरासदारांनी आपल्या खास विनोदीशैलीतून 'चकाट्या' मध्ये मांडला आहे.




# पंढरपूर नाट्यसंमेलन अध्यक्षीय मुक्त चिंतन - अरुण काकडे

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने ९४ व्या नाट्यसंमेलनाध्यक्षपदी माझी एकमताने निवड केली. त्याबद्दल परिषदेच्या विषय नियामक मंडळाचा मी आभारी आहे. तसेच डॉ. ताराबाई भवाळकर, कीर्ती शिलेदार, मदन गडकरी तसेच सांगली, पुणे व नागपूर येथील नाट्यपरिषदेच्या पदाधिकाऱ्यांचेही आभार मानतो.

ही निवड झाल्यानंतर महाराष्ट्रातून व जगभरातून आलेल्या रसिकांच्या प्रतिक्रियांमुळे मी भारावून गेलो आहे. माझ्याकडून रसिकांनी खूप अपेक्षा बाळगल्या आहेत. तसे त्यांनी बोलूनही दाखविले आहे. तसे पाहिले तर नाट्यसंमेलनाध्यक्षाला काहीच अधिकार नसतात. तरीही रसिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न मी अध्यक्षीय कालावधीत करणार आहे.



प्रथमच महत्त्वाचा प्रश्न समोर मांडतो. सहा वर्षांपूर्वी १४ जून २००७ रोजी भर पावसात नाट्य परिषदेच्या विरुद्ध यशवंत नाट्यसंकुलात प्रायोगिक व बालरंगभूमीला जागा मिळावी, यासाठी आम्ही लढा दिला होता. त्यावेळचे आमचे नेते विजय तेंडुलकर व दामू केंकरे आज हयात नाहीत; पण आमचा लढा थांबलेला नाही. या लढ्यातील मी एक महत्त्वाचा साथीदार. असे असूनही परिषदेच्या मध्यवर्ती शाखेने अध्यक्षपदासाठी माझे नाव सुचविले याबद्दल मी

धन्यवाद देतो.

रसिकहो, मराठी रंगभूमीवर निरनिराळ्या स्तरांतून सृजनकार्य घडते आहे. त्याची आजची स्थिती काय आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रात जेवढे सृजनकार्य होत आहे, तेवढे इतरत्र दिसत नाही. बालरंगभूमी, हौशी, प्रायोगिक, व्यावसायिक सर्व स्तरांवर नाट्यनिर्मिती व प्रयोग होतात. मी या सर्व स्तरांवर कार्य करणाऱ्यांना भेटून आजची स्थिती, त्यांचे विचार, त्यांच्या अडचणी, मागण्या, तक्रारी जाणून घेण्याचा प्रयत्न केला व ह्या इथे मांडणार आहे.

शासनाने शालेय रंगभूमीचा विचार करून नाट्यकलेचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करावा. यासाठी तज्ज्ञांकडून अभ्यासक्रम ठरवावा लागेल. महापालिकेच्या व खासगी शाळांतून हा विषय शिकविला गेला पाहिजे अशी योजना तयार करावी. नाट्यकलेचा शालेय अभ्यासक्रमात समावेश झाल्यावर या बालनाट्य स्पर्धा व शालेय नाट्यस्पर्धा दर्जेदार स्वरूपात पहायला मिळतील असे मला वाटते.

## तरुणाई रंगभूमी

तरुणाई रंगभूमीला आपण महाविद्यालयीन स्पर्धांमधूनच अनुभवतो. रंगभूमीच्या प्रगतीच्या दृष्टीने या महाविद्यालयीन नाट्यस्पर्धा मोलाच्या आहेत. 'कल्पना एक - आविष्कार अनेक' सारख्या स्पर्धांतून लेखक-दिग्दर्शकांची कसोटी लागते. अशा लेखकांना उत्तेजन देणे गरजेचे आहे. व्यावसायिक व प्रायोगिक रंगभूमींनी अशा उमलत्या लेखकांच्या शोधात असायला हवे. नाट्य परिषदेच्याही सर्व शाखांवर एकांकिका स्पर्धेचे आयोजन होत आहे. त्याचबरोबर नाट्यलेखन स्पर्धाही आयोजित करून सर्वोत्कृष्ट नाट्यलेखकाला बक्षीसही दिले जाते.

## हौशी रंगभूमी

महाराष्ट्र राज्य हौशी राज्य नाट्यस्पर्धेच्या निमित्ताने दर वर्षी नाट्यनिर्मिती होते ती बहुतांश बँक, महापालिका किंवा इतर निरनिराळ्या कार्यालयातील कलाविभागांकडून. हल्ली हौशी नाट्यसंस्थांची संख्या वाढली आहे. शासनाची ही हौशी नाट्यस्पर्धा आता साठ वर्षांची होईल. सुरुवातीच्या काळातील स्पर्धेतून रंगभूमीला अनेक नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते, तंत्रज्ञ लाभले. त्या वेळच्या स्पर्धेतील प्रयोगांना प्रेक्षकांची तुडुंब गर्दी होत असे. आता काय चित्र दिसते? स्पर्धेसाठी शेकडोंनी प्रवेश अर्ज येतात. कुठलेही नाटक स्पर्धेमध्ये सादर होते. त्याचा दर्जा पाहिला जातो का? स्पर्धेच्या प्रयोगाला प्रेक्षक असतो का? तेव्हा सरकारने पहिल्याप्रमाणे नवीन नाटकाची अट घालावी म्हणजे नवीन संहिता लिहिल्या जातील.

## प्रायोगिक रंगभूमी

आपण पाहाल, प्रायोगिक नाटकाची व्याख्या कुणीच केलेली नाही. नाट्य परिनिरीक्षण मंडळ प्रायोगिक नाटकांना प्रमाणपत्र देते, ते कोणत्या आधारावर? नाटककाराने माझे नाटक प्रायोगिक असे अर्जात नमूद केले आहे म्हणून? कालचे प्रायोगिक नाटक म्हणजे व्यवसायिक नाटक होते.

प्रायोगिक नाटकाची व्याख्या करता येत नाही; कारण ती व्यक्तिसापेक्ष आहे, असे मला वाटते. पण लक्षणं आपण सांगू शकतो. तिच्या कार्यप्रणालीबद्दल आपण बोलू शकतो.

माझी कल्पना मांडतो.

आज आपण पाहतो की कोणत्याही क्षेत्राचा विकास व्हायचा असेल तर अशा क्षेत्रासाठी औद्योगिक किंवा कोणत्याही व्यवसायात एक स्वतंत्र विभाग असतो. याचे नाव आर अँड डी - रिसर्च अँड डेव्हलपमेंट व त्यासाठी आवश्यक त्या पैशाची तरतूद केली जाते. म्हणूनच रंगभूमी या कलामाध्यमाचा विकास करावयाचा असेल, तर 'आर अँड डी'ची कास धरली पाहिजे. प्रायोगिक रंगभूमीचे हेच कार्य आहे. त्यासाठी माझी चतु:सूत्री आहे - संशोधन, प्रयोगशीलता, प्रशिक्षण व नाट्यानुभव ही रंगभूमीच्या कार्याची व्याप्ती.

संशोधनातून प्रगती
प्रयोगशीलतेतून चहुअंगांनी सर्व घटकांचा विकास
प्रशिक्षणाने आत्मभान
नाट्यानुभवातून प्रगल्भता

प्रायोगिक नाटकांचे प्रयोग करण्यासाठी आम्हाला सर्व सोयींनी युक्त २५० आसनापर्यंतची छोटी नाट्यगृहे हवी आहेत. आमचा लढा त्याचसाठी आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक धोरणात जिल्हापातळीवर अशी छोटी नाट्यगृहे बांधण्याचा प्रस्ताव आहे. अजून तो कागदावरच आहे. तो लगेच कार्यान्वित करावा आणि पहिले नाट्यगृह महाराष्ट्राच्या राजधानीत मुंबईत मध्यवर्ती ठिकाणी उभारावे.

## कामगार रंगभूमी

गिरणगाव जसे उद्ध्वस्त होऊ लागले, तसे गिरणी मालकांनी गिरण्या बंद करून मॉल उभे केले. त्यामुळे गिरणी कामगार गिरणगावातून हद्दपार झाले. सशक्त कामगार रंगभूमीची ऊर्जा संपत आली.

## लोक रंगभूमी

काही वर्षांपूर्वी संगीत नाटक अकादमी, नवी दिल्ली या संस्थेने एक योजना यशस्वीरीत्या राबवली होती. Use of folk form in modern plays. शासनाने

अशा पद्धतीने स्पर्धा किंवा महोत्सव सुरू केल्यास लोककला नव्या स्वरूपात पाहता येतील.

## संगीत रंगभूमी

पारंपरिक संगीत नाटकांची मधूनमधून पुनर्निर्मिती होत आहे. त्यांचे प्रयोगही प्रेक्षकांना आवडत आहेत. पण यापलीकडे नवीन संगीत नाटक रंगभूमीवर येत नाही. विद्याधर गोखले यांनी संगीत नाटकाच्या संहिता लिहून त्या काळापुरती आशादायक परिस्थिती निर्माण केली होती. आज अशा संहिता लिहिल्या जात नाहीत. संगीत नाटकांची निर्मिती करायची तर धीर हवा; त्यासाठी पाठपुरावा करायला हवा. असे संगीतकार पुढे यायला हवेत.

## बोधी नाट्य परिषद

बोधी कला संगिती... बोधी नाट्य परिषदेचे संस्थापक प्रेमानंद गज्वी यांची मते जाणून घेतली. ते म्हणतात ही Theatre of knowledge - ज्ञानाची रंगभूमी आहे. त्यासाठी स्वतंत्रपणे नाट्यलेखन कार्यशाळा आयोजित होतात. मला असं वाटतं, बोधी कला संगीताने मूळ धारेत यावे. म्हणजे सगळ्याच प्रेक्षकांना एक नवीन विचार करणारे नाटक पाहण्याचा योग येईल. तसं विद्रोही रंगमंच - विद्रोही नाटकही मूळ धारेत येऊ द्या. तुमच्या व्यथा, आकांक्षा, राग, लोभ प्रेक्षकांना कळू द्या. मला असे वाटते की मनातला हा विद्रोह नाट्यरूपात बाहेर पडला तर मन शांत होऊ शकेल. विद्रोहाची धार बोथटही होऊ शकेल.

## व्यावसायिक रंगभूमी

आता व्यावसायिक रंगभूमी कुणाला म्हणावे याची सरकारी व्याख्या आहे तीच आपण गृहीत धरू. व्यावसायिक नाट्यसंस्था याचा अर्थ 'नाट्यनिर्मिती करणे, त्याचे व्यावसायिक प्रयोग करणे व पूर्ण वेळ व्यवसाय आहे अशी संस्था.'

व्यावसायिक रंगभूमीवर सहकारपर्व सुरू झाले आहे. अनेक निर्माते एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर नाट्यनिर्मिती करताहेत. यात सहकारमहर्षी कोण असेल ते येणारा काळ ठरवेल. आज मराठी रंगभूमीवर एकाचवेळी पन्नासहून अधिक नाटकांचे प्रयोग सुरू आहेत. ही माझ्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे. एवढे सृजनकार्य आज महाराष्ट्रात चालले आहे. पण अनुदानासाठी सहा महसूल विभागात प्रयोग करावे लागतात. तिथल्या नाट्यगृहांच्या अवस्थेबद्दल खूप नाराजी आहे. ही नाट्यगृहे महापालिकेची, शासनाची व इतर संस्थांची आहेत. महाराष्ट्रात साठ नाट्यगृहे जेमतेम बऱ्या अवस्थेत आहेत, असा प्रशांत दामलेंचा अनुभव आहे.

दुसरी सूचना - दौऱ्यावर असताना हॉटेलचा खर्च फार असतो. नाटकाच्या प्रयोगाचे दिवशी विश्रामगृहे मोकळी असतील तर ती उपलब्ध करून द्यावी.

आणखी एक सूचना - सर्व परवाने मिळविण्यासाठी 'एक खिडकी योजना' शासनाने तयार करावी. म्हणजे हे सर्व परवाने मिळविताना निरनिराळ्या सरकारी खात्यांत चकरा माराव्या लागणार नाहीत. नाट्य परिषदेने व नाट्यनिर्माता संघाने याचा पाठपुरावा करावा.

## रंगमंच कामगार संघटना

रंगमंच कामगार संघटनेच्या काही फार महत्त्वाच्या मागण्या आहेत. त्यांचा विचार करू.

रंगमंच कामगाराला काम करताना मोठे अपघात होतात. तातडीने उपचार करावे लागतात. त्यासाठी परिषदेने एक ठराव मंजूर करावा व अशा रंगमंच कामगाराला म्युनिसिपालिटीच्या हॉस्पिटलमध्ये तातडीने मोफत उपचार करून घेण्याची सुविधा असावी.

## प्रेक्षक

पूर्वी प्रेक्षक संस्थेचे नाव पाहून नाटक बघायला यायचा. आज सेलिब्रिटी कलाकारांची नावे पाहून येतो. अजून एक प्रेक्षकांची मानसिकता म्हणजे सर्व समीक्षकांनी स्तुतिसुमने वाहिलेल्या नाटकाच्या प्रयोगाला विचार न करता येतो. समीक्षकाने थोडेसे अप्रिय लिहिले की प्रेक्षक त्या नाटकाचा विचारही करत नाही. तोंडातोंडी झालेली प्रसिद्धी प्रेक्षक मान्य करतो व प्रयोग पाहतो.

## नाटककार

ग्रामीण भागातील तरुणांना नाट्यलेखनासाठी प्रवृत्त करावे लागेल. मार्गदर्शनही करावे लागेल. त्यासाठी आमचा प्रयत्न चालू आहे. अशा तरुणांचा शोध घेऊन नाट्यलेखन कार्यशाळा आम्ही घेणार आहोतच. अशा प्रयत्नातून नाटककार हा महत्त्वाचा घटक भावी रंगभूमीला मिळणार आहे.

## अभिनेता

आजच्या व्यावसायिक आणि प्रायोगिक रंगभूमीवरील बहुतांश अभिनेते आणि अभिनेत्री यांची मानसिकता पाहिली की धसका बसतो. सतरा डगरींवर पाय ठेवणारे हे अभिनेते आहेत. अशांच्या बाबतीत मी म्हणेन, एखाद्या डगरीवरून घसरलात तर कपाळमोक्ष होईल. यातल्या काहींना असे वाटते की आपणाशिवाय नाट्यप्रयोग होऊच शकणार नाही. असा विचार करणाऱ्या अभिनेत्यांना मी विचारतो की, बाबांनो, तुमचे प्रेम कुणावर आहे? रंगभूमीवर, नाट्यसंस्थेवर की स्वत:वर? असे आढळून येईल की हे असे अभिनेते स्वत:शिवाय दुसरा कुठलाच विचारच करत नाहीत. असे अभिनेते आणि अभिनेत्री रंगभूमीचा उपयोग करून घेतात. नाट्यसंस्थेला स्टेपिंग स्टोन म्हणून वापरतात. निष्ठा, बांधिलकी हे शब्द अशा कलाकारांना शून्य किमतीचे. अशा कलाकारांना घेऊन नाटक करायचे म्हणजे भिंतीवर डोके आपटून घेण्यासारखे आहे.

## शासकीय अनुदाने

आता महत्त्वाच्या विषयाकडे वळतो. महाराष्ट्र शासनातर्फे नाट्यसंस्थांना निरनिराळ्या कारणांसाठी अनुदान दिले जाते. आज आमचे म्हणणे मान्य झाले आहे आणि प्रायोगिक नाट्यसंस्थांच्या प्रयोगांना अनुदान देण्याचा अध्यादेश निघाला आहे. पण त्यात बऱ्याच त्रुटी आहेत आणि तो बदलून घेणे आवश्यक आहे. आज राष्ट्रीय पातळीवर दोन अंकी नाटकांपेक्षा सलग दीड ते पावणेदोन तासांची नाटके सादर होतात. हा न्याय प्रायोगिक नाटकाला लावावा.

शासनाची अजून एक चांगला योजना जाहीर झाली आहे.
मराठीतील जुन्या उत्कृष्ट व अभिजात नाटकांची निर्मिती करून अशा नाटकांचे चित्रीकरण करून ते एक सांस्कृतिक ठेवा म्हणून जतन करणे.

## राष्ट्रीय स्तरावर मराठी रंगभूमी

राजधानीत महाराष्ट्रातील ५० हून अधिक लोकप्रतिनिधी आहेत. यातील किती लोकप्रतिनिधींना मराठी कलेचे, नाटकाचे, दिल्लीत होणाऱ्या मराठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे महत्त्व कळते? मी २६ वेळा ३६ नाटकांचे प्रयोग दिल्लीत करून मराठी रंगभूमीचा झेंडा भारताच्या राजधानीत फडकवत ठेवण्याचा प्रयत्न केला. दिल्लीत मराठी नाटकांचे प्रयोग याच निमित्ताने होतात. भारतरंगमहोत्सव आणि ईर्ऊं अशा संस्थाही राष्ट्रीय पातळीवर महोत्सवाचे आयोजन करतात. त्यात मराठी नाटकाची निवड होते का? ही निवड केवळ तुम्ही पाठविलेल्या चित्रफिती पाहून करतात. सुरुवातीला मी यावर आक्षेप घेतला होता. प्रयोग पाहून निवड करा. त्यासाठी प्रत्येक राज्यात निवड समितीची स्थापना करा. पण तसे होताना दिसत नाही. दिल्लीत बोलबाला आहे ईशान्येकडील आणि दक्षिणेकडील नाटकांचा. कारण या नाटकात दृश्यात्मकतेला जास्त महत्त्व दिले जाते. संहिता काही पानांचीच असते. पण त्याचे दृश्यरूप तुम्हाला खिळवून ठेवते. मराठी नाटकात शब्दाला महत्त्व, पण हल्लीची नाटके दोन्हींचा चांगला समन्वय साधून सादर होतात; पण तरीही दिल्लीपर्यंत पोचत नाहीत.


साहित्य संमेलनाध्यक्षांना वर्षभर अभ्यास दौऱ्यासाठी काही रक्कम दिली जाते.

सुरुवातीला मी परिवर्तनाच्या नांदीबद्दल बोललो. आता भरतवाक्य म्हणतो,

रंगभमीवरून आपण जेव्हा सृजनप्रवासाला निघतो तेव्हा आपण आत्मशोधाच्या प्रवासाला निघतो. अंगभूत प्रेरणांतून आपल्याला प्रेक्षकांना काही दाखवायचे आहे, सांगायचं आहे. त्यांच्याशी रंगसंवाद साधायचा आहे. आपल्यातल्या ऊर्मींना आविष्कृत करायचे आहे आणि अशा आविष्कारातून प्रेक्षकांना अंतर्मुख करावयाचे आहे. आपला हा आत्मशोध शेवटच्या श्वासापर्यंत चालू असतो. माझ्याबाबतीत असेच घडणार आहे.




## प्रसंग एक, दृष्टिकोन अनेक - घटना एक, अर्थ अनेक




हा अनुभव बऱ्याच जणांना बऱ्याच वेळेला आला असेल. एकाचा बाणेदारपणा दुसऱ्याला उद्धटपणा वाटतो, आपुलकी दया वाटते, दयेत प्रेमाचा भास होतो, आणिक कितीतरी. हाच अनुभव मोठ्या, प्रसिद्ध लोकांच्या बाबतीत, त्यांच्या प्रकाशित साहित्यकृतीतून येतो तेव्हा विशेष वाटते.

मी मला आलेल्या तशा एका अनुभवाविषयी सांगणार आहे.

आपल्या असाध्य अशा शारीरिक व्याधींवर आणि त्यांचा परिणाम म्हणून लादल्या गेलेल्या परावलंबत्त्वावर मानसिक ताकदीने मात करून, स्वत: व्हीलचेअरवर बसून अनेक क्रांतिकारक वैज्ञानिक शोधांनी जग हालवून सोडणारा जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ म्हणून स्टीफन हॉकिंग मला माहित होता, पण त्याची जवळून ओळख झाली ती जेन हॉकिंग हिने लिहिलेली Travelling to Infinity : My Life

with Stephen ही त्या दोघांच्या पंचवीस वर्षांच्या वैवाहिक जीवनाची असाधारण अशी कहाणी वाचताना आणि त्या पुस्तकाचे मराठीत भाषांतर करताना, आपण ज्याच्या प्रेमात पडलो आहोत तो तरुण अशा एका अनोळखी रोगाने ग्रासलेला आहे की ज्याचे निदान अनिश्चित पण परिणाम निश्चित माहित आहे, त्याचे आयुष्य कदाचित हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच वर्षे उरले आहे याची पूर्ण कल्पना असताना त्याच्यावरील प्रेमापोटी त्याच्याशीच लग्न करण्याचा निर्णय घेणारी, कोवळ्या वयाची, पण खंबीर मनाची जेन लग्नानंतर एका हाती संसाराचा गाडा आणि दुसऱ्या हाताने आपल्या विकलांग पतीची व्हीलचेअर ढकलत चार मुलांचे - तीन पोटची पोरं आणि चौथा -'मोटर न्युरॉन' या भयंकर रोगाने ज्याच्या शरीराचा ताबा घेऊन ते पोखरायला सुरवात केली आहे, जो रोजच्या शरीरधर्मासाठीसुद्धा आपल्यावर अवलंबून आहे असा, मुलाहूनही मूल असणारा अपंग नवरा यांचे निगुतीने, उत्तम संगोपन करणारी, 'विज्ञान' या आपल्या सवतीचा मत्सर न करता तिला संसारात सामावून घेऊन, तिच्यात रस घेऊन, वेळप्रसंगी स्वतःच्या मनाला मुरड घालून घरात सुख नांदवण्याची पराकाष्ठा करणारी, नवऱ्याची असामान्य क्षमता ओळखून, तिला खतपाणी घालून, त्याच्या कर्तृत्वाला झळाळी आणण्यासाठी झटणारी अशी जेन आणि तिच्या मनात प्रथम प्रीतीची कोमल भावना उमलल्यापासून घटस्फोटाच्या कठोर शिक्षेने ती कुस्करून जाईपर्यंतची हृदय हेलावून टाकणारी कथा यांनी मी पार भारावून गेलो होतो.

ते भारावलेपण ओसरल्यावर अलिप्तपणे विचार करताना माझ्या मनात असा प्रश्न उभा राहिला की या चित्तथरारक कथेची ही एक बाजू असेल, या जीवननाट्यातील एका कलाकाराचे हे स्वगत असेल, पण त्यातील दुसऱ्या पात्राचाही काही निराळा, कदाचित विरुद्ध दृष्टिकोन असेल का? या सर्व घटनांना दुसरा पदर असेल का?

जेन हॉकिंगचे पुस्तक प्रसिद्ध झाले त्यावेळी इंग्लंडमध्ये स्टीफन हॉकिंगच्या चाहत्यांनी जेनविरुद्ध टीकेचे वादळ उठवले होते. स्टीफन हॉकिंगसारख्या महान शास्त्रज्ञाची प्रतिमा डागाळल्याबद्दल तिचा तीव्र शब्दात निषेध केला होता. जेनचे पुस्तक २००७ साली प्रकाशित झाले. त्या नंतर सहा वर्षांनी, म्हणजे यंदाच स्टीफन हॉकिंग याने लिहिलेले त्याचे ' My Brief History' नव्हे) हे अगदी छोटेसे, 'थोडक्यात' लिहिलेले आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. ते वाचताना माझ्या प्रश्नाचे मला उत्तर सापडले. त्याच घटना - जेन आणि स्टीफन या पती पत्नींच्या भिन्न दृष्टिकोनातून वाचायला मिळाल्या.

जेनच्या कथनात स्टीफन या सूर्याभोवती तिची ग्रहदशा फिरते. तरीही तिने त्या दोघांचे आणि त्यांच्या तीन अपत्यांचे कौटुंबिक जग, स्टीफनचे अचाट आणि अफाट विज्ञानजगत, त्याचे क्रांतिकारी शोध, त्याला मिळालेले सर्वोच्च मान सन्मान आणि जेनच्या स्वतःच्या कर्तृत्वाचे जग (तिने भाषा विषयात डॉक्टरेट

मिळवली आहे) या सर्वांचा विस्तृत आढावा घेतलेला आहे. स्टीफनने त्याच्या बालपणाच्या, विवाहापर्यंतच्या कालखंडासाठी पुस्तकाचा पाव हिस्सा वापरला आहे. त्याच्या 'तीन' पत्नींपैकी पहिलीला, म्हणजे आधी प्रेयसी आणि नंतर पत्नीपद भूषवलेल्या जेनला जवळ जवळ अनुल्लेखाने टाळले आहे, त्या मानाने दुसरीचे, एलन मॅसन या नर्सचे भरघोस कौतुक केले आहे (स्टीफनने तिच्यापासूनही घटस्फोट घेतलेला आहे) आणि पुस्तकाची सर्वात जास्त पाने त्याच्या तिसऱ्या 'आवडत्या पत्नी'च्या, जेनच्या 'विज्ञान' नावाच्या सवतीसंबंधी सांगण्यात खर्च केली आहेत. जेनचे पुस्तक खूपच मोठे आहे - जवळ जवळ पाचशे पानांचे आहे, स्टीफनचे फक्त सव्वाशे पानांचे आहे. हे प्रमाण लक्षात घेतले तरीसुद्धा काही घटना आणि त्यांना दिलेले महत्त्व, त्याकडे पाहण्याचे दोघांचे दृष्टिकोन, त्यांच्या लेखी त्या घटनांचे अर्थ यातील फरक लक्षणीय आहे.

स्टीफनचे प्रथम दर्शन, वाढत्या भेटीतून वाढत जाणारे प्रेम, विवाहाचा कठीण निर्णय, अनेक सुखदु:खाचे भावपूर्ण प्रसंग आणि त्या सगळ्याची विवाहातील परिणती - या कालखंडाचे वर्णन जेनने पुस्तकाच्या सात प्रकरणात, सुमारे सत्तर पानात केले आहे. स्टीफन जेनबरोबरचे विवाहपूर्व प्रेम, त्यांच्या भेटीगाठी याविषयी एक अक्षरही लिहित नाही. जेन ही त्याची प्रेयसी होती, त्यांचा प्रेमविवाह होता हेही तो सांगत नाही. आपल्याला असाध्य रोगाने पछाडलेले आहे हे त्याला स्पष्टपणे कळून चुकल्यावर त्याची जी मन:स्थिती झाली तिचे वर्णन करताना तो जेनचा सर्वप्रथम उल्लेख करतो, तो असा : 'माझ्या जीवनावर काळे ढग जमले होते. तरीही मी ते जगत होतो, त्याचा आस्वाद घेत होतो. याचे सर्वात प्रमुख कारण म्हणजे मला मोटर न्युरॉन डिसीझ झाला आहे हे निदान निश्चित झाले त्या काळात मला भेटलेल्या जेन वाइल्ड नावाच्या एका मुलीशी माझा वाङनिश्चय झाला होता. तिच्याशी विवाह करायचा, संसारी बनायचे म्हणजे मला अर्थप्राप्तीसाठी काहीतरी काम करणे भाग होते.' - बास, एवढाच!

या विवाहपूर्व काळातील दोघांच्या एका भेटीचा प्रसंग मात्र दोघांच्याही कथनात आला आहे. त्या काळातील त्यांची जवळ जवळ प्रत्येक भेट जेनने वर्णन केलेली असल्याने हीही भेट तिने वर्णिलेली आहे त्याबद्दल काहीच आश्चर्य वाटत नाही, पण स्टीफनच्या इतक्या संक्षिप्त कहाणीतही त्या विशिष्ट भेटीचा समावेश व्हावा एवढे त्याचे का आणि काय महत्त्व आहे ते कळत नाही.

स्टीफन केंब्रिजमध्ये राहत होता आणि जेन लंडनमध्ये. पैसे मिळविण्याचे एक साधन म्हणून स्टीफनला गॉनव्हिल ॲन्ड कैस या कॉलेजच्या रिसर्च फेलोशिपसाठी तातडीने अर्ज पाठवायचा होता. त्याला झालेल्या व्याधीमुळे त्याला अर्ज टाईप करणेच काय तर लिहिणेही जमणार नव्हते. जेन आली की तिच्याकडून तो टाईप करून घेण्याचे त्याने पक्के योजले होते. सगळी जय्यत तयारी करून ठेवली होती. पण ती आली तो तिचा डावा हात प्लास्टरमध्ये

घातलेला घेऊन! आता टायपिंग कसे होणार आणि अर्ज मुदतीत कसा जाणार? स्टीफन वैतागला, निराश झाला. टाईप करण्याऐवजी जेनने उजव्या हाताने अर्ज लिहून काढण्याचा पर्याय सुचवला. काम झाले.

या प्रसंगाचे वर्णन जेनने खूप सविस्तर केले आहे, स्टीफनने पाच सहा वाक्यात केले आहे. तपशील सारखेच आहेत, पण जेनने लिहिले आहे की, तिची स्थिती पाहून 'स्टीफनच्या चेहऱ्यावर निराशा पसरलेली दिसली. माझ्या मोडलेल्या हाताच्या काळजीपेक्षा माझ्या मूर्खपणाने झालेल्या अपघाताने अर्ज वेळेत जाणार नाही याची काळजी त्याला अधिक वाटत होती हे स्पष्ट होत होते. त्याचा वैताग बघून माझ्या चुकीची भरपाई करण्याच्या दृष्टीने मी त्याला माझ्या धड असलेल्या उजव्या हाताने अर्ज लिहून काढण्याचा पर्याय सुचवला, तो सुदैवाने त्याला मान्य झाला. मी लेखनिक बनले, काम झाले.' स्टीफनने लिहिले आहे, 'मला हे कबूल केले पाहिजे की जेनची स्थिती पाहून तिला सहानुभूती दाखवण्यात मी खूपच कमी पडलो. ती उजव्या हाताने अर्ज लिहू शकली. तो मी नंतर कुणाकडून तरी टाईप करून घेऊन पाठवला.'

आपल्या विवाहाविषयीही स्टीफनने केवळ तीन वाक्ये खर्च केली आहेत : 'फेलोशिप मिळाली म्हणजे मी आणि जेन लग्न करू शकत होतो. ते आम्ही जुलै १९६५ मध्ये केले. आम्ही सफक या गावी एक आठवडा मधुचंद्र साजरा केला कारण आम्हाला तेवढेच परवडत होते. नंतर लगेचच आम्ही जनरल रिलेटिव्हिटी या विषयावरील समर स्कूलसाठी अमेरिकेतील कॉर्नेल युनिव्हर्सिटीत गेलो.'

जेनने लग्नानंतर त्यांच्या 'अपंग' संसारासाठी खाल्लेल्या खस्तांबद्दल स्टीफनच्या पुस्तकात अगदी अपवादात्मक उल्लेख  आहेत. एकंदरच वैवाहिक जीवनाविषयी त्याने अगदीच संक्षिप्त आणि ढोबळ लिहिले आहे. तीन अपत्यांच्या जन्मांबद्दल प्रत्येकी एकेक परिच्छेद लिहिला आहे.

त्यानंतरचा सर्वात महत्त्वाचा कालखंड म्हणजे ज्या काळात स्टीफन आणि जेन यांच्यातील अंतर वाढत गेले, स्टीफन त्याच्या सेवेसाठी ठेवलेल्या नर्सबरोबर घर सोडून गेला आणि अखेर त्याने जेनला घटस्फोट दिला.

नवऱ्याच्या मृत्यूच्या शंकेची टांगती तलवार सतत डोक्यावर असल्याने जेन नेहमीच तणावाखाली असे. त्या विचित्र परिस्थितीचा दूरगामी विपरीत परिणाम त्यांच्या मुलांवर, विशेषत: मोठ्या रॉबर्टवर दिसू लागला तेव्हा तर तिची चिंता फारच वाढली होती. या मन:स्थितीतून बाहेर येण्यासाठीचा, संसाराचा गाडा ओढायला मन:शक्ती प्राप्त करण्यासाठीचा एक उपाय म्हणून तिला तिच्या एका मैत्रिणीने चर्चमधील गानवृंदात,भक्तिमय सूर आणि तसेच पवित्र वातावरण यात काही वेळ घालविण्याचा सल्ला दिला. तेथेच त्या गानवृंदाचा संचालक, गायक, संगीतकार जोनाथन जोन्स याच्याशी जेनची ओळख झाली. ती वाढत गेली, मुलीला पियानो शिकविण्याच्या निमित्ताने त्याचे घरी येणे जाणे सुरू झाले.

दोघांच्या अंतरातली अंतरे कमी होऊ लागली. मनाची कवाडे बंद करून, खंबीरपणे ओढवलेल्या परिस्थितीचा सामना करताना इतर कोणाजवळ मनातील दु:ख, भविष्याबद्दलची धास्ती याविषयी बोलू न शकणाऱ्या जेनला मन मोकळे करायला एक संवेदनशील व्यक्ती सापडली, एक बळकट भावनिक आधार गवसला. शारीरिक स्थितीमुळे आणि त्याच्या विज्ञानावरील 'पहिल्या प्रेमा'मुळे स्टीफन मुलांना जे पितृसुख देऊ शकत नव्हता ते मुलांना जोनाथनच्या सहवासात मिळू लागले. स्टीफनच्या तब्येतीमुळे कधी कधी रात्री अपरात्रीही आणीबाणीचे प्रसंग उद्‌भवत, त्यावेळी निरपेक्ष मदतीचा हात, ज्याच्यावर निश्चिंतपणे विसंबावे असा आधार हवा म्हणून स्टीफन आणि जेन यांच्याच कुटुंबाचा हिस्सा होऊन त्यांच्याच घरी जोनाथन राहू लागला, जेनवरील अनेक कठीण व्यावहारिक जबाबदाऱ्याही आपल्या खांद्यावर घेऊन जेनवरचे ओझे कमी करू लागला. स्टीफनच्या व्याधीचे प्रमाण इतके वाढले की त्याच्या सेवेसठी चोवीस तास नर्सेस ठेवणे आवश्यक होऊन बसले. त्याचे वाढते काम आणि साथ न देणारे शरीर यामुळे तो हळवा, अतिसंवेदनशील बनला होता. एवढ्या तेवढ्या कारणाने चिडू लागला होता. त्यातच त्याचे संशोधनाचे काम जोरात सुरू होते. त्या काळात जेनला अनेक आर्थिक निर्णय एकटीने घ्यावे लागले होते. अशा परिस्थितीत, जेनच्या मते, नर्सेसच्या काफिल्यातील एलन मॅसन या धूर्त नर्सने स्टीफनचे कान भरले. त्याचे घरातील, संसारातील स्थान डावलले जाते आहे, महत्त्व कमी केले जात आहे असे सांगून मन कलुषित केले. त्याच्या मनात जेन आणि जोनाथन या दोघांच्या संबंधाविषयीही संशय उत्पन्न केला, सेवेच्या निमित्ताने मिळणाऱ्या एकांतात त्याच्या मनात पेरलेल्या विषवल्लीला खतपाणी घातले आणि त्याचीच परिणती प्रथम स्टीफनने त्याच एलन मॅसन या नर्सबरोबर घर सोडण्यात आणि कालांतराने जेनला घटस्फोट देण्यात झाली.

जेन - जोनाथन यांच्या संबंधाविषयी स्टीफन लिहितो, 'जेनला माझ्या मृत्यूची कायमच धास्ती वाटायची. १९७९ साली आमचा तिसरा मुलगा टिम याचा जन्म झाला. त्यानंतर तर जेनची अवस्था फारच बिकट झाली. तीन मुलांच्या डोक्यावरील पित्याचे छत्र हरपल्यानंतर तिचे कसे होणार, ती त्याचे लालनपालन कसे करू शकणार ही चिंता तिला घेरू लागली. माझ्या मृत्यूनंतर तिच्याशी लग्न करून तिचा आणि मुलांचा सांभाळ करेल असा आधार तिला हवा होता. तो तिला जोनाथन जोन्सच्या रूपाने मिळाला. तो स्थानिक चर्चमध्ये गानवृंदाचा संचालक, संगीतकार आणि ऑर्गनवादक होता. जेनने त्याला आमच्याच घरात एक खोली दिली. मी या गोष्टीला विरोध करू शकलो असतो, हरकत घेऊ शकलो असतो, पण मलाही माझ्या अकाली मरणाची कल्पना होती आणि माझ्यानंतर मुलांकडे बघणारे, त्यांना वाढवणारे कोणीतरी हवे असे मलाही वाटत होते.........'

'माझी शारीरिक स्थिती खालावत गेली..... स्वित्झर्लंडमध्ये मला न्युमोनिया झाला. तो अशा अवस्थेला पोचला की डॉक्टरांनीही आशा सोडली आणि व्हेंटिलेटर काढून टाकण्याचे ठरवले. पण जेन ठामपणे उभी राहिली, तिने डॉक्टरांना रोखले आणि मला केंब्रिजला परत आणले. केंब्रिजच्या हॉस्पिटलमधल्या डॉक्टरांनी माझे प्राण वाचवले. पण त्याच्या बदल्यात एका शस्त्रक्रियेत मला माझी उरलीसुरली वाचाही गमवावी लागली. हॉस्पिटलमधून परत घरी आल्यावर मला चोवीस तास वैद्यकीय सेवा आवश्यक ठरली.....'

'या काळात जेन आणि जोनाथन यांच्यातील घनिष्ठ होत जाणाऱ्या संबंधांनी मी सचिंत होऊ लागलो. अखेरीस मला त्यांची वाढती जवळीक सहन होईना आणि १९९० मध्ये मी घर सोडून एलन मॅसन नावाच्या माझ्या एका नर्सबरोबर एका सदनिकेत राहू लागलो.......'

'मी आणि एलनने १९९५ मध्ये लग्न केले. त्यानंतर नऊ महिन्यांनी जेन आणि जोनाथन विवाहबद्ध झाले.'

त्याचा घर सोडण्याचा निर्णय स्टीफनने जेनला तिच्या हाती एक पत्र देऊन कळवला. जेन लिहिते,

'स्टीफनशिवाय, त्याला वगळून एकत्र येण्याची, बरोबर राहण्याची मी आणि जोनाथनने कधी कल्पनाही केली नव्हती. तशी अंधुकशी शक्यताही कधी आमच्या मनात डोकावली नव्हती. आम्ही कधीच स्वप्नांच्या, कल्पनांच्या जगात वावरलो नव्हतो. मधल्या काळात तर मला वाटू लागले होते की आम्ही तिघेजण प्रगल्भपणे, समंजसपणे, परस्परांच्या देवघेवीतून तिघांची वैयक्तिक आणि एकत्रित प्रगती साधण्यात यशस्वी झालो आहोत. त्यासाठी विचारांना मुरड घालणे, भावनांवर ताबा मिळवणे, कमालीचा संयम पाळणे या आवश्यक गोष्टींचे पालन करू शकत आहोत; पण स्टीफनचे पत्र वाचले त्या दिवशी मला कळून चुकले होते की तो माझा गैरसमज होता. स्टीफनला ती व्यवस्था कधीच मान्य नव्हती, तो त्याविषयी सर्वस्वी असमाधानी होता. त्याला त्याच्या सर्वोच्च कुटुंबप्रमुख या पदावरून उतरवून नाईलाजास्तव काही कौटुंबिक निर्णय स्वत: घेण्याचे माझे धोरण त्याला बोचत असावे, मी माझेही जीवन जगते आहे, माझ्या (शैक्षणिक) क्षेत्रात संथ गतीने का होईना प्रगती करते आहे ही त्याची खरी नाराजी असावी.......'

'नेमक्या त्याच वेळेला त्याच्या उच्च पदाचा सतत मान राखणारी, त्याच्या पायाजवळ बसून त्याच्या आज्ञांचे तत्परतेने, तंतोतंत पालन करणारी, त्याची भक्ती नव्हे, पूजाच करते आहे असे त्याला भासवणारी कोणीतरी त्याच्या आयुष्यात आली. तिने त्यालाच तिच्या आयुष्याचा केन्द्रबिंदू मानले. त्याला असे आश्वासन दिले की त्याला रोज प्रत्येक पाळीसाठी वेगळी नर्स शोधावीच लागणार

नाही कारण ती एकटीच आठवड्यातील सातही दिवस, दिवसातले चोवीस तास त्याची मनोभावे, भक्तीभावे सेवा करेल, तो जेथे जाईल तेथे कुठलीही तक्रार न करता, सबब न सांगता त्याच्या पाठोपाठ सावलीसारखी राहील. थोडक्यात मी जे त्याच्यासाठी केले नाही ते सर्व ती करेल. मला जे जमले नाही ते, तिचे संपूर्ण जीवन ती त्याच्याचसाठी समर्पित करेल. म्हणूनच ही क्रूर शिक्षा मला फर्मावण्यात आली होती.....'

घटना एक, दृष्टिकोन भिन्न!

स्टीफन आणि जेन या दोघांच्या पुस्तकात एका सुप्रसिद्ध भारतीय खगोलशास्त्रज्ञाचे नाव आलेले आहे. पद्मभूषण जयंत नारळीकर. ज्या एका विशेष प्रसंगात त्यांचा संदर्भ येतो तोच प्रसंग जयंत नारळीकरांच्या 'चार नगरातील माझे विश्व' या आत्मचरित्रातही आला आहे. तिघांनी त्याच प्रसंगाची केलेली वर्णने पहा-

स्टीफन लिहितो :

'ऑक्टोबर १९६२ मध्ये ग्रॅज्युएट स्टुडंट म्हणून मी केंब्रिजला आलो. त्या वेळचे नावाजलेले, सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ, स्टेडी स्टेट या संकल्पनेचे पुरस्कर्ते फ्रेड हॉएल यांच्या मार्गदर्शनाखाली काम करायला मिळावे यासाठी मी प्रयत्न केला कारण मला त्यांच्या अशा खास क्षेत्रात, कॉस्मॉलॉजी या विषयात, संशोधन करायचे होते. त्याची प्रेरणा मला समर कोर्स दरम्यान भेटलेल्या, हॉएल यांच्या जयंत नारळीकर नावाच्या विद्यार्थ्याकडून मिळाली होती. परंतु त्यांच्याकडे विद्यार्थ्यांची संख्या आधीच जास्त असल्याने मला डेनीस स्किमा, ज्यांचे नावही मी कधी ऐकले नव्हते, यांच्याकडे पाठवण्यात आले.......'

'फ्रेड हॉएल आणि नारळीकर या दोघांनी गुरुत्वाकर्षणाची एक नवी संकल्पना विकसित केली होती. १९६४ साली रॉयल सोसायटीच्या एका सभेत हॉएल यांनी ती सर्वप्रथम जाहीरपणे मांडली. मी त्या सभेला उपस्थित होतो. त्यांच्या भाषणानंतर प्रश्नोत्तराचा तास ठेवण्यात आला होता. त्या दरम्यान मी असे विधान केले की 'सादर केलेली आकडेमोड चुकीची आहे.' त्यावर हॉएल यांनी मला विचारले की 'कशावरून?' मी म्हणालो, 'मी ते 'कॅलक्युलेट' केले आहे.' सगळ्यांना वाटले की भाषण चालू असतानाच, ते ऐकता ऐकता, इतक्या जलद गतीने, मनातल्या मनात मी आकडेमोड केली होती, पण खरी गोष्ट अशी होती की मी आणि नारळीकर एकाच खोलीत शेजारी शेजारी बसायचो आणि त्यांच्या टेबलावर पडलेला हॉएल यांच्या भाषणाचा मसुदा मी आधीच वाचला होता आणि त्याच वेळी हे 'कॅलक्युलेशन' करून ठेवले होते.'

'हॉएल माझ्यावर खूप चिडले. त्यावेळी ते खगोलशास्त्राची स्वत:ची एक संस्था स्थापन करण्याच्या मागे होते आणि त्यासाठी सरकारने परवानगी आणि

अनुदान नाकारल्यास ते आणि इंग्लंडमधील त्यांच्यासारखे हुशार संशोधक त्यांच्या मौलिक ज्ञानासमवेत अमेरिकेची वाट धरतील (‘ब्रेनड्रेन’ होईल) असा धोक्याचा इशारा देत होते. त्यांना वाटले की त्यांची योजना हाणून पाडणाऱ्यांपैकीच कोणीतरी मला हे असले ‘उद्योग’ करायला त्या सभेत धाडले आहे. नंतर त्यांना हवी ती परवानगी मिळाली, त्यांची संस्था कार्यान्वित झाली, एवढेच नव्हे तर त्या संस्थेत त्यांनी मला कामही दिले. म्हणजेच विरोधी सूर लावून मी केलेल्या ‘शहाणपणा’बद्दल त्यांनी मनात माझ्याविषयी काही आकस धरला नाही.’

जेन या प्रसंगाचे वर्णन करते ते एका अगदी वेगळ्याच संदर्भात.

त्यांच्या लग्नाच्या आधीच्या काळात स्टीफनच्या स्वभावाचे नवनवे पैलू जेनला अनुभवावे लागत होते. तो कोणाशीही, लहान मोठे न पाहता, कोणत्याही मुद्यावरून हिरीरीने वाद घालायचा. एकदा त्याने जेनच्या ज्येष्ठ पर्यवेक्षकांशी वाक्‌युद्ध केले होते. जेनने त्याबद्दल नाराजी व्यक्त करताच तो तिला म्हणाला होता, ‘हे पहा, जे वाद केवळ बौद्धिक असतात ना, ते व्यक्तिश: घेण्याचं काहीच कारण नसतं.’

‘हे तुझे मत सहसा खरे ठरत नाही’ असे जेनने त्यावेळी त्याला ऐकवले होते. या तिच्या विधानाच्या पृष्ठ्यर्थ जेनने वर वर्णन केलेला प्रसंग तसाच वर्णन करून शेवटी असे लिहिले आहे की, ‘स्टीफनच्या या आगाऊपणाच्या धाडसाने तेथील वैज्ञानिक वर्तुळात तो लोकांच्या डोळ्यात भरला; पण या प्रसंगातील बौद्धिक वाद व्यक्तिश: घेतलेल्या फ्रेड हॉएल यांच्याशी त्या प्रसंगापासून बिघडलेले त्याचे संबंध परत कधीच सुधारले नाहीत.’

जयंत नारळीकर यांनी त्यांच्या आत्मचरित्रात या प्रसंगाचा वृत्तांत असा दिला आहे :

‘रॉयल सोसायटीने आमचा प्रबंध प्रकाशनासाठी स्वीकारल्यावर मी आमच्या डिपार्टमेंट ऑफ अप्लाइड मॅथेमॅटिक्स ॲन्ड थियरेटिकल फिजिक्समधील सहविद्यार्थ्यांशी चर्चा केली होती. त्यात डेनीस शामा होता तसाच स्टीफन हॉकिंगही होता. पुढे स्टीफनने काही गणिते मांडून असे सिद्ध केल्याचा दावा केला की आमच्या सूत्राप्रमाणे प्रसरणशील विश्वात कुठल्याही वस्तूचे वस्तुमान ‘अनंत’ (KeHe<eUHeUeRt) होते. त्या वेळी मी त्याच्या हे नजरेस आणून दिले होते की त्याने आमच्या सिद्धांतातील ‘अ-रेखीयते’कडे (छेप-श्रळपशरीळींू) दुर्लक्ष केल्याने त्याचा हा आक्षेप लागूच होत नाही. हॉकिंग याच्या या आक्षेपाबद्दल आणि त्यावरील मी दिलेल्या स्पष्टीकरणांबद्दल मी फ्रेड हॉएलला माहिती दिली होती. पण एक लहान बाब म्हणून त्याला तिचे विस्मरण झाले असावे.’

‘रॉयल सोसायटीच्या सभेत हॉएलच्या भाषणानंतरच्या प्रश्नोत्तराच्या तासात

स्टीफन हॉकिंग याने तोच मुद्दा परत उपस्थित केला. त्यावर अध्यक्षांनी आमचे मत विचारले. आमचे पूर्वीचे संभाषण विसरल्यामुळे फ्रेड किंचित गोंधळला, तेव्हा मीच पुढे होऊन हॉकिंगच्या निष्कर्षावर माझा आक्षेप स्पष्टपणे मांडला. त्यावर हॉकिंगला पुढे काही म्हणायचे नव्हते आणि अध्यक्षांनीही दुसऱ्या कोणाच्या तरी प्रश्नाकडे मोहरा वळवला. ते प्रकरण तेथेच संपले होते.'

'पण अलिकडे हॉकिंगच्या एका चरित्रात आणि त्याच्या जीवनावर बीबीसीने केलेल्या माहितीपटात ह्या घटनेचा विपर्यास करण्यात आला आहे. स्टीफनसारख्या एका विद्यार्थ्याने वादात फ्रेड हॉएलसारख्या निष्णात शास्त्रज्ञाला नमवले आणि या घटनेचा दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांनी पुष्कळ गवगवा केला असे सांगून पुढे असेही म्हटले आहे की रॉयल सोसायटीपुढे हे सहशोधन मांडण्याआधी त्याची चर्चा मी स्टीफनबरोबर का केली नाही म्हणून हॉएलने मला फैलावर घेतले. हे सर्वस्वी असत्य आहे. प्रमुख वृत्तपत्रांनी व प्रसिद्धीमाध्यमांनी आमच्या कार्यावर गौरवपूर्ण वर्णने दुसऱ्या दिवशी व नंतर कितीतरी दिवस प्रसिद्ध केली आणि तेव्हा त्यात या घटनेचा उल्लेखही नव्हता. आणि फ्रेडने माझ्यावर राग काढण्याचा प्रश्नच नव्हता. आपले संशोधन इतरांपासून गुप्त ठेवायचा प्रयत्न त्याने कधीच केला नाही; शिवाय मी शामा आणि स्टीफनशी ह्या कार्यावर चर्चा केली होती हे त्याला माहित होते. सभा संपल्यावर बाहेर येताना फ्रेडने मला विचारले, 'हॉकिंगला नक्की काय म्हणायचे होते?' कारण हॉकिंगचे मुळात अस्पष्ट बोलणे त्याला नीट कळले नव्हते. जन्मजात मोटर न्युरॉनच्या वाढत्या शिथिलतेमुळे हॉकिंगच्या मेंदूचा शारीरिक क्रियांवरील ताबा सुटत चालला होता व त्याचाच परिणाम म्हणून त्याचे बोलणे अस्पष्ट, अडखळणारे होत चालले होते. त्यामुळे पुष्कळांना तो काय म्हणतोय ते कळायचे नाही.'

हे आणि असे काही वाचले की असा प्रश्न उभा राहतो यातून निष्कर्ष काय काढायचा? यातले खरे काय? कशावरून ठरते सत्य? लिहिणारा त्या प्रसंगात त्या वेळी वठवीत असलेली भूमिका? की त्याने त्यासंबंधी नंतर घेतलेली भूमिका? त्याची त्या वेळची आणि लिहितानाची मन:स्थिती? त्या वेळची आणि लिहितानाची परिस्थिती? त्या जशा बदलतात तसे सत्यही बदलते का? जे कधीतरी खरे, अस्सल, अगदी बरोबर, अचूक वाटलेले असते तेही नंतर, मागे वळून बघताना निराळे, नकली, खोटे, चुकीचे वाटू शकते का? की हे देखावे, मुखवटे असतात? खरंच, सत्यही वेगवेगळे असते का? त्यातही 'खरे सत्य' आणि 'खोटे सत्य' असते का?

एक गोष्ट नक्की की सत्य खूप गहन असते! नाही?

– सुदर्शन आठवले


६वी आवृत्ती

अहिल्याबाई होळकर
यांच्या जीवनावरील
तेजस्वी कादंबरी

# कर्मयोगिनी

लेखिका
विजया जहागीरदार

किंमत : ३००/-रु.
पोस्टेज :३०/-रु.




‘कमयोगिनी’ - म्हणजे भारतीय उपेक्षित राहिलेले सोन्याचे पान.
‘कमयोगिनी’ - म्हणजे लखलखीत पराक्रमाची, शौर्याची धगधगती गाथा.
‘कमऱ्योगिनी’ - आहे एका अखंड अंत:र्बाह्य युद्धाशी पुरुषार्थाने घेतलेली झुंज.
‘कमयोगिनी’ - म्हणजे अहिल्याबाई म्हणजेच मूर्तिमंत दया, क्षमा.
‘कमयोगिनी’ - म्हणजे या भारत भूमीवर अलोट प्रेम करणारी जगन्माता.




## चीनचे दाहक वास्तव




'पर्सनल इज पोलिटिकल' असे जे म्हटले जाते, ते 'मुक्त विहंग: चीनच्या तीन कन्या' (मूळ इंग्रजी पुस्तक -'वाइल्ड स्वान्स : थ्री डॉटर्स ऑफ चायना) या पुस्तकात आपल्याला दिसते. एक स्त्री, तिची मुलगी आणि तिची नात या तीन पिढ्यांच्या प्रतिनिधींची ही कहाणी म्हणजे तेवढ्या वर्षांचा चीनचा राजकीय, सामाजिक इतिहासच आहे, पण तो इतिहासाच्या पटलावर कधीही न दिसणारा. तिथे म्हणजे इतिहासाच्या पटलावर कोणते राज्यकर्ते आले, गेले, त्यांनी काय केलं याची जंत्री मिळेल. पण त्या सगळ्या काळात सामान्य माणसाचं काय झाले, त्याने कोणती धग सोसली आणि तरीही जीवनाकडे बघण्याचा आशावादी, सौंदर्यवादी दृष्टिकोन कसा सोडला नाही, नवनिर्मितीची आपली आस कशी तेवत ठेवली याबद्दल हे पुस्तक सांगते. गेल्या काही वर्षांत चीनमधल्या जुलमी

राजवटीच्या अमानुष छळाच्या, अत्याचाराच्या कहाण्या सांगणारी इतरही पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यातली काही चिनी माणसांनीच लिहिली आहेत. पण त्या सगळ्यांपेक्षा या पुस्तकाचे वेगळेपण म्हणजे हे आई, मुलगी आणि नात अशा एकाच घरातल्या तीन पिढ्यांची कहाणी सांगते. मुख्य म्हणजे या पुस्तकावर चीनमध्ये बंदी आहे. चीनमध्ये त्या काळात असलेल्या हजारो कानकुबाईन्सपैकी एकीच्या आयुष्यापासून (कानकुबाईन्स-अंगवस्त्र) सुरू झालेले हे पुस्तक तिच्याच इंग्लंडमध्ये राहणाऱ्या. स्वतंत्र, निर्भय आयुष्य जगणाऱ्या नातीच्या आयुष्यापाशी येऊन संपते. या तीन पिढ्यांच्या दरम्यान हेलकावत राहिलेली अनेक आयुष्ये या पुस्तकातून भेटत राहतात, राजसत्तेचा तिच्याशी संबंधित सगळ्या यंत्रणेचा जुलूम-जबरदस्ती, त्यानंतर माओच्या लहरीनुसार बदलत गेलेले सगळ्या देशाचे जगणे, सत्तावर्तुळातल्या त्याच्यानंतरच्या उतरंडीतल्या लोकांचे वागणे, या सगळ्यामध्ये दडपली गेलेली चीनची जनता हे सगळे जसजसे आपण वाचत जातो तसतसा एक मोठा आलेख आपल्यासमोर उभा रहात जातो. त्याच्या पार्श्वभूमीवर आपल्याकडच्या लोकशाहीची किंमतही मनात ठसत जाते.

दर बदलत्या राजवटीमध्ये चीनमध्ये थोड्याफार फरकाने सामान्य माणसाच्या, स्त्रियांच्या वाट्याला चिरडले जाण्याखेरीज दुसरे काहीच आलेले नाही, हे आपल्या अगदी शेजारी असलेल्या चीनचे दाहक वास्तव आपल्या मनावर ओरखडे उमटवत राहते. पण त्याबरोबर चिनी समाजाची अशी अनेक अंग, वेगवेगळ्या सामाजिक प्रथा-कुप्रथा, चालीरीती, मिथकं या सगळ्याचं दर्शन या पुस्तकातून घडतं.

'मुक्त विहंग : चीनच्या तीन कन्या' - युंग चँग, अनुवाद - डॉ. विजया बापट, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

वैशाली चिटणीस

लोकसत्ता दि. १२-१-२०१४


५वी आवृत्ती


**नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी**

लेखक
डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी

किंमत : १२०/-रु. । पोस्टेज :२५/-रु.



८वी आवृत्ती




# वास्तुरहस्य

लेखक
डॉ. नरेंद्र सहस्त्रबुद्धे
डॉ. रविंद्र महात्मे


किंमत : १५०/-रु.
पोस्टेज :३०/-रु.

वास्तु, योग, ज्योतिष, संगीत आणि आयुर्वेद ही दर्शन शास्त्राची पाच उपांगे आहेत. सर्वे ऽ पि सुखिन: सन्तु या एकमेव सुखोद्देशातून शास्त्रची मांडणी ऋषी मुनी व पूर्वाचार्यांनी केली आहे. ''धियोऽयोन: प्रयोदयात्'' या ऋतंभरा प्रज्ञेच्या प्रांगणात शास्त्रांनी गगनास गवसणी घालून विवेकाचा वेलू गगनावरी नेला आहे. बहुव्यापक व सर्वसमावेषक पद्धतीने शास्त्रांचा विकास झाल्याने विज्ञानाच्या छोट्या खिडकीतून शास्त्रांचे गगन मापणे हा खुळेपणा आहे.

तत्त्व, उपाय, साधना व सिद्धी या चतुष्पाद प्रणव पद्धतीने वास्तुशास्त्राचा मागोवा घेण्याचा प्रयत्न ''वास्तुरहस्य'' या ग्रंथाच्या निमित्ताने केला आहे. यातील ''न्यून ते सारे माझे आणि भव्य ते सारे पूर्वाचार्यांचे'' या भूमिकेतून अभ्यासकांनी हे पुस्तक वाचावे.

११वी आवृत्ती

# तो आणि ती




मूळ लेखक
डॉ. जॉन ग्रे

अनुवाद
शुभदा विद्वांस

किंमत : २९०/-रु.
पोस्टेज :३०/-रु.

त्याचे आणि तिचे नाते एका बगीच्याप्रमाणे असते. जर ते हिरवेगार रसरशीत असावे असे वाटत असेल तर त्या बगीच्याला नियमीतपणे पाणी घालावे लागते. त्याची निगराणी करावी लागते. निरनिराळ्या ऋतुंचे तसेच अनपेक्षित हवामानाचे भान ठेवावे लागते. नवीन बीज पेरावे लागते. तण काढून टाकावे लागते. म्हणजेच प्रेमाची जादू कायम टिकून राहते.
'प्रेमाचा परिपोष कसा करावा?' याचे अचूक मार्गदर्शन करणारे हे पुस्तक



# श्रद्धांजली

## अशोक जैन यांचे निधन



ज्येष्ठ पत्रकार, लेखक, अनुवादक आणि 'महाराष्ट्र टाइम्स'चे माजी कार्यकारी संपादक अशोक जैन (७०) यांचे १८ फेब्रुवारीला श्वसनाच्या विकाराने मुंबईत निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी लेखिका सुनीती आणि मुली क्षिप्रा व बिल्वा असा परिवार आहे.

अशोक जैन हे गेली अनेक वर्षे हृदयविकार व पक्षाघाताने आजारी होते. राजकीय वार्ताहर म्हणून जैन यांनी नवी दिल्लीत ११ वर्षे काम केले. तेथील राजकीय वर्तुळात त्यांचा दबदबा होता.

बहुआयामी आणि व्यासंगी अशी पत्रकार अशोक जैन यांची ओळख होती. त्यांचे 'मटा'मध्ये प्रसिद्ध होणारे 'कानोकानी' हे सदर वाचकप्रिय होते. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील घडामोडी आणि त्यावर जैन यांची तिरकस टिपणी असा मसाला या सदरात ठासून भरलेला असे. खुशखुशीत आणि नर्मविनोदी शैलीने अनेक बड्या राजकारण्यांची ते रेवडी उडवत.

त्यामध्ये तत्कालीन नेत्यांच्या खासगीतल्या गप्पा, गॉसिप्स, राजकीय गौप्यस्फोट यांची धमाल असे. आगळ्यावेगळ्या लेखनशैलीमुळे त्यांनी वार्तापत्रांचा बाज बदलून टाकला.

जैन यांनी १९६६ ते १९७८ या काळात 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये वार्ताहर म्हणून काम केले. १९७८ ते १९८९ अशी ११ वर्षे ते दिल्लीत 'मटा'चे विशेष प्रतिनिधी होते. नंतर सहसंपादक, वरिष्ठ सहसंपादक आणि कार्यकारी संपादक म्हणून त्यांनी काम पाहिले.

**डॉ. म. बा. कुंडले**

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. म. बा. कुंडले (वय ८६) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र हे पुस्तक राज्यातील सर्व विद्यापीठाच्या बी. एड. आणि एम. एड. अभ्यासक्रमासाठी वापरले जाते. 'अभ्यासशास्त्र.आणि पद्धती', 'शैक्षणिक पत्रकारिता' ही त्यांची पुस्तके गाजली. 'शिक्षण समीक्षा' या द्वैमासिकाचे ते संस्थापक होते. नागपूरमधील भिडे गर्ल्स एज्युकेशन सोसायटीचे ते दीर्घकाळ अध्यक्ष होते.

**डॉ. म. बा. कुलकर्णी**



वेदवाङ्मयाचे व संस्कृतचे गाढे अभ्यासक, प्राचीन व अर्वाचीन संस्कृतीची सांगड घालणारी विचारसूत्रे सातत्याने सर्वांपुढे मांडणारे ज्येष्ठ समीक्षक व लेखक डॉ. मनोहर बाळकृष्ण कुलकर्णी ऊर्फ 'मबा' यांचे नुकतेच निधन झाले. 'मबा' मूळ नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील जालेगावचे. गोखले शिक्षण संस्थेच्या बिटको आणि हं. प्रा. ठा. कला महाविद्यालयात दीर्घ काळ त्यांनी ज्ञानदानाचे कार्य केले. संस्कृत भाषेचा चालता-बोलता संदर्भकोश म्हणून त्यांची ओळख होती. कुलकर्णी यांची आठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. बी.ए.ला असतानाच त्यांनी दोन वर्षे 'गांवकरी' या वृत्तपत्रामध्ये अग्रलेख लिहिले. तीन वर्षे उपसंपादक म्हणून काम केले. पुढे १० वर्षे संस्कृत व मराठी या विषयाचे अध्यापन केले. १९५६ मध्ये 'साप्ताहिक विवेक'मध्ये त्यांनी 'उपनिषदातील कथा' ही लेखमाला लिहिली. अमृत मासिकामध्ये त्यांनी लिहिलेल्या मनु आणि स्त्री, पुनर्जन्म या लेखमालांचीही पुस्तके झाली. त्यानंतर 'सोन्याचा पाऊस' हे पुस्तक प्रकाशित झाले.

'रघुवंशातील राजे' आणि 'भासाची जळालेली नाटके' याही विषयांवर त्यांनी लेखन केले. १९९१ मध्ये 'पराक्रमी युवक अनंत कान्हेरे' हे पुस्तक लिहिले. २०११ मध्ये मेहता पब्लिकेशनने प्रकाशित केलेले 'मबां'चे 'शब्दचर्चा' हे पुस्तक खूपच गाजले. त्यात सुमारे १००० शब्दांचे अर्थ स्पष्टीकरणासहित त्यांनी दिले. या पुस्तकाला नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयाचा, तसेच पुण्याच्या ग्रंथोत्तेजक सभेचा पुरस्कार मिळाला. नियतकालिकांतून सुभाषिते, शब्द, संस्कारकथा अशी विविध सदरेही 'मबा'नी चालवली. रामायण, महाभारत, भगवद्गीता, स्वातंत्र्यवीर सावरकर, भारतीय संस्कृती हे त्यांचे प्रमुख

विषय. सन २००१ मध्ये झालेल्या सावानाच्या जिल्हा साहित्यिक मेळाव्याचे अध्यक्ष होते. संस्कृत व मराठीचा प्रदीर्घ व्यासंग केवळ व्याकरणापुरता मर्यादित न ठेवता सर्वसामान्य लोकांना भाषेच्या शुद्ध वापरासाठी त्यांनी सदैव आपलेपणाने मदत केली.

**ज्येष्ठ उद्योगपती रमेश गरवारे यांचे निधन**



ज्येष्ठ उद्योगपती आणि आरबीजी समूहाचे अध्यक्ष रमेश भालचंद्र गरवारे (वय ७४) यांचे ७ फेब्रुवारीला निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी सुनीता, मुलगा वायू आणि मुलगी दीपा असा परिवार आहे.

रमेश गरवारे यांचा जन्म १४ ऑक्टोबर १९४० रोजी झाला होता. परदेशात शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी भारतात येऊन गरवारे समूहातील कंपन्यांची धुरा सांभाळली. तसेच काही नव्या कंपन्याही स्थापन केल्या. मालवाहतूक, शेती, मासेमारी, क्रीडा, पॉलिहाऊस आदी क्षेत्रासाठी लागणाऱ्या फिशिंग नेट, रोप्स, यार्न, स्पोर्टस् नेट, रोप आर्टिकल्सच्या निर्मिती क्षेत्राात आघाडीवर असलेल्या गरवारे ऑल रोप्स लि. या नामवंत कंपनीसह गरवारे नायलॉन्स लि. गरवारे शिपिंग लि, गरवारे इलॅटोमेरिक्स लि. गरवारे बेस्ट्रेच लि. आदी विविध कंपन्यांची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे सांभाळली. शेवटपर्यंत ते सक्रिय होते.

नंतरच्या काळात लोककल्याण कार्याला जास्त वेळ देता यावा म्हणून रमेश गरवारे यांनी निवृत्तीचा निर्णय घेतला. प्रसिद्ध उद्योगपती भालचंद्र दिगंबर ऊर्फ आबासाहेब गरवारे यांच्यापासून प्रेरणा घेत त्यांनी शिक्षण, आरोग्य, कला, क्रीडा आदी क्षेत्रात व्यापक योगदान देण्याच्या उद्देशाने रमेश गरवारे चॅरिटी ट्रस्टची स्थापना केली. विविध सामाजिक उपक्रम राबविले.

**म. श्री. दीक्षित**

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यकर्ते, पुण्याचा चालता-बोलता इतिहास असलेले ज्येष्ठ लेखक मधुकर श्रीधर तथा म. श्री. दीक्षित (वय ८९) यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. दीक्षित यांच्या पश्चात सून, कन्या, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ.

राजा दीक्षित यांचे ते वडील होत.

दीक्षित यांचा जन्म १६ मे १९२४ रोजी राजगुरुनगरजवळील खेड येथे झाला. तेथेच त्यांचे प्राथमिक शिक्षण आणि इंटरआर्ट्सपर्यंतचे शिक्षण नागपूरला झाले. खेड न्यायालयात आरंभी नोकरी करून ते १९४५ मध्ये पुण्यात आले. मिलिटरी अकाऊंट्स खात्यात काही काळ काम करून लेखक श्री. म. माटे यांच्याकडे लेखनिक म्हणून रुजू झाले. माटेंच्याच सूचनेवरून त्यांनी १ एप्रिल १९४७ पासून साहित्य परिषदेमध्ये काम करण्यास सुरुवात केली. १९७२ मध्ये परिषदेतून निवृत्त झाल्यानंतर छोट्या मोठ्या प्रकल्पांमध्येही त्यांचा सहभाग होता. १९७६ ते ८५ या काळात कार्यवाह, १९८५ ते ८९ या काळात कोषाध्यक्ष, १९८९ ते ९८ या काळात विश्वस्त म्हणून काम पाहिले.

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे नगर वाचन मंदिर या संस्थांचा इतिहास लिहिण्याचे महत्त्वपूर्ण काम दीक्षित यांनी केले. १९४७ ते २०१० या काळातील बहुतेक सर्व साहित्य संमेलनांना दीक्षित उपस्थित होते. साहित्य सांस्कृतिक विश्वातील घडामोडींबरोबरच पुण्यातील गेल्या सुमारे सत्तर वर्षांतील महत्त्वाच्या घटनांचे ते साक्षीदार होते. हा सगळाच इतिहास मुखोद्गत असल्याने त्यांना ‘पुण्याचा चालता-बोलता इतिहास’, ‘पुण्याचा सांस्कृतिक कोश’ असेही म्हटले जायचे. इतिहास आणि मराठी या विषयांमध्ये त्यांनी मुबलक लेखन केले. वृत्तपत्रे, ऐतिहासिक, चरित्रात्मक अशी ३२ पुस्तके लिहिली. ‘मी म. श्री.’ या आत्मचरित्रात्मक पुस्तकातून त्यांनी आयुष्याची वाटचाल शब्दबद्ध केली होती. साहित्य परिषदेसह बालगंधर्व संगीत रसिक मंडळी, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक अशा अनेक संस्थांसाठी त्यांनी काम केले.

९वी आवृत्ती

**नांगरणी**

लेखक
आनंद यादव

किंमत : २८०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.



## वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड,
टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी
www.wordpowerbookshop@gmail.com
येथे संपर्क साधा.


'एके दिवशी तुम्ही उठाल, जागे व्हाल आणि तुमच्या लक्षात येईल, की तुम्हाला जे करायचे आहे, त्यासाठी हातात वेळ शिल्लक नाही. त्यामुळे जे करायचे आहे, ते आत्ताच करा.'

– पाऊलो कोएलो


६वी आवृत्ती

# वंशवृक्ष

मूळ लेखक
डॉ. एस.एल.भैरप्पा

अनुवाद
उमा कुलकर्णी

किंमत : २८०/-रु.
पोस्टेज :३०/-रु.




तत्त्वज्ञानाचा मार्ग सोडून कादंबरी - लेखनातून जीवनाचा अर्थ जाणू पाहणाऱ्या लेखकाची – डॉ. एस. एल. भैरप्पा यांची अत्यंत लोकप्रिय, आशयसंपन्न कादंबरी 'वंशवृक्ष'

सनातन धर्मपरंपरा आणि मन्वंतर काळातील बदलती जीवनमूल्ये यांतील संघर्षाचे कौटुंबिक पातळीवर उमटणारे भावकल्लोळ प्रभावीपणे चित्रीत करणारी कलाकृती.

मूळ कन्नड कादंबरीला कर्नाटक साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेला आहे. तर या कादंबरीवरील कन्नड चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला आहे.


साहित्य अकादमीने अनुवादासाठी पुरस्कार देण्याची योजना आखल्यावर मराठीत सर्वप्रथम हा मान या अनुवादाला मिळाला आहे. त्याचबरोबर मिळणारा 'महाराष्ट्र गौरव' हा या अनुवादाने मिळवला आहे.

बीज-क्षेत्र न्याय आणि वंशवृक्षाची संकल्पना यांचा उहापोह करणारी कलात्मक कादंबरी.

**४थी आवृत्ती**

ताणविरहित
आनंदी जीवनासाठी

# चिंतामुक्त जीवन




लेखक
आर. डी. मुनोत

किंमत : २००/-रु.
पोस्टेज :३०/-रु.


शरीराला सबलकरण्यासाठी ज्याप्रमाणे जीवनसत्वे, प्रथिने व पौष्टिक पदार्थांची जरुरी असते, त्याचप्रमाणे मनाला क्रियाशील व उत्साही बनवण्यासाठी खास 'मानसिक' पौष्टिक आहाराची जरुरी असते. मनात व शरीरात खोलवर दडलेले ताणतणाव दूर करून आनंदी जीवन जगण्याचे अनंत उपाय या पुस्तकात दिलेले आहेत. यात भीतीवर विजय कसा मिळवावा, ताजेतवाने कसे व्हावे, स्वत:ला कसे ओळखावे, अशा अनेक समस्यांवर मानसशास्त्रीय सुयोग्य मार्गदर्शन केले आहे. चिंतामुक्त यशस्वी जीवनासाठी सर्वतऱ्हेचा "मानसिक पौष्टिक आहार" पुरवण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे.

**१५वी आवृत्ती**

# धिंड

लेखक
शंकर पाटील

किंमत : ११०/-रु.
पोस्टेज :३०/-रु.




“म्या दारूला शिवलो न्हाई. शप्पत सांगतो, मी घेतल्याली न्हाई. उगा इनाकारणी माज्यावर अदावत घेऊ नका.” राऊ खोतानं साफ झिडकारलं तशी ती सारी चावडी खालवर झाली. लोक खदाखदा हसू लागले आणि राऊ खोतच म्हणाला, ‘हसून दावू नका. खरं सांगतो. मी घेतल्याली न्हाई.” रामभाऊ हसून म्हणाले,- “गड्या, तुझ डोळं सांगत्यात की रं!” “अण्णा, डोळं काय सांगत्यात? गपा, उगच गप्प् बसा.” “उतरंस्तवर गप् बसावं म्हणतोस व्हय राऊ?” “अहो, काय चढलीया काय मला?” “अजून चढली न्हाई म्हणतोस?” “अहो, त्याचं नावसुदिक घेऊ नगा. शिवल्याला न्हाई म्या त्याला!” एक सनदी पुढं झाला आणि मोठ्यानं म्हणाला, ’शिवल्यालं न्हाई, तर मग दडून का बसला होतास?” ‘शेबास! मी काय दडून बसलो होतो काय?” “दडला नव्हतास तर मग माळ्यावर काय करत होतास?” “माळ्यावर काय करतोय! गडद झोपलो होतो?” “मग खाली जागा नव्हती काय?” “ते तुम्हाला काय करायचं? आम्ही खाली झोपू न्हाईतर वर झोपू!” राऊ असं आडवं बोलला आणि सबंध चावडी पोट धरून हसू लागली. शंकर पाटलांच्या मराठी मनांवर अधिराज्य करणाऱ्या ढंगदार कथा’


३री आवृत्ती

# ॲज आय सी...

लेखिका
किरण बेदी

अनुवाद
माधुरी शानभाग

किंमत : १४०/-रु.
पोस्टेज :३०/-रु.




''सतत शिकणे आणि मिळालेले ज्ञान वाटून घेणे यावर माझा पूर्ण विश्वास आहे. मी जे पाहते, ऐकते, वाचते आणि त्यातील जे मला अस्वस्थ करते त्याबद्दल लिहिणे हे माझे कर्तव्य आहे, असे मला वाटते.

विशेषत: स्त्री आणि तरुण यांच्यातील सक्षमीकरणासाठी सर्वांनी सजग राहून कृती करायची गरज आहे.


लेखणीची ताकद वापरून सामान्यांच्या आवाज जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी हाती निशाण धरायचे काम मी यापुढेही करत राहीन.''

डॉ. किरण बेदी यांनी वेळोवेळी वेगवेगळ्या प्रश्नांवर लिहिलेल्या लेखांचे हे संकलन वाचकांना स्त्रीप्रश्नाबाबत संवेदनशील करेल आणि प्रतिसाद द्यायला, कृती करायला उद्युक्त करेल.

९वी आवृत्ती

# बाई, बायको, कॅलेंडर

लेखक
व. पु. काळे




किंमत : १२०/-रु.
पोस्टेज : २५/-रु.

वपुंच्या कथांची सुरुवात नेहमीच उत्सुकता वाढवणारी असते आणि शेवट बहुधा धक्कातंत्राचे! वपुंचे हे अनोखे वैशिष्ट्य त्यांच्या या संग्रहातील सर्व कथांत अगदी पराकोटीला गेलेले दिसते. 'आपल्याही आयुष्यात काहीतरी थ्रिलिंग घडावे', याची मध्यमवर्गीय माणसाच्या मनात जी अनावर ओढअसते, त्याचा धागा पकडून वपुंनी या कथा विणल्या आहेत. मुळात सर्व कथांचा 'प्लॉट' अभिनव. त्यामुळे कथेतले नाट्य रंगत जाते, आणि धक्का देऊन शेवट! विषयांच्या नावीन्यामुळे आणि वपुंच्या 'दिलखुलास',
मिस्किल आविष्कारामुळे वाचक कथेत गुंतत जातो....




# समीरला मिळाला धडा!

लोक समीरला नेहमी ओरडत असायचे! तो मूर्खपणाच असा करायचा की लोकांचा नाइलाज व्हायचा. त्यानं एकदा त्याचा घाणेरडा शर्ट आणि स्वच्छ शर्ट एकावर एक घातला. त्याची आई दिवसभर घाणेरडा शर्ट धुण्यासाठी शोधत राहिली. आणि समीर ते दोन्ही शर्ट घालून शाळेत आज फारच उकडतंय असं म्हणत होता.

एकदा त्याच्या शिक्षकांनी त्याला पेन्सिलींना टोक करायला सांगितलं. तर तो पेनांना टोक करत राहिला. तर दुसऱ्यांदा त्याला त्याच्या शिक्षकांनी फ्लॉवरपॉटमधलं पाणी बदलायला सांगितलं. त्यानं चुकून दुसराच जग घेतला आणि त्यात संत्र्यांचं सरबत भरून ठेवलं.

तो खरोखरच वेंधळा मुलगा होता. त्यामुळेच लोकांनाही त्याला ओरडण्याची संधी मिळायची. त्यांच्या ओरडण्यात आश्चर्य, राग, खंत अशा सगळ्याच भावना असायच्या.

पण समीरला त्याचं काहीच वाटायचं नाही. तो दरवेळी नुसतं हताशपणे बघायचा आणि 'सॉरी' म्हणायचा. पण त्यानं स्वत:ला सुधारण्याचा कधीच प्रयत्न केला नाही.

एकदा काय झालं, त्याच्या शिक्षकांनी सगळ्या मुलांना सहलीला न्यायचं ठरवलं. "आपण उद्या सुट्टी घेऊया." सर म्हणाले, "सध्या हवा छान आहे. उद्या शाळेत येताना खाऊचा डबा, पोहण्याचा पोशाख, एक टॉवेल आणि पाण्याची बाटली घेऊन या. आणि हो, बसच्या तिकिटासाठी पैसेही घेऊन या."

"हेऽऽ" मुलं ओरडली. समीरला तर फारच आनंद झाला. कारण तो पट्टीचा पोहणारा होता. आणि त्याला पोहणं आणि पाण्यात सूर मारणं

फारच आवडायचं.

“आता तुमचा गृहपाठ लिहून घ्या. उद्याचा दिवस भरून काढण्यासाठी तुम्ही आज रात्रीच बराचसा अभ्यास उरका. अर्थात तुमची काही हरकत नसेलच ना?” सर म्हणाले.

“नाही सर.” सगळी मुलं ओरडली आणि त्यांनी गृहपाठ उतरवून घ्यायला सुरुवात केली. त्यांना काही गणितं सोडवायची होती. बरेचसे शब्द पाठ करायचे होते. मोठीच्या मोठी कविता पाठ करायची होती. हा सगळा अभ्यास त्यांनी फळ्यावरून नीट उतरवून घेतला.

“उतरवलं सगळं? शाब्बास! लक्षात ठेवा, जो कोणी आजचा गृहपाठ पूर्ण करणार नाही त्याला सहलीला येता येणार नाही. सहलीच्या बदल्यात मी तुमच्याकडून चांगल्या कामाची अपेक्षा करतो.” सर म्हणाले.

“चालेल सर.” मुलं म्हणाली. आणि त्यांनी सगळ्यांनी अभ्यास व्यवस्थित करायचा असा निश्चय केला.

“जाधवकाकांच्या घरावरून कोण जातं? मला त्यांना एक चिठ्ठी द्यायचीय.” सर म्हणाले.

“मी जातो सर.” समीर म्हणाला. “फक्त मीच त्यांच्या घरावरून जातो. बाकी सगळे उलट्या दिशेला जातात. मी जाईन तुमची चिठ्ठी द्यायला.”

“थँक यू, समीर.” सर म्हणाले. समीरनं सरांकडची चिठ्ठी घेतली आणि त्याच्या दप्तरात ठेवली. दप्तराच्या दुसऱ्या कप्प्यात गृहपाठाची वही ठेवली. एक दिवस सुट्टी घेण्याची सरांची कल्पना किती छान आहे हे त्याला दाखवून द्यायचं होतं.

समीर जाधवकाकांच्या घराजवळ आला. त्यानं दारावरची बेल वाजवली. कोणीही बाहेर आलं नाही. फक्त एक कुत्रा गुरगुरत आणि भुंकत राहिला.

“जाधवकाका बाहेर गेलेत वाटतं.” त्यानं जोरजोरात दार वाजवलं. आता मात्र तो कुत्रा पिसाळल्यासारखाच ओरडायला लागला.

“तुला ओरडायचं तितकं ओरड. मी तुझ्या मालकांना चिठ्ठी द्यायला आलोय,” समीरही जोरात ओरडला.

आतून कोणाचंच उत्तर आलं नाही. आतमध्ये कुत्र्याशिवाय कोणीच नव्हतं. “ठीक आहे, मला ही चिठ्ठी पत्रपेटीतून आत टाकायला लागेल.” असं म्हणून त्यानं दप्तरातले कागद पत्रपेटीत टाकले.

मग तो घरी गेला. त्यानं चहा घेतला आणि दुसऱ्या दिवशीच्या सुट्टीबद्दल आईला सांगितलं. ''मी आज संध्याकाळी एकदम व्यवस्थित अभ्यास करणार आहे.'' तो म्हणाला आणि टेबलपाशी जाऊन त्यानं दप्तर उघडलं. पण हे काय, दप्तरात हात घातल्यावर गृहपाठाच्या कागदांऐवजी जाधवकाकांची चिठ्ठीच बाहेर आली.

किती विचित्र! ही चिठ्ठी इथे कशी आली? त्यानं तर ती जाधवकाकांच्या पत्रपेटीत टाकली होती. त्यानं भराभर दप्तर रिकामं केलं आणि स्वत:चे गृहपाठाचे कागद शोधले. पण तो तिथे नव्हता.

''आई! आई गं, मी जाधवकाकांच्या पत्रपेटीत सरांनी दिलेली चिठ्ठी टाकण्याऐवजी माझे गृहपाठाचे कागद टाकले.'' समीर ओरडला. ''आता काय करू? मला माझा गृहपाठ आजच्या आज पूर्ण करायचाय. नाहीतर माझी सहल बुडेल.''

''काय हे, नेहमीचाच धांदरटपणा आहे तुझा.'' आई म्हणाली. आतापर्यंत हे तिला हजारवेळा तरी म्हणायला लागलं होतं. त्यामुळे तिलाही आता काय करावं हे सुचेना. समीर त्यामुळे असा बावळटपणा नेहमी का करतो? ह्याचाच ती विचार करत बसली. शेवटी ती म्हणाली, ''तू असं कर. परत एकदा जाधवकाकांकडे जा आणि ते घरी आलेत का ते बघ. म्हणजे त्यांची चिठ्ठी तुला त्यांना देता येईल आणि तुझा गृहपाठही तुला परत मिळेल.''

''चालेल.'' आईच्या कल्पनेमुळे समीरलाही उत्साह आला. ''जाधवकाका आता घरी आलेही असतील.'' तो धावतधावत जाधवकाकांच्या घरी गेला. त्यानं अनेकवेळा दार आणि दारावरची बेल वाजवली. पण चिडक्या कुत्र्याच्या भुंकण्याशिवाय त्याला कोणतंही उत्तर मिळालं नाही.

''अरे बापरे! जाधवकाका अजून परत आले नाहीत वाटतं.'' बिचारा समीर म्हणाला, ''आता थांबून राहण्याशिवाय दुसरा उपायच नाही.''

समीर जाधवकाकांच्या दारात त्यांची वाट बघत बसला. खूप वेळ झाला तरी जाधवकाका आलेच नाहीत. आतला कुत्रा मात्र भुंकतच होता.

गावातल्या मोठ्या घड्याळात सहाचे ठोके पडले आणि थोड्या वेळानं सातचे ठोकेही पडले. हे म्हणजे अतीच होतं. समीर आता कंटाळला आणि चिंतेत पडला. ''या ना हो जाधवकाका लवकर!'' तो स्वत:शीच म्हणाला.

मग जवळजवळ साडेसात वाजता जाधवकाका रस्त्यावरून हळूहळू चालत आले. समीरला दारात बघून त्यांना आश्चर्य वाटलं.

''जाधवकाका, आमच्या सरांनी तुम्हाला एक चिठ्ठी दिली होती. पण मी चुकून माझ्या गृहपाठाचे कागदच आत टाकले. म्हणून तुम्ही कधी याल आणि दार उघडाल याची मी वाट बघत बसलोय.'' समीरनं जाधवकाकांना सांगितलं.

''काय हे समीर! आता तू काय करणार?'' जाधवकाका हसत हसत म्हणाले. त्यांनी दार उघडल्यावर समीर कागद मिळण्याची वाट बघत बसला. जाधवकाकांचा कुत्रा त्याच्याकडे बघत थुंकतच होता. ''टॉमी, गप्प बस!'' जाधवकाका जोरात म्हणाले.

पण पुढचं दृश्य बघून समीरला धक्काच बसला. टॉमीनं रागारागात त्याचा गृहपाठच फाडून टाकला होता. प्रत्येक कागदाच्या अक्षरश: चिंध्या झाल्या होत्या. त्यामुळे तिथे काय लिहिलंय हे त्याचं त्यालाच कळत नव्हतं. कागदाच्या चिंध्यांवरचं कसं वाचता येणार म्हणा!

ते पाहून समीरला अक्षरश: रडू फुटलं आणि तो धावत धावत घरी गेला. खूप अंधार झाल्यामुळे त्याची आई त्याची काळजी करत बसली होती. समीरनं रडतरडत सगळी हकिकत आईला सांगितली. ''आई गं! मला आता माझा गृहपाठ उतरवून घ्यायला तुषार किंवा प्रवीणकडे जावं लागेल.'' तो म्हणाला.

''पण आता खूपच उशीर झालाय. तुला त्याचा विचार आधीच करायला हवा होता. मी आता सरांना तुझ्या हातून अशी चूक पुन्हा होणार नाही अशी चिठ्ठी देईन.'' आई म्हणाली.

आईनं तशी चिठ्ठी दिलीही. पण चिठ्ठी वाचून सर आणखीनच रागावले. ''समीर, हे बिलकूलबरोबर नाही. मी तुला आजच्या गृहपाठातून अजिबात सूट देणार नाही. तुझा गृहपाठ तुझ्याच मूर्खपणामुळे अपूर्ण राहिला आहे. मूर्खपणा हा निष्काळजीपणा आणि आळशीपणाइतकाच गंभीर असतो. तुला सहलीला नेलं नाही तर मलाही वाईट वाटेल. पण तरीही तुला इथेच बसून तुझा गृहपाठ पूर्ण करावा लागेल.''

हे ऐकून समीरला रडूच फुटलं.

''हे बघ, रडत बसण्यापेक्षा गृहपाठ लवकर पूर्ण कर. जेव्हा तुझा गृहपाठ पूर्ण होईल तेव्हा एखादी बस पकड आणि आमच्याकडे ये. आणि लक्षात ठेव, असला प्रकार पुन्हा कधीही होऊ देऊ नकोस.'' सर म्हणाले.

''चालेल सर.'' समीर म्हणाला, ''माझ्या मूर्खपणामुळेच मला ही शिक्षा झालीय, हे माझ्या लक्षात आलंय. त्यामुळे तुम्ही शिक्षा करत असाल तर ते योग्यच आहे. पण असला मूर्खपणा परत होणार नाही याची मी काळजी घेऊ शकतो.''

''बरोबर आहे. पण असं तू खरोखरच मनापासून ठरवलं असशील तर.'' सर म्हणाले, ''आता आम्ही निघतो. लवकर अभ्यास पूर्ण कर आणि आम्हाला भेट.''

समीरनं दोन तास एका जागी बसून अभ्यास पूर्ण केला आणि नंतर एक बस पकडली. तोपर्यंत सगळ्यांनी जेवढी मजा केली होती तेवढी मजा त्याला करता आली नाही. पण त्यानं थोडक्यात समाधान मानलं.

ही थोडक्यातली गोडी समीरला खूप दिवस पुरली. कारण समीरला त्यातून चांगलाच धडा मिळाला. आता समीर म्हणतो, ''मी असा वेंधळेपणा कधीच करणार नाही.''


'शिकण्याची इच्छा नसेल, तर तुमच्या मदतीला कुणीही येत नाही आणि तुम्ही शिकायचेच ठरवले ,तर तुम्हाला कोणीही थांबवू शकत नाही.'

– झिग झिग्लर, लेखक

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.: PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 March 2014 Posting Date : 11 March 2014

**आगामी**

# द लॉस्ट सिम्बॉल




फ्रीमेसन पंथाकडे एक छोटा दगडी पिरॅमिड होता. त्यावर चित्रलिपीत एक गूढसंदेश कोरला होता. मनुष्यजातीला सन्मार्गावर आणण्याचा हेतू त्यामागे होता. पण एकाला त्या गूढगोष्टीचे आकर्षण वाटू लागले. त्याला त्यातून देवासारखे सामर्थ्य प्राप्त करून घ्यायचे होते. पिढ्यान्‌पिढ्या मेसन पंथीयांनी जी गोष्ट जपून ठेवली; तिच्यावरून आता खून, हिंसा, छळ सुरू झाले. ते एवढ्या थराला पोहोचले की, शेवटी अमेरिकेची शासनव्यवस्था कोलमडण्याची भीती निर्माण झाली.

मग चोवीस तासांत एक थरारक व रोमहर्षक नाट्य सुरू झाले... रेल्वे, हेलिकॉप्टर यांमधून सीआयएच्या माणसांनी पाठलाग सुरू केले... सरकारची नाडी आता खुनी माणसाच्या हातात आली होती! त्याला स्वत:ला 'देव' बनायचे होते. त्यातून मग प्राचीन विद्या, धर्मग्रंथ, कुणाचेतरी बळी अशा घडामोडी घडत गेल्या... शेवटी यातून माणसाने गमावलेले 'ते चिन्ह' त्याला गवसले का?....

*चोवीस तासांतील या घटना तुम्हाला शेवटपर्यंत खिळवून ठेवतील. डॅन ब्राऊनच्या इतर तीन कादंबऱ्यांएवढीच ही एक अगदी अलीकडची उत्कंठावर्धक कादंबरी!*

मूळ लेखिका
**डॅन ब्राऊन**

अनुवाद
**अशोक पाध्ये**

BOOK POST
Printed Matter

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.